


# "गौड ब्राह्मण"

## दीपावली विशेषांक २०१६




वर्ष ७७, मुंबई • अंक २ • ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ • पाने ७६ • किंमत २० रुपये

॥ श्री दत्तगिरी महाराज ॥



आम्ही आपले सदैव ऋणी आहोत.

प्रभु-खानोलकर-सडेकर-वत्स गोत्र-

सर्वांच्या पाठीमागे आपण सतत आहात.

आपला आशीर्वाद सदैव आम्हा सर्वांना लाभो ही विनंती

देवदत्त आत्माराम खोनालकर

९८१९६ ६७४६३

|| उत्तिष्ठ यशो लभस्व ||

गौड ब्राह्मण

**स्थापना : १९३९**

**: संपादक :**
उमाकांत गणपत महाजन

**: संपादन साहय्यक मंडळ :**
पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक
जगजीवन श्रीकांत प्रभु
सतीश गजानन सामंत
दिनेश प्रभाकर परूळेकर
विजय श्रीपाद वालावलकर

**: मुखपृष्ठ संकल्पना :**
अरुण दाभोलकर

**: संपादकीय पत्रव्यवहार :**
**गौड ब्राह्मण सभा**



३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,
१४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.

**उमाकांत महाजन- 9689781750**



या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक तसेच संस्था सहमत असतीलच असे नाही.

- संपादक


# ❊ गौड ब्राह्मण ❊

वर्ष ७८ वे ❖ ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, २०१६ ❖ अंक २

## अंतरंग


- संपादकीय : उमाकांत गणपत महाजन
- आयुष्य हे एकाकी असले तरी, अर्थपूर्ण असावे : सौ. शिल्पा दाभोलकर
- नमूला उपाय सुचवा : श्री. बा. प्रभु तेंडोलकर
- मध्यस्थ : सौ. अंजली श्याम सामंत
- प्रवास हा सुखाचा : सौ. पूजा सामंत
- स्पर्श : जयबाला परूळेकर
- माझे गाव माझे कोकण ! : सौ. शुभदा अ. पाटकर
- माझी सासू ...... बाय : सौ. संध्या माधव देसाई
- आई माझा गुरू : सौ. पूजा पराग सामंत
- Success stories श्री. दत्तात्रय मोहन देसाई : श्री. मनीष दाभोलकर
- कल्पवृक्ष कन्येसाठी : कु. प्रज्ञा सामंत
- नियतस्य तु संन्यास कर्मणी नोपपयेत! : श्री. गो. ल. परूळेकर
- आत्महत्येकडे मानवजातीची वाटचाल भाग-२ : माधव महाजन सामंत
- कोट्याधीश करणारी बांबू शेती : श्री. दिगंबर वसंतराव पाटकर
- ज्ञातिवृत्तांत, हार्दिक अभिनंदन, कविता दु:खद निधन व वधू-वर सूची.


**गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट, १८०-सी गायवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई ४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.**

# गौड ब्राह्मण सभा

## आश्रयदाते

**कै. श्री. विष्णु मंगेश पाटील** (विलेपार्ले) ₹ ६५,००,०००/-
**स्व. लक्ष्मीबाई बा. पाटील** ₹ ९,१०,०००/-
**सौ. स्वाती सुरेश परूळेकर यांजकडून**
(पीताश्री स्व. गणपत स. आजगावकर
मातोश्री स्व. प्रभावती ग. आजगावकर
ह्यांच्या स्मरणार्थ)
भगीनी स्व. मालती अरविंद नाईक ₹ ५,००,०००/-
**स्व. एकनाथ केशव ठाकूर** ₹ १,००,०००/-
**स्व. गजानन विष्णू देसाई** ₹ १,००,०००/-
**स्व. छाया पद्माकर परूळेकर** ₹ ५०,०००/-
**स्व. लक्ष्मी दिनकर खानोलकर** ₹ ३५,०००/-
**स्व. वंदना आनंद खानोलकर** ₹ २५,०००/-
**स्व. नलिनी शां. पंतवालावलकर** ₹ २५,०००/-
**स्व. मुकुंद गजानन देसाई** ₹ २५,०००/-
**स्व. अनंत लक्ष्मण प्रभु** ₹ २५,०००/-
**स्व. नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/-
**स्व. बापू नीळकंठ देसाई** ₹ २५,०००/-
**स्व. भालचंद्र अनंत नाईक** ₹ २५,०००/-
**स्व. जगन्नाथ भगवत महाजन** ₹ २५,०००/-

## आधारस्तंभ

**श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर** ₹ ५,७५,०००/-
(स्व. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर व
स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)
**डॉ. सुरेश विठ्ठल परूळेकर यांजकडून**
आजोबा स्व. रामचंद्र विठ्ठल परुळेकर
आजोबा स्व. मधुसुदन पुरुषोत्तम वाघ
पिताश्री स्व. विठ्ठल रामचंद्र परुळेकर
मातोश्री स्व. सुदा विठ्ठल परुळेकर
स्व. काका डॉ. काशिनाथ रामचंद्र परूळेकर
ह्यांच्या स्मरणार्थ. ₹ ५,००,०००/-
**डॉ. रविद्र बाबूराव तिरोडकर** ₹ १,२५,०००/-
**डॉ. विलास रामकृष्ण देसाई** ₹ १,२५,०००/-
**श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील** ₹ १,२५,०००/-
**श्रीमती प्रेमलता गजानन प्रभु** ₹ १,१८,०००/-
(स्व. गजानन शंकर प्रभु व
स्व. शंकर गणेश प्रभु ह्यांच्या स्मरणार्थ)
**सौ. मृणालिनी वसंत नाईक आणि कुटुंबिय** ₹ १,११,०००/-
**श्रीमती निलू (निरंजन) गव्हाणकर** ₹ १,१०,००२/-
(स्व. गणेश विष्णू गव्हाणकर,
स्व. सुशीलाबाई गणेश गव्हाणकर ह्यांच्या स्मरणार्थ)
**श्री. हृषीकेश काशीनाथ प्रभु** ₹ १,००,०००/-
(स्व. देवराम दा. सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)
**श्रीमती आरती दिनेश नायक** ₹ ७५,०००/-
**श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत** ₹ ७०,०००/-
**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ ५०,००१/-
**श्री. महेंद्र पांडुरंग तेडुलकर** ₹ ५०,००१/-
**श्री. जगजीवन श्रीकांत प्रभू केळुसकर** ₹ ५०,०००/-
**श्री. महादेव भास्कर सामंत** ₹ ५०,०००/-
**श्री. विजय विठ्ठल परूळेकर** ₹ ५०,०००/-
**श्रीमती वंदना केदार पाटील** ₹ ५०,०००/-
**श्रीमती विभावरी अरविंद पाटील-पाटकर** ₹ ५०,०००/-
**श्रीमती विजयालक्ष्मी द्वारकानाथ दाभोलकर** ₹ ५०,०००/-
(स्व. द्वारकानाथ साबाजी दाभोलकर
ह्यांच्या स्मरणार्थ)
**टोपीवाला चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई** ₹ ५०,०००/-
**सौ. बीना विष्णु प्रभु व**
**श्री. विष्णू विनायक प्रभु** ₹ ५०,०००/-
(स्व. पर्शराम आत्माराम वायंगणकर ह्यांच्या स्मरणार्थ)
**श्री. शामराव शांताराम पाटील**
**श्रीमती उषा शामराव पाटील** ₹ ५०,०००/-
**श्री. रामदास बी. प्रभू-कोचरेकर** ₹ ३५,०००/-
(कै. काका कोचरेकर पारितोषीक फंडात भर)
**श्रीमती स्नेहलता ग. तिरोडकर** ₹ २५,११२/-
(स्व.गजानन (दादा) रघुनाथ तिरोडकर
यांच्या स्मरणार्थ)
**श्री. उदयराज स. सामंत नेवाळकर** ₹ २५,०००/-
**श्री. सुधाकर वासुदेव वालावलकर** ₹ २५,०००/-
**श्रीमती मीरा रघुनाथ सामंत** ₹ २५,०००/-
**श्री. राजीव आनंदराव गव्हाणकर** ₹ २५,०००/-
**श्री. शशिकांत पीतांबर देसाई** ₹ २५,०००/-
**श्री. अच्युत वामन तेंडुलकर** ₹ २५,०००/-

# संपादकीय

भारतीय संस्कृती ही उत्सव प्रिय संस्कृती असून त्यामध्ये अनेक उत्सव मोठ्या भक्तीभावाने व सामूहीकतेने पूजले जातात. महाराष्ट्रात आदिशक्ती देवीची मुख्य साडेतीन शक्तीपीठे असून त्या ठिकाणी नऊ दिवस जत्रेचा माहोल असतो. दहावा दिवस उजाडतो तो दसऱ्याचा दिवस ! अश्विन शु. दशमी हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक असून अतिशय शुभ मानला जातो. या दिवशी आपल्या उपजीविकेच्या साधनांची पूजा होते. जसे शेतकरी नांगराची, व्यापारी-तराजूची तर अभ्यासू लेखणी पुस्तकांची. याच दिवशी नवरात्राचे उद्यापन करतात. सायंकाळी एकत्र जमून सीमोलंघन करून आपट्याच्या झाडाची पाने सोने म्हणून एकमेकांना देतात. आपट्याचे पान हे रघूराजाचं प्रतीक आहे. म्हणून ही पानं दसऱ्याला दिली जातात. यामागे सगळ्यांची एकच भावना असते. अवगुणांचा ऱ्हास होऊन सोन्यासारखं उज्ज्वल भविष्य सगळ्यांना लाभू दे. प्रत्येकाला भेटून शुभेच्छा देण्याचा हा दिवस. तसेच दसऱ्याचा उत्सव म्हणजे भक्ती व शक्ती ह्यांचा समन्वय समजवणारा उत्सव. नवरात्रीचे नऊ दिवस जगदंबेची उपासना करून शक्ती प्राप्त केलेला मनुष्य विजय प्राप्तीसाठी नाचू लागणे स्वाभाविक आहे.

भारतीय संस्कृती वीरतेची पूजक आहे. शौर्याची उपासक आहे. व्यक्ती व समाज ह्यांच्या रक्तात वीरता प्रकटावी ह्यासाठी दसऱ्याचा उत्सव आहे. तर युद्ध अनिवार्यच असेल तर शत्रूच्या हल्ल्याची वाट न पाहता त्याच्यावर चढाई करून त्याचा  पराभव करणे ही कुशल राजनीती आहे. ह्याच न्यायाने भारतात अतिरेकी कारवाया करण्याऱ्या व अशांतता निर्माण करू पहाणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरात भारतीय लष्कराने दिनांक २९ सप्टेंबर रोजी दहशतवाद्यांचे सात तळ उध्वस्त करत (सर्जिकल ऑपरेशन पूर्ण करत) पाकिस्तानला चांगलाच धडा शिकविला. ह्या धाडसी कृत्यामुळे भारतीय सेना व माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तमाम भारतीय जनतेने कौतूकच केले.

दसऱ्या नंतर येणारा सण म्हणजे दिवाळी. दिवाळी म्हणजे आनंद-हर्षाचा उत्सव! दिवाळीत असंख्य दीप उजळून आनंदाची लयलूट होते, सदिच्छांची बरसात होते. आप्तस्वकीय, हितचिंतक मित्रपरिवार सर्वांना सुख लाभावे म्हणून इच्छिले जाते. या उत्सवात साजरा होणारा प्रत्येक दिवस कुटुंबातील नातेसंबंध दृढ करतो आणि नात्यातील प्रेमाचे धागे घट्ट होण्यास मदत होते. जीवनातील दु:ख-अंध:कार दूर होण्यासाठी दिवाळीच्या दीपोत्सवाची कल्पना रूढ झाली आणि प्रकाशाच्या आराधनेसाठी असंख्य दीप उजळले जाऊ लागले. दिवाळीतील ज्ञानवृद्धीची कल्पना साहित्याच्या क्षेत्रातील दिवाळी अंकानी भागविली जाते आणि ज्ञानप्रकाशाचे किरण सर्वांपर्यंत पोहचविले जातात. असा हा आनंदोत्सव सर्वांना सुखकारक ठरो व सुख, शांती, समृद्धी, समाधान, ऐश्वर्य, आरोग्य व प्रतिष्ठा ह्या सप्तरंग दिव्यानी आपले आयुष्य प्रकाशीत होवो ही शुभेच्छा!

याच सुगीच्या कालावधीत ह्या सांस्कृतिक सणांच्या बरोबरीने येणारे आपल्या ज्ञातीचे दोन सोहळे म्हणजे गुणवंतांचा कौतुक सोहळा व गौड ब्राह्मण सभा, मुंबईचे वार्षिक स्नेह संमेलन. आज कित्येक वर्ष या कार्यक्रमाच्या तारखा, स्थळ व वेळ ठरलेल्या आहेत. त्यांच्यात सहसा बदल होत नाही. वर्षभर आमचे विद्यार्थी अभ्यासात मेहनत करून वर्षअखेर निरनिराळ्या परीक्षात अधिकाधिक गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी धडपडत असतात. अशा मुलांचे कौतुक कुडाळदेशस्थ विद्यावृद्धी समाज व गौडब्राह्मण सभा यांच्यातर्फे २ ऑक्टोबरच्या कौतुक सोहळ्यात केले जाते व ज्ञातीतील दानशूर व्यक्तीने दिलेल्या भरघोस रकमेतून पारितोषिके दिली जातात. २५ डिसेंबर रोजी गौडब्राह्मण सभेतर्फे भरविला जाणारा वधू-वर मेळावा व स्नेहसंमेलन हेही ज्ञातीतील सर्वांनी एकत्र येऊन विचारविनिमय करून, ज्ञातीसाठी निरपेक्षवृत्तीने काम करणाऱ्या समाज धुरीणांच्या कामाची दखल घेतली जावी आणि त्यांच्याही कतृत्वाचे कौतुक होऊन त्यांना समाधान मिळावे यासाठी आखलेला हा कार्यक्रम असतो.

''गौडब्राह्मण'' त्रैमासिकाच्या आजवरच्या वाटचालीत ज्ञातीतील अनेक लेखक-लेखिकांनी, कवी-कवीयत्रीनी, वृत्तांकन देणाऱ्यांनी जाहिरातदारांनी व हितचिंतकानी आम्हाल फार मोठे सहकार्य दिले आहे. त्या सर्वांना ही दिवाळी व नूतन वर्ष आनंदाचे, सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही प्रार्थना !

**उमाकांत महाजन-९६८९७८१७५०**
ugmahajan@rediffmail.com

## आधारस्तंभ

**श्री. अरुण रघुनाथ सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. रघुनाथ विष्णू सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती पुष्पा रामचंद्र सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. रामचंद्र का. सामंत व
स्व. कमल रामचंद्र सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती सुहासिनी दत्ताराम गाळवणकर** ₹ २५,०००/-
(स्व. सुमती मधुसूदन तेंडुलकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर,**
**सौ. विजया शिवराम तेंडोलकर** } ₹ २५,०००/-

**श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/-

**श्री. प्रभु-पाटकर कुटुंबीय मुलुंड** (स्व. सतिशचंद्र सहदेव प्रभु-पाटकर यांचे स्मरणार्थ) ₹ २५,०००/-

**श्री. भूषण रोहीत झारापकर** ₹ २५,०००/-

**श्री. काशिनाथ नारायण कोचरेकर,** वसई ₹ २५,०००/-
(स्व. नारायण विनायक कोचरेकर व स्व. मनोरमा नारायण कोचरेकर यांच्या स्मरणार्थ)

**सौ. नीला राजाराम गाळवणकर** ₹ २५,०००/-

**श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** ₹ २५,०००/-
(स्व. शांताराम बाळाजी पाटील व
स्व. राधाबाई शांताराम पाटील ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. भारती सुधाकर नाईक (अर्नाळा)** ₹ २५,०००/-
(स्व. विश्वनाथ राजाराम सामंत व
स्व. सुमती विश्वनाथ सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती शरयु तेंडोलकर** ₹ २५,०००/-
(स्व. प्रा. पंढरीनाथ गोपाळ तेंडोलकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती जयंती भालचंद्र पाटकर** (डोंबिवली) ₹ २५,०००/-
(स्व. भालचंद्र नारायण पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** ₹ २५,०००/-
(कै. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांचे स्मरणार्थ)

**श्री. रोहित रजनीकांत नाईक** (डोंबीवली) ₹ २५,०००/-

**श्री. सुनील दिगंबर सामंत** ₹ २५,०००/-

*With Best Compliments From*

PHONDA GHAT PHARMACY

Honey ✦ Gulkand ✦ Bel-Amla Muramba
✦ Rose water ✦ Ayurvedic Medicines





PHONDAGHAT HONEY



1-2, Shanti Building, Mogul Lane,
Mahim (West), Mumbai 400 016.
Ph.: 2432 8542 Mob.: 9820070545
E-mail : phondaghat_pharmacy@hotmail.com

# आयुष्य हे एकाकी असले तरी, अर्थपूर्ण असावे

**सौ. शिल्पा मनीष दाभोलकर**



सौ. शिल्पा दाभोलकर

''सोबतीला कुणी नसले तरी.. सोबत करणारे असावे'' ह्या ओळीप्रमाणेच जर प्रत्येकजण जीवन जगत आले व जीवनात येणारी सुख - दु:ख यांना आपण सामोरे गेलो तर.... त्या जीवनात रस येतो... नाही तर ते जीवन शून्य! तुम्ही घाबरून जीवन संपविणे हे त्यातील फलित नाही.

हल्ली आपण नेहमीच वर्तमानपत्रात, बातम्या वाचतो कि त्याने किंवा हिने आत्महत्या केली. अगदी मध्यंतरी काही महिन्यांपूर्वी पेपरात वाचले कि पाचवी-सहावीतील मुलगा आईने अभ्यासासाठी ओरडली म्हणून आई बाहेर गेली आणि फास लावून घेतला. अरे ती माउली आपल्या पाखराला नाही सांगणार का? तिला तर आत्महत्येपेक्षा खूप मोठे मरण झाले. हे तर जिवंतपणीच यातना भोगाव्या लागल्या.

तसेच शेतकरी आत्महत्या हे प्रकरण तर हल्ली खूप गाजत आहे. त्यामुळे काय होते कि, त्यांना आपल्या संकटावर मात करण्यासाठी बळ येत नाही तर त्याबद्दल सहानभूती मिळते. अरे तुम्ही तुमच्या कारणासाठी कर्ज काढता. निसर्गाने पाठ फिरवली.... पाऊस नाही पडला.... त्यामुळे शेती नाही... मग पैसा नाही... तसेच पैसा नाही... तर कर्ज फेडणे होत नाही. त्यामुळे सावकार , बँका यांचा तगादा.. पण त्यासाठी जीवन संपविणे हा मार्ग सोपा होऊन गेला. त्यामुळे काय झाले इतर सुद्धा कष्ट करायला बघत नाही. त्यावर हाच उपाय शोधणे हे अतिशय चुकीचे आहे. आलेल्या संकटावर, परिस्थितीशी तोडीने सामना केला तर मग हा वाईट विचार कधीच मागे वळून तुमच्यामनात येणार नाही.

अरे देवाने तुम्हाला हा मनुष्य जन्म दिला आहे. हे त्या देवाचे तुम्ही आभार माना. हा इतका सुंदर मनुष्य जन्म आहे कि त्या जन्मात तुम्हाला ह्या उभ्या आयुष्यात किती तरी सुंदर चांगली कामे करायची आहेत हे जर ठरवले तर आलेल्या नैराश्याला मागे सारून तुम्ही हसत हसत सामोरे जाल व मग तुम्हाला जगण्याचा खरा अर्थ कळेल. अरे संकट, नैराश्य, कमीपणा, दु:ख कोणाच्या नाही वाट्याला आले? देव, ऋषी-मुनी, साधू-संत, मोठ मोठी समाजातील नामांकित व्यक्ती, पुढारी, नेते यांनी जर असे केले असते तर जगात काहीच शिल्लक राहीले नसते.

हल्लीच नेरूर, कुडाळ येथे आपल्याच ज्ञातीतील एक डॉक्टर शिकणाऱ्या मुलीने आत्महत्या केली अशी बातमी वाचली. अरे तिला तर चांगले १०वीत ९०% मार्क मिळाले मग तिने अस का केले? ह्याचा विचार समाजाने करावयास हवा. काही मुले मी नापास होणार हे डोक्यात विचार घेऊन रिझल्ट लागण्याआधी देखील जीवन संपवतात. मग कळते कि किती सुंदर मार्क होते. अरे जीवन जगायला शिका! जीवनात येणारे प्रत्येक सुख-दु:ख, यश-अपयश पचवायला शिका. तरच तुम्हाला जीवनाचा खरा अर्थ कळेल.

आधीच जीवन हे खूप छोटे आहे आणि त्यात तुम्ही ते अशा रीतीने संपवले तर काय उपयोग. जीवन म्हटलं कि चढ- उतार येणारच मात्र परिस्थिती समोर हतबल न होता धीराने सामना करणेच हितकारक आहे. कधी आजारपणातून, नकारात्मक भावनेतून, तर कधी तात्पुरत्या आलेल्या कठीण प्रसंगातून जाताना नकळत आपल्याला शरण जावे लागते. त्यातून सुटका म्हणजे आत्महत्या नव्हे. नैराश्यातून सकारात्मकतेकडे जाणे हा मार्ग आहे.त्यासाठी प्रयत्न करावयास हवेत. समाजानी अशांना धीर देऊन त्यांच्या पालकांना सुध्दा वेगळा विचार करावयास भाग पाडावयास हवेत. हल्ली काही पालक ८९% मार्क पाडल्यास ९०% नाही म्हणून दुखा:त बुडालेले आम्ही पहिले आहेत. त्यामुळे तो विद्यार्थी आणखीनच खचून जातो. निराशेत ढकलला जातो. आपण आपल्या भावना वेळो वेळी मोकळ्या करणे गरजेचे आहे. जाता जाता कविवर्य मंगेश पाडगावकरांची एक कविता आठवते.....

सांगा कसं जगायचं ?  
कण्हत कण्हत कि गाणं म्हणत  
तुम्हीच ठरवा!  
डोळे भरून तुमची आठवण  
कोणीतरी काढतच ना ?  
ऊन ऊन दोन घास  
तुमच्यासाठी वाढतचं ना?  
शाप देत बसायचं की दुवा देत हसायचं  
तुम्हीच ठरवा!



# स्वर्गीय एकनाथ केशव ठाकूर कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड

गेली ४४ वर्षे कर्करोगाशी दोन हात करत त्यांनी आपल्या समाजबांधवांना बरेच काही दिले अशा ज्ञातीभूषण असलेल्या कै. एकनाथ केशव ठाकूर ह्यांच्या नावे १०० लाख रुपयांचा ''स्व. एकनाथ केशव ठाकूर कर्करोगग्रस्त निधी उभारण्याची घोषणा ह्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून संस्थेचे कोषाध्यक्ष मनीष दाभोलकर ह्यांनी स्वत:चे एक लाख रुपये देऊन करताच सभागृहात उपस्थित असलेल्या अनेक मान्यवरांनी ह्या घोषणेचे स्वागत करीत आपण ही एक लाख रुपये संस्थेकडे देऊन ह्या योजनेत सामील झाले त्यांची नावे खाली देत आहोत.

**सचिण (ब्रांदा) ₹ ३,००,०००/-**

## एक लाख एक रकमी देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे :

**श्री. गोविंद महादेवराव सामंत (वांद्रे) ₹ ३,००,०००/-**
(वडील कै. महादेवराव विठ्ठल सामंत व आई कै. सौ. सिताबाई महादेव सामंत आणि बंधू कै. भास्कर महादेवराव सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. जगदीश देवराव सामंत ₹ १,००,०००/-**

**श्री. शशी प्रभू ₹ १,००,०००/-**

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर ₹ १,००,०००/-**

**श्री. जयंत रामचंद्र पाटील ₹ १,००,०००/-**

**श्री. विकास (राजाभाऊ) पाटकर आणि कुटुंबीय ₹ १,००,०००/-**

**श्री. यशवंत मोरेश्वर देवस्थळी ₹ १,००,०००/-**

**श्री. मोरेश्वर राजाराम आजगावकर ₹ १,००,०००/-**

**श्रीमती सुषमा सुरेश महाजन ₹ १,००,०००/-**
ह्यांच्या पति स्व. सुरेश राजाराम महाजन मातोश्री स्व. लीला अनंत खानोलकर, पिताश्री स्व. अनंत परशुराम खानोलकर

**श्रीमती जयश्री तुकाराम वालावलकर ₹ १,००,०००/-**
(कै. तुकाराम कान्होबा वालावलकर यांचे स्मरणार्थ)

## रुपये २५,००० व त्यापेक्षा जास्त पण १ लाखापेक्षा कमी देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे

**डॉ. चंद्रकांत वसंतराव नाईक (स्व. श्यामला चंद्रकांत नाईक स्मरणार्थ वैद्यकिय उपचार) ₹ ७५,०००/-**

**श्री. मोहन बी. सामंत ₹ ५०,०००/-**

**श्री. विजय सदानंद वालावलकर ₹ ५०,०००/-**

**सौ.प्रिती महेश ठाकूर दादर ₹ ५०,०००/-**
(आई कै.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**कै. श्रीनिवास श्रीकृष्ण प्रभू केळूसकर ₹ ५१,०००/-**

**डॉ. रवींद्र बाबुराव तिरोडकर ₹ ५०,०००/-**
(आजोबा (मातामह) श्री. राजाराम रघुनाथ कोंडकर सामंत, मालवण ह्यांचे स्मरणार्थ)

**श्री. अशोक सुधाकर दाभोलकर** (मातोश्री स्व. प्रेमा सुधाकर दाभोलकर ह्यांचे स्मरणार्थ) **₹ ५०,०००/-**

**श्रीमती कुमुद जनार्दन तेंडूलकर (नेरूळ) ₹ ४०,०००/-**
(कै. जनार्दन भास्कर तेंडूलकर यांच्या स्मरणार्थ),

**श्री. मधुसुदन शंकर तिरोडकर ठाणे यांजकडून ₹३०,०००/-**
(स्व.शंकर आपाजी खानोलकर व स्व. उमाबाई (मावशी), वडील स्व. शंकर वामन तिरोडकर ह्यांच्या स्मरणार्थ)
स्व. विठ्ठल व कै. रुक्मिणी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ

**श्री. बाबाजी राजाराम सरनाईक (कै. सौ. स्नेहलता बाबाजी सरनाईक** ह्यांच्या स्मरणार्थ) **₹ २५,००१/-**

**श्री. संजीव ए. दाभोलकर ₹ २५,०००/-**
(स्व.सौ.कुमुद व स्व.एकनाथ दाभोलकर स्मरणार्थ)

**श्री. दिगंबर पुजारी,** नरसोबावाडी **₹ २५,०००/-**

**श्री. अरुण सुधाकर गोसावी ₹ २५,०००.-**
(स्व. कमलताई सुधाकर गोसावी स्मरणार्थ)

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे ₹ २५,०००/-**
(पीताश्री कै. श्री. अरविंद रामकृष्ण सामंत नेवाळकर स्मरणार्थ)

**श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर ₹ २५,०००/-**
(स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांच्या स्मरणार्थ)

**श्री. नरेंद्र श्री. श्रीमल (चैनई) ₹ २५,०००/-**

**नोबेल फार्मा ₹ २५,०००/-**

**लूपीन फार्मा-पी. ए. पाटील ₹ २५,०००/-**

**सौ. संध्या म. प्रभू ₹ २५,०००/-**
(स्व. वत्सला गो. प्रभू स्मरणार्थ)

**सौ. लता परमानंद देसाई व श्री. परमानंद देसाई ₹ २५,०००/-**

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर ₹ २५,०००/-**

**श्री. व्ही. जी. सामंत ₹ २५,०००/-**

**श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील ₹ २५,०००/-**
(स्व. सौ. वसुंधरा राधाकृष्ण पाटील ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सरिता श्रीपाद झारापकर ₹ २५,०००/-**
(स्व.प्राचार्य श्रीपाद रामचंद्र झारापकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**स्व. सत्यभामा आत्माराम सामंत आणि स्व. आत्माराम रावजी सामंत उर्फ भाऊ नमस्कर ह्यांचे स्मरणार्थ रु. २८.०००/-**

# नमूला उपाय सुचवा

श्री. बा. प्रभु तेंडोलकर

सतत हात धूत राहाणं, दिवसभर देव देव करणं, कमालीचं सोवळंओवळं, कडक उपासतापास इत्यादि सवयी तशा निरूपद्रवी. पण यातली एखादी जरी पराकोटीला गेली तर! कावेरीचंच बघा ना.

त्या दोन खणी जागेत कावेरी एकटीच रहाते. मुलगी नमू त्याच शहरांच्या टोकाला एक तासाच्या अंतरावर रहाते. नवरा व तिच्या अडीच वर्षांच्या राघूसह. वयाच्या साठाव्या वर्षी कावेरीची घासफूस सुरू झाली. 'घासफूस' या कोकणी शब्दाचा अर्थ घासून पुसून स्वच्छ करणं. पण या शब्दाचा अर्थ तेवढाच मर्यादित नाही. घासफूस म्हणजे घासून पुसून साफ करणं. तरीही समाधान न झाल्यामुळे पुन्हा एकदा पुसून स्वच्छ करत राहाणं.

कावेरीचं सारं घर अगदी स्वच्छ असतं. घरातल्या मोजक्याच वस्तू, मोजकीच भांडी, बिछाना, भिंती, देवाचा फोटो, लादी वगैरे सगळं सगळं चकाचक स्वच्छ असतं. मुलगी नमू लग्न होउन लांब रहायला गेलेली आणि कावेरीचा नवरा गेल्यापासून ती एकटीच त्या दोन खोल्याच्या सेल्फ कंटेन्ट जागेत, स्वतंत्र रहात होती. अगदी एकटीच.

घासफूस सुरू झाल्यापासून ती कंबर मोडेपर्यंत सतत काहीना काही पुसत राही. दोन-दोन दिवसांनी टॉयलेट, बाथरूम (तरी ती एकटीच त्यांचा वापर करी) साफसूफ करताना तर तिची पार वाट लागे. मग दमून ती कॉटवर पडून राही. तरीही अमुक एक जागा किंवा फर्निचर मनासारखं साफ झालेलं नाही असं तिला वाटत असे. 'अती स्वच्छतेच्या घरी पिशाच्च वास करी' म्हणतात. म्हणजे अती अती स्वच्छता पाळायला गेलं की दुसरंच काही (आपत्ती) पाठी लागतं. तशी अवस्थां कावेरीची झाली आहे.

तशी सुरूवातीला कावेरीकडे कामवाली बाई होती. पण नंतर तिचं काम कावेरीला पसंतच येईना. तिचं काम व ती बाईच कावेरीला अस्वच्छ वाटू लागल्यामुळे तिने त्या बाईलाच काढून टाकलं. त्यापासून कावेरी स्वयंपाक, भांडी, केर, लादी सर्व काही स्वत:च करते. अख्खा दिवस कावेरी राबत असते. सगळं घर स्वच्छ करत रहाते. रात्री झोपतानाही तिच्या डोक्यात घरांतला कुठलासा कोपरा बरोबर साफ झाला नसल्याची शंका येऊन तो कोपरा दुसऱ्या दिवशी उठल्याबरोबर व्यवस्थीत साफ करायला हवा असं ती ठरवून टाकी.

कावेरी कधीच बाहेर जात नाही. दर शनिवारी संध्याकाळी नमू येते. आठवड्याची भाजी वगैरे वस्तू तिच्या घरात ठेवून जाते. त्या साऱ्या वस्तू साफसूफ करून जागच्या जागी ठेवणं वगैरे कावेरी आंघोळीच्या आधी करणार. मग नमू गेल्यावर ती कुठे कुठे बसली ती ती जागा कावेरी पुसून काढणार.

कावेरीनं चहा घेणं कधीच बंद केलंय. त्यामुळे तिच्याकडे दूधवाला येतच नाही. पेपरवाला, पोस्टमन वगैरे कोणीही येत नाही. फोन तर तिच्याकडे नाहीच, नकोच ते लोकांचं अस्वच्छ बोलणं ऐकायला. सोसायटीचं बील, वीज बील इ. नमू परस्पर भरते. गॅसवाल्याला नमू स्वत:च घेऊन येते. गॅसवाला गेल्यावर तर कावेरी संपूर्ण ओटा व दोन्ही खोल्या धुवून पुसून काढताना हैराण होते.

सुरूवातीला नमू आईसाठी भाजी किंवा काही बनवून आणी. पण 'भाजी व्यवस्थीत धुतली होतीस का? कशी धुतलीस? किती वेळा?' असे कावेरीचे प्रश्न वारंवार ऐकून ऐकून शेवटी, बनवलेले पदार्थ आणायचं नमूनं बंदच केलं. अगदी सुरूवातीला शेजारच्या बायका काही सांगायला विचारायला दरवाज्यात यायच्या. पण कावेरी दरवाजा अर्धवट उघडून दारातूनच त्यांच्याशी बोलणार, त्यांना घरांत घेणार नाही. जणू त्या बोलत राहिल्या तर बाहेरची धूळ व घाण आत येणार. आता तर कोणीच कावेरीशी बोलत नाही, संबंध ठेवत नाही.

कावेरीची घासफूस सुरू व्हायच्या आधीची गोष्ट. एकदा नमू नवरा व राघूला घेऊन आली. काही काम निघाल्यामुळे नमूचा नवरा लवकर निघून गेला. तो गेल्यावर कावेरीनं ओला फडका घेऊन नमूचा नवरा ज्या



# देणगी अर्ज

## स्व. एकनाथ केशव ठाकूर कॅन्सरग्रस्त निधी

कार्यवाह,
गौड ब्राह्मण सभा,
गिरगांव, मुंबई ४०० ००४.
महोदय,

स.न.वि.वि.

मी आपल्या संस्थेस देणगी म्हणून रु. __________(अक्षरी ______________________________)
रोख/धनादेशाद्वारे पाठवित आहे, त्याचा स्वीकार व्हावा. देणगीदार व देणगीविषयीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**स्व. एकनाथ ठाकूर कर्करोगगस्त रुग्णांना** वैद्यकीय मदत निधी-देणगी रु. ________________

देणगी यांच्या स्मरणार्थ : ______________________________

देणगीदाराचे संपूर्ण नाव : श्री./श्रीमती ______________________________

वडिलांचे संपूर्ण नाव: ______________________________

पतीचे संपूर्ण नाव : ______________________________

मूळगाव : ______________ गोत्र: ______________ दूरध्वनी क्र./Email : ______________

संपूर्ण पत्ता (राहण्याचा) : ______________________________

______________________________

______________________________

मी दिलेली सदर देणगी ही संस्थेच्या **''स्व. एकनाथ ठाकूर कर्करोगग्रस्त निधी''** फंडात जमा करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : ______________________________

दिनांक : ______________________________ देणगीदाराची सही ______________________________

देणगी देण्याकरिता धनादेश/NEFT/RTGS खालील माहिती प्रमाणे करावे.

- नाव : ''गौड ब्राह्मण सभा''
- ब्रँच : गोरेगाव (पूर्व), रघुनाथ कृपा, वालावलकरवाडी
- बॅंक : सारस्वत को-ऑप. बँक लि.
- A/c : 002200100027556
- SRCB- 0000002

संपूर्ण नाव, पत्ता, फोन नंबर आणि Email :

१) ______________________________

२) ______________________________

---

**(कार्यालयीन वापराकरिता)**

पावती क्रमांक :

दिनांक :

व्यवस्थापक मंडळाच्या दि. _______ च्या सभेत नोंद घेतली.

कार्याध्यक्ष (सही) : ______________________________

कार्यवाह (सही) : ______________________________

खुर्चीवर बसला होता ती खुर्ची पूर्ण पुसून काढली. नमूला हा प्रकार विचित्रच वाटला. तिनं घरी गेल्यावर नवऱ्याला ही गोष्ट सांगितली. त्यापासून नमूचा नवरा कावेरीकडे येईनासा झाला.

मग नमू फक्त मुलाला घेऊन यायला लागली. नमूबरोबर राघूही येणार म्हटल्यावर कावेरीच्या पोटात गोळाच यायला लागला. राघू कुठंकुठं हात लावणार, इकडे तिकडे फिरणार व त्याच पायांनी कॉटवर चढेल. मग कॉटवरची चादर धुवायला काढावी लागणार. कुठंकुठं लक्ष देणार, कुठल्या कुठल्या जागा पुसून काढण्यासाठी लक्षांत ठेवणार, या विचारांनी कावेरी कासावीस होऊ लागली. नमूला तेही जाणवलं. म्हणजे आईला जावई तर नकोच पण नातूही नको झाला? मग नमू आईकडे एकटीच यायला लागली.

पुढे पुढे कावेरीचा हा प्रकार वाढत गेला तेव्हा नमू घाबरून गेली. तिला फार वाईट वाटत राहिलं. तिनं आईला मानसोपचारतज्ज्ञाकडे जाऊया का असं नुसतं म्हटलं मात्र कावेरी जी भडकली व 'काय म्हणालीस? कार्टे, मी काय मॅड झालेय?' वगैरे नमूला तासभर नुसती फडाफडा बोलत राहिली. जणू नमू कावेरीवर अस्वच्छताच लादत होती.

आता तिला काय जबरदस्तीनं इंजेक्शन वगैरे देऊन बेशुध्द करून डॉक्टरकडे घेऊन जायचं? कोणा ज्योतिषाला वगैरे काही विचारायचं तर आईची पत्रिकाच नव्हती. आईला कोणाची कसली बाधा झाली आहे! सर्व देवांना गाऱ्हाणी घालून झाली, नवसाचा एकही देव नमूनं सोडला नाही. तिला आईला होणाऱ्या या प्रकाराबद्दल आत्यंतिक दु:ख व भितीही वाटत आहे. काय करावं हेच न कळेनासं होऊन नमू सैरभैर होऊन गेली आहे.

ज्ञातीबांधवहो, आपल्या माहितीत असे विचित्र विकृती असलेले स्त्री पुरूष असतील का? नमूला आपण काय उपाय सुचवू शकता?

**श्री. बा. प्रभु तेंडोलकर,**
गोरेगांव, मुंबई.
मो. ९८२०६३५४१०

## कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड

| | |
|---|---|
| **श्रीमती मोहना मोहन वालावलकर** }<br>**श्री. मोहन रमाकांत वालावलकर** } | ₹ २५,०००/- |
| **Ms. SANKET LOGTESYS PVT. LTD.** | ₹ २५,०००/- |
| **सौ. सुषमा सुभाष सामंत (अंधेरी)** | ₹ २५,०००/- |
| **श्री. आप्पाजी गजानन सामंत-**<br>(चुलते स्व. बाळकृष्ण आप्पाजी सामंतस्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **डॉ. सुरेश भास्कर आजगांवकर** | ₹ २५,०००/- |
| **सौ. अनिता नीतीन गायतोंडे** | ₹ २५,०००/- |
| **श्री. सुधाकर लक्ष्मण धोंड सायन**<br>(पत्नी कै.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्री. निहार खानोलकर** | ₹ २५,०००/ |
| **श्री. रोहित रजनीकांत नाईक**<br>(स्व. जनार्दन भास्कर तेंडुलकर यांच्या स्मरणार्थ) | ₹ ४०,०००/- |
| **सौ. श्रद्धा राहूल सामंत व**<br>**सौ. विना विष्णू प्रभू** | ₹ २५,०००/- |
| **डॉ. जयश्री नाईक नातू** | ₹ २५,०००/- |
| **सौ. शिल्पा जयंत रामदास व**<br>**श्री. विष्णू व्ही प्रभु** | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती सरोज खानोलकर (यंग)** | ₹ २५,०००/- |
| **श्री. विद्याधर प्रभाकर वैद्य** | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती शुभांगी तुकाराम सामंत**<br>(स्व. तुकाराम वामन सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |

❑ ❑ ❑

*With Best Compliments From*

**UNIQUE**

**Unique Photo Offset Services**

**Ashok Nerkar**

132, Adhyaru Industrial Estate,
Sun Mill Compound, Lower Parel,
Mumbai 400 013.
☎ : 2496 4632, 2496 4633, 5660 6881
Fax : 5660 6882

*With Best Compliments From*

# M/s Gromotech Agrochem Pvt Ltd

E-40, MIDC, Islampur

# Shri Anang Babaji Mainkar

Vrindavan, Nakshatra Park,
Kolhapur.

# मध्यस्थ

सौ. अंजली श्याम सामंत, विरार.
मो. : ९७६६५४७२३८



सौ. अंजली सामंत

''मुलगा म्हणाला, आई दिव्याची वात मोठी कर, मला वाचता येत नाही।
वडिल म्हणाले, अग दिव्याची वात कमी कर, मला झोप लागत नाही।
आई रात्रभर वात कमी जास्त करीत राहीली ।
आयुष्यभर दोघांमध्ये वातीसारखी जळत राहीली।।''

असच आयुष्य अनेक स्त्रियांच्या वाट्याला येत व याचं कारण मला वाटत घरामध्ये परस्परांत सुसंवाद नसणं. काही घरांमध्ये बाबांच स्थान हे एखाद्या जेलरच्या वॉर्डन सारखं केलेल असते. काही आया अगदी अभिमानाने सांगतात. तो/ती ना फक्त बाबांना घाबरतो बाकी कुणाला नाही. अस का? बाबा काय कुणी बागुलबुवा आहे का घाबरायला? काही आईंच पालुपद सुरू असत, 'अस करू नकोस हं बाबा ओरडतील', 'तस करू नकोस हं ते बाबांना आवडणार नाही'; 'थांब आता हे आले की त्यांना तुझ नावच सांगते, मग खा मार' अशाप्रकारच्या सततच्या हॅमरिंगमुळे ह्या मुलांच्या मनात बाबांबद्दल एक अढी निर्माण हाते. ते नकळतपणे बाबापासून दूरदूर होत जातात. व आईच्या अधिक जवळ जातात. ते आपले बाबा आहेत. ते कोणीतरी मोठ्ठे आहेत. आपल काही चुकता कामा नये नाहीतर ते रागावतील एवढच त्या छोट्या जीवाला कळत असत. आपली सहज बोलली गेलेली वाक्य, कशावरूनही बाबांच चिडण, ओरडण अशा गोष्टीतून त्यांच्या नात्यामध्ये एक दरी निर्माण होते. मुलं अनेक गोष्टी वडिलांपासून लपवायचा प्रयत्न करतात. काही ठिकाणी बाबांच्या शिस्तीचाही अतिरेक असतो. आमच्या शाळेत मुलाने काही मोठी चूक केली असेल तर त्यांच्या पालकांना बोलावल जात तेव्हा वडिलांच्या ऐजवी बहुतकरून आईच येते. वडिलांपर्यंत ती गोष्ट पोहोचु दिली जात नाही. का तर त्यांना कळल तर ते त्याला/तिला खूप मारतील, उपाशी ठेवतील, घरातून हाकलून देतील वगैरे अशा अनेक गोष्टी ती माऊली असहाय्यपणे सांगत असते. एकदा तर एका पालकाने मुलाची चूक ऐकून आमच्या समोरच कमरेच्या पट्ट्याने त्या मुलाला मारायला सुरूवात केली. हा जो एकदम टोक गाठण्याचा प्रकार आहे तो ही राक्षसी आहे. काही घरांमध्ये बाबा घरी यायची वेळ झाली की एकदम चिडीचूप. एवढाही धाक नको ना! व आपल्याला सर्व घाबरतात याचा काहीजणांना खूप अभिमान वाटतो. पण अशी माणस उत्तरार्धात खूप एकटी पडतात. नंतर त्यांना सर्वांशी खूप बोलायचं असत पण त्यांच्याशी बोलायला कुणी तयार नसते. कारण त्यांनी आधीची स्वत:ची इमेजच तशी तयार केलेली असते. अरे क्षणभंगुर आपल आयुष्य तिथे हा असला व्यर्थ अभिमान कशाला? मला कुसुमाग्रजांच्या या ओळी खूप आवडतात.

माती म्हणते,
अभिमानी मानव ! आम्हाला अवमानी
बेहोष पाऊले पडती आमुच्यावरूनी
त्या मत्त पदांना नच जाणीव अजुनी
की मार्ग शेवटी सर्व मातीला मिळती
मातीवर चढणे एक नवा थर अंती।।

हल्ली आपल्या आयुष्याचा बराचसा हिस्सा टीव्ही, मोबाईल वा अन्य साधनांनी व्यापलेला आहे. काही घरात तर अगदी जेवणाची वेळ सुद्धा सिरीयलच्या वेळेवर अवलंबून असते. जेवतानाही सर्व लक्ष त्या सिरीयलवर केंद्रित असल्यामुळे एकमेकांशी संवाद खूपच कमी होत असतो. मला आठवतय आमच्या लहानपणी एक चौकटीच आयुष्य होत. शाळेतून आल की आई छान गरमागरम थालीपीठ वगैरे खायला द्यायची. नंतर थोडसं खेळून यायचं नंतर अभ्यास, परवजा, पाढे आणि मग जेवण. आमच्या त्या रात्रीच्या जेवणाला मजेत बाबा पार्लमेंट म्हणायचे. या पार्लमेंटमध्ये आम्ही प्रत्येकजण दिवसभरात काय काय घडल ते सांगायचो. अनेक जोक्स व्हायचे. खूप हसत खेळत आमच जेवण व्हायचं. अनेकदा बाबा त्यांच्या घराच पूर्वीचं वैभव, नंतरची भाऊबंदकी व त्यातून झालेला ऱ्हास या गोष्टीही सहज बोलता बोलता सांगून जायचे. या गोष्टीतूनच नकळतपणे कस वागाव. कस वागू नये हे संस्कार मनावर होत गेले. आमचे बाबा हे आम्हाला नेहमी मित्रच वाटले. आता या चौकटीच्या आयुष्याची अपेक्षा अजिबात नाही. प्रत्येकाची कामाची वेगवेगळी क्षेत्र, त्यांच्या वेगवेगळ्या वेळा यामध्ये हे सार कठीण आहे. पण आपण एकत्र असतानाही डोकं त्या मोबाईलमध्ये असण चूकच आहे ना?

आपलं लोकशाही राष्ट्र आहे असे आपण अभिमानाने

*With Best Compliments From*



**CUSTOM HOUSE AGENT NO. 11-221**

# S. N. Mainkar & Sons

Founded by :

**Late Shri S. N. Mainkar**
**in 1947**

**Airport Office :**
B-7, Roy Apartment,
Sahar Air Cargo Complex,
Andheri, Mumbai 400 099.
Tel.: 26817900 / 26817901
(R) : 24324399, Fax : 26817902

**Mumbai Office :**
2nd Floor, VEDEOCON HOUSE
Calicut Street Fort, Mumbai 400 038,
Tel.: 22613227, 22614408,
(R.) : 24378791, 24314402
Fax : 22622287

म्हणतो व मला वाटत हीच लोकशाही पद्धत आपल्या घरातही असावी. की जिथे घरच्या प्रत्येक सदस्याला आपल मत मोकळेपणाने मांडता येईल. घरात खेळीमेळीचे वातावरण असेल. नेमकी याचीच कमतरता अनेक घरांमध्ये असते व अशा घरामध्ये 'मध्यस्थ' या पदाचा उदय होतो. या पदाची जबाबदारी अशी असते की, ती सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. कारण तिथे आपलेच दात व आपलेच ओठ असतात. खूप वर्षांपूर्वी टीव्हीवर 'मध्यस्थ' नावाच एक नाटक पाहिलेले आठवतयं. तीनच पात्र होती त्यात. अरुण जोगळेकर (बाबा) लालन सारंग (आई) व महेश मांजरेकर (मुलगा) मुलगा व नवरा या दोघांमध्ये स्त्रीची होत असलेली घुसमट लालन सारंग यांनी खूप छान दाखवली होती. आज अनेक स्त्रिया ब्लडप्रेशर, डायबेटीज, सतत काळजात धडधड यासारख्या आजारांनी त्रस्त दिसतात. त्याच कारण आहे सतत चिंता, घरातले तणावग्रस्त वातावरण व त्यात तिला करावी लागणारी मध्यस्थी. घरात क्लेश नको, शांतता हवी म्हणून दोन्ही बाजूच्या सैन्याला थोपवण्याचे/सांभाळण्याचे ती आटोकाट प्रयत्न करीत असते. दोन्ही पक्षांना आनंदी ठेवण्यासाठी अनेक गोष्टी सहन करीत राहते. हे सहन करणचं हळूहळू तिचा विकपॉईंट बनत जातो. एकाच छता खाली राहणाऱ्या कुटुंबातील मुल आणि पती यांच्यातला ती दुवा बनते. आताच्या भाषेत तिची जागा मेलबॉक्सची झालेली असते. मुलांकडून वडलांना व वडीलांकडून मुलांना द्यायचे मैसेज याच मेलबॉक्समध्ये (जरा कटू शब्दात) धडकत असतात. नंतर योग्य वेळ पाहून ते मैसेज फिल्टर करून सौम्य शब्दात सेंड करायची मोठ्ठी जबाबदारी तिच्यावर असते. तेव्हाची तिची ती कसरत. तिच अगदी आर्जवाने पतीशी बोलणं, 'अहो ऐकलतं काय? मी काय म्हणते... तिच पुढचं ऐकायच्या आधीच पती ठरलेली वाक्य तिच्यावर फेकतो, 'मला काहीही ऐकायचं नाही. तू त्याची/तिची वकीली करायला आली असशील. बरोबरच आहे तुझ. आता कमावता आहे ना तो... आम्ही काय आता.... इ.इ. प्रसंगानुसार. मुलाकडे ती काही बोलणार, 'अरे मी काय म्हणते, तू माझ थोड ऐकशील का? 'लगेच मुलगा', आई तू तर काही बोलूच नकोस. तुला त्यांची चूक कधी दिसणारच नाही. प्रत्येक वेळी आम्हीच चुकतो ते कायम बरोबर. त्यांना सांग कधीतरी स्वत:ची चूक मान्य करा. आम्ही करतो त्या सर्व चुका आणि ते करतात त्याला काय म्हणायच ग खिळे?' अशाप्रकारचे तात्विक, वैचारिक वाद थोड्याफार प्रमाणात सर्व ठिकाणी सुरु असतात व त्यावेळी तिचा काही दोष नसताना असे दोन्ही बाजूनी आसूड तिच्यावर बसत असतात व त्यामुळे आतून ती रक्तबंबाळ होत असते. त्यावेळची तिच्या मनाची तगमग तिच आयुष्य पोखरत असते. तिची ही मध्यस्थी फक्त मुलं आणि पती यांच्यातच असते असं नाही तर पुढे स्वत:च्याच दोन मुलांमध्येही तिला ही मध्यस्थी करावी लागते. तिथेही तिला अशीच कटू फळ चाखायला मिळतात. घरचे वाद चव्हाट्यावर येऊ नये म्हणून हे सारे विषाचे घोट निमूटपणे गिळत असते. क्वचित काही घरांमध्ये ही मध्यस्थाची भूमिका बाबांची असते. कारण आई साध्या साध्या कारणावरून दुर्गेचा अवतार धारण करते. तर काही घरांमध्ये मुल ही भूमिका निभावतात. पण हे चित्र फार कमी आहे. स्त्री नोकरी करणारी असेल तर तिच्यासाठी हे थोड तरी सुसह्य असते, कारण बाहेर थोड तरी तिच मन रमतं. पण घरातच असणाऱ्या स्त्रीला हे खूपच त्रासदायक असत 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अशी तिची परिस्थिति असते. टीव्हीवर कोणता कार्यक्रम लावायचा या त्या दोन पक्षात तिची आवड कुठल्या कोपऱ्यात जाते ते कळतच नाही. एकेकाळची चांगली खेळाडू. गायन स्पर्धेत बक्षिस मिळवणारी, एका बैठकीत पुस्तकाचा फडशा पाडणारी ती या साऱ्यात कुठे लुप्त होते कळतच नाही. स्वत्व विसरून तिची धडपड सुरू असते ती फक्त स्वत:च घरकुल सावरण्यासाठी. शांता शेळके म्हणतात, 'स्त्री हा घराचा खांब आहे' ते शब्दश: खरे आहे. सार घर या खांबाने पेलून धरलेल असत. घराच्या कल्याणासाठी केलेल्या होमामध्ये तिने स्वत:च्या आवडी निवडींच्या वाहिलेल्या समिधा फार थोड्यांच्या लक्षात येतात. हे तिच समर्पण जेव्हा सारे लक्षात घेतील तेव्हा तिच स्थान खूप वेगळ असेल व मध्यस्थाच पदही लुप्त झालेल असेल. कारण तेव्हा असेल घरात स्वच्छ मोकळ वातावरण त्या घराला घरपण असेल त्या नात्यांना अर्थ असेल. कवीच्या या ओळी तिथे सार्थ ठरतील

**''घर असावे घरासारखे नको नुसत्या भिंती।**
**तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती॥''**

आपणा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!

ता.क.- ज्या घरात 'मध्यस्थ' आहे त्यांच्यासाठीच हा लेखप्रपंच आहे.

❑ ❑ ❑

*With Best Compliments From*

# NSB PROPERTIES

B-8, Bageshri, Shankar Ghanekar Marg,
Prabhadevi, Mumbai 400 025.
Phones : 24463599, 2441360 Fax : 2448192
E-mail : nsbproperties@yahoo.com



**NSB Properties is a constituent of the 35 years old NSB Group having interest in the fields of Training, Finance and Real Estate Development. NSB Properties is committed to develop landmark projects on a firm bedrock of Construction Quality and Customer Delight.**

**NSB Properties has completed several residential projects (including redevelopment) in Mumbai (Vile Parle, Goregaon, Dadar), Pune and Goa.**

**Do get in touch with us if you wish to re-develop your property.**

# प्रवास हा सुखाचा

– पूजा सामंत



पूजा सामंत

'माणसानं सदैव आनंदी असावं, आनंदात आयुष्य जगावं' असं आपण नेहमीच ऐकतो, म्हणतो, वाचतो... पण प्रश्न असा आहे, 'आनंद म्हणजे काय?'

आलिशान बंगला, भरजरी कपडे, किमती दागिने, महागड्या गाड्या, भरपूर पैसा म्हणजे आनंद असतो का?.... ही न संपणारी यादी आहे. आनंदी असण्यासाठी या सर्व गोष्टी असायलाच पाहिजेत का? याशिवाय माणूस जगूच शकणार नाही का? मदर तेरेसा, बाबा आमटे, प्रकाश आमटे ह्यांना पाहिले की वाटते, हेच खरे आनंदी जीवन... अशीच लोक खऱ्या अर्थाने आनंदी जीवन जगली... त्यांना खरा आनंद इतरांना मदत करण्यात गवसला. हीच खरी सर्वाधिक आनंदी माणसं...

आनंदाचा एक निरागस खळळता झराच प्रत्येकात असतो... आपला आनंद हा आपल्याच विचारांवर अवलंबून असतो... तो जाणा, दुसऱ्यापर्यंत पोचवा आणि अनुभवा. त्याचा कितीतरी पटीनं अधिक मिळणारा परतावा... आनंद द्या आणि कितीतरी पटीनं आनंद अनुभवा... आयुष्यात नुसतीच भागदौड नको. जगण्यासाठी पैसे मिळवताना आयुष्य जगायला विसरू नका. धकाधकीच्या आयुष्यात थोडा वेळ काढा. आजूबाजूच्या सौंदर्याचा आस्वाद घ्या. फुलपाखरांचे बागडणे, पक्ष्यांचा स्वच्छंदी विहार, मनमोकळा चिवचिवाट, कुजबूज ऐका... पावसाळ्यातील मोरांचा मनस्वी नाच बघा, हिरवीगार वनराई न्याहळा, पाण्याचा खळखळाट, समुद्राचे रौद्र तांडव बघा... छोट्या छोट्या गोष्टींची निखळ मजा अनुभवत आयुष्य जगणं म्हणजे आनंद. आनंद हे स्वागताचं, हर्षाचं, समृद्धीचं प्रतीक आहे. आनंदी आठवणी दीर्घ काळ स्मरणात राहतात.. जगायला अन जगवायला शिकवितात, आपल्यातील ऊर्जेला विधायक दिशेने गतिमान करतात आणि आपल्याला जाणीव करून देतात, खरंच आयुष्य खूप सुंदर आहे, ते भरभरून जगा.

अनुभवी प्रवासी आणि नवखा प्रवासी यांच्यातील फरक आपल्याला चटकन लक्षात येतो त्यांच्याजवळ असलेल्या सामानाच्या ओझ्यावरून, तसेच आयुष्याचे आहे. अनेक लोक प्रवास करताना अकारणच भाव-भावनांचे प्रचंड ओझे घेऊनच प्रवास करीत असतात, ते कमी करायला, शिकायला हवे. ओझे कमी ठेवून प्रवास करणे, म्हणजे आपले प्राधान्यक्रम ठरवणे आवश्यक आहे. तेवढ्याच गोष्टी जवळ घ्या आणि हो प्रवास करताना क्षमेचा भरपूर वापर करीत रहा.

आयुष्यात आपल्याला कोठे पोचायचे आहे? काय मिळवायचे आहे? हे ठरवा; परंतु या शोधाची शिकार ठरू नका. नुसतेच त्याला कवटाळून बसू नका. आयुष्य म्हणजे नुसतेच उद्दिष्ट गाठणे नाही, तर आयुष्य हे जेथून निघायचे आणि जेथे पोचायचे यांच्यामध्येच घडत असते. या प्रवासाची मजा घ्या. आपण जेव्हा महामार्गवरून जलद गतीने प्रवास करीत असतो, तेव्हा आपण सतत मैलांचे दगड मोजतो का? तसेच इतरांच्या चुकांकडे दुर्लक्ष करा, त्यांना क्षमा करायला शिका... आणि आपल्या अवती-भोवतीच्या लोकांना शक्य होईल तेवढी मदत करा.

आयुष्य हे पेन्सिलीने, खोडरबराशिवाय चित्र काढण्यासारखे आहे. हे एक कौशल्याचे आणि कलात्मक काम आहे. आपल्याला शंभर टक्के वळता येत नाही. घडलेल्या घटना, चुका पुसून टाकता येत नाहीत; परंतु खूप उशीर होण्यापूर्वीच यू टर्न घेऊन नवीन मार्गाने सुधारित प्रवास करू शकतो.

बऱ्याचदा आपण आपल्या आयुष्याबाबत असमाधानी असतो. कुरकुरत असतो; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे कितीतरी जणांना आपल्या याच आयुष्याचा हेवा वाटत असतो. एक छोटासा मुलगा आपल्या झोपडीसमोरील शेतात खेळत असताना, त्याला आकाशात विमान उडताना दिसते आणि तो उडण्याची स्वप्नं बघू लागतो... त्याच वेळी

With Best Compliments From

# NATIONAL CHEMIST

**ISO 9001 = 2008 Certified**

**Since 1965**

Shop No. 4/5/6, Veer Savarkar Marg,
Near Hinduja National Hospital, Mahim, Mumbai 400 016.
Tel.: 24466591 / 24451608
Telefax : 022-24440079
E-mail : Nc_Drug@hotmail.com

## UNIT ROMA ENTERPRISES PVT LTD.

3 Awards Winner for 'Best Maintenance of Chemist Shop',
From Pharmacy Council.

**A Guarantee of Unmatched Safety & Quality**

त्या विमानाचा पायलट त्याच शेतातील त्याच मुलाची तीच झोपडी बघतो आणि स्वत:च्या घरी जाण्याची स्वप्नं रंगवू लागतो... आहे की नाही अजब!... ह्यालाच आयुष्य म्हणतात. म्हणून प्रत्येक क्षण आनंदाने जगा...

आयुष्य म्हणजे अतिशय मुलायम, सुखद असा एकेरी वाहतुकीचा मार्ग नाही. प्रवासातील वाटेवर अनेक आव्हाने, अडथळे यांचा सामना करावाच लागतो.

'मला पैशाची गरज नाही', असे समजून काम करा, 'कोणी बघत नाही, असे समजून नृत्य करा.', 'कोणी ऐकत नाही', असे मानून गाणे गा... 'कधीच दुखावलो नाही' असे मानून प्रेम करा... 'पृथ्वीवर स्वर्ग अवतरला' असे मानून जगा... थोडे अधिक... अधिक चाला... कुणी सांगावे आयुष्याच्या या आपल्या थोड्या-अधिक वाटचालीत आपल्याला काय-काय चमत्कार दिसतील ते. विलक्षण साहस करावे लागेल... सुरेख आणि छानदार स्थळे गवसतील, अकस्मित घटना, प्रसंगांना सामोरे जावे लागेल. विलक्षण प्रेम करणारी माणसे भेटतील... शेवटी देवाने आपल्याला हे सुंदर आयुष्य दिले आहे, त्याचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त करायला मात्र विसरू नका.

---




जुलै-ऑगस्ट- सप्टेंबर ह्या गौड ब्राह्मण त्रैमासिकामध्ये प्रसिद्ध झालेल्या गोत्र प्रवर मालीकेमध्ये गोळवण येथील नाईक कुटुंबाची कुलदेवता ही श्री शांतादुर्गा असून त्याचे मंदिर ही गोळवण येथे असून त्याची नित्य पूजा व वार्षिक उत्सव ह्या देवस्थानात होत असतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यात ''गोळवण'' ह्या निसर्गरम्य गावात नाईक परिवारांची सुमारे १५० वर्षापूर्वी ''श्री शांतादुर्गा देवीची'' स्थापना केली. धातूच्या मूर्तीची झीज होत गेल्याने ह्या गावाचे एक सुपुत्र श्री. रमेश नाईक यांनी आपल्या परिचित व्यक्तिंमार्फत सुमारे २ १/२ फूट उंचीची पाषाण मूर्ती संस्थेस अपूर्ण केली असून तीची प्राणप्रतीष्ठा १३ मे २००१ रोजी करण्यात आली.

With Best
Compliments From

**Sanjay Walawalkar**

**M. : 9820076814**
**sanjay walawalkar@Jupiter services.com**



**JUPITER SERVICES**

**Associate Working Partner of**

**INDUS TOWERS LIMITED**

(A Venture of Airtel, Vodafone & Idea)

With Best Compliments From



**Founder - Late Shri Dattatreya Ramchandra Samant**

# M/s. SHRIRAM WAREHOUSING AGENCY

14/16, Arches, Below Mahalaxmi Bridge,
Race Course Side, Dr. E. Moses Road,
Mahalaxmi, Mumbai - 400 034.
**Phone : 23549584**

# स्पर्श

- जयबाला परुळेकर
मो. : ९६६४०६३४०३


जयबाला परुळेकर

निसर्गाने मानवाला बहाल केलेली मोठी देणगी म्हणजे पंचेद्रिये. या पंचेद्रियानी आपण रुप, गंध, रस, स्पर्श आणि नाद यांचा अनुभव घेत असतो. यामुळे आपले जीवन अधिकाधिक समृद्ध व सुंदर होत जाते. सगळीच इंद्रिये व त्यावाटे येणारी अनुभूती सर्वच महत्त्वाच हे खरं असले तरी मला मात्र आज स्पर्श या अनुभूतिबद्दल लिहावसं वाटतय. आंधळे गंध जाणून घेतात, रुप अंत:चक्षूने बघतात, रस अनुभवू शकतात, नाद ऐकू शकतात. पण त्यांना स्पर्शाची भाषा पटकन कळते. आपण डोळस असलो तरी कितीतरी स्पर्शच हवासा वाटतो.

स्पर्श किती वेगवेगळे असतात. प्रत्येक स्पर्शातून वेगळा अनुभव, वेगळा आनंद, वेगळ्या संवेदना, वेगळे आर्जव, प्रेम, आश्वासन, वेगळे तरंग.

तान्ह्या बाळाला आपण उचलून घेतो. कधी कधी त्या बाळाचे आपण कोणी नातलगही नसतो. तरी सुद्धा त्या कोमल मुलायम स्पर्शाने किती आनंद मिळतो. आपण भावनेने उचंबळून येतो, आनंदाने फुलून जातो. आपण मोठे होतो तेव्हाच्या स्पर्शाने आपले? मातृपितृ भावना जागी होते. शाळेत जाण्याऱ्या बालकाला आपण हात धरून नेतो त्याला त्यावेळी आपल्या स्पर्शात आधार जाणवतो. त्याची बाहेरच्या जगाची भीती तो स्पर्श नाहीशी करतो. हळुहळु शिकणारा मुलगा कॉलेजमध्ये जातो. मित्रमैत्रिणीच्या स्पर्शाने त्याला तारुण्याची जाणीव होते. एक प्रेमाची वेगळी संवेदना त्याला होते. तारुण्यात त्याचवेळी एखादा जाणूनबुजून नको त्या जागी झालेला स्पर्श एक किळसवाणा अनुभव देऊन जातो. आपण आपल्याला जपले पाहिजे ही जाणीव तो स्पर्श शिकवून जातो.

आईच्या मांडीवर झोपलो असलो की तिचा डोक्यावरून अंगावरून फिरणारा हात अभ्यासाच्या श्रमाचा थकवा फेकून देऊन आपल्याला फ्रेश करतो. तिच्या मायेच्या स्पर्शात केवढी ताकद व माया असते.

खूप वर्षांनी मित्रमैत्रिणीला कडकडून मिठी मारल्याशिवाय भेटले याचे समाधानच मिळत नाही.

चांगल्या कामासाठी आईवडिलांना नमस्कार करताना त्यांच नुसता अबोल स्पर्श डोक्यावर होताच शब्दाविना सारेच आशीर्वाद बोलून जातात. परदेशी निघतांना नमस्कार करताना डोक्यावरून फिरणाऱ्या स्पर्शातून आई-वडिलांची हुरहुर, काळजी, प्रेम आणि अभिमानही कळतो. लग्नाला मुलगा पाया पडतो तेव्हाच्या स्पर्शात आपण सगळ पार पडल्याची भावना असते. तर मुलगी पाया पडताना कर्तव्यपूर्तीबरोबर, हुरहुर, एक पोकळी अशा अनेक संमिश्र भावनांचा पाऊस त्या स्पर्शातून आपल्यावर वर्षाव करतो.

बॉस एखाद्याची नियुक्ती झाली म्हणून हस्तांदोलन करतो, तेव्हा तो स्पर्श आपण जग जिंकल्याची भावना देऊन जातो. डॉक्टर, नर्स या लोकांचा स्पर्श किती आश्वासक वाटतो. पुजाऱ्याचा स्पर्श आपल्याला निवांत करून जातो. सांत्वनाला तर शब्दापेक्षा स्पर्शच हवा असतो. तो स्पर्श धीर देणारा असतो. दहा वाक्यांनी व्यक्त होणार नाही एवढी भावना त्या व्यक्तिस स्पर्शातून कळते.

आमच्या डिग्निटी सेंटरची संचालिका समताजी नमस्ते करून आलिंगन द्यायच्या तेव्हा खरोखरच त्या आपुलकीच्या आदराच्या स्पर्शाने अंगात ऊर्जा यायची. खरं म्हणजे शास्त्रीयदृष्ट्या सुद्धा ते खरंच आहे हे मला नंतर कळले. तसच तायची हा चायनीज व्यायामप्रकार शिकवणारे सर ध्यानानंतर हात चोळून केलेल्या उबदार स्पर्शाने त्यांचा संयम आणि तपस्या कळायची. एकदा एक तरूण मुलगी शिकवायला आली. मेडिटेशन झाल्यानंतर तिनेही असेच हात चोळून निदान दहा जणांच्या तरी डोक्यावर तिचे हात दाबून ठेवले आणि आम्हाला प्रत्येकीलाच तिची ऊर्जा मिळाली. केवढे नवल.

मंदिरातील, मठातील एखाद्या साधुसंताचा स्पर्श द्विधा व त्रस्त मनाला शांतवून जातो.

स्पर्श हा दोन व्यक्तिमध्येच असतो असं नाही. तर

With Best Compliments From

ANATEK SERVICES PVT. LTD.

8, Valmiki Apartment, C.S.T. Road,
Kalina, Mumbai 400 098.
Tel.: 2610 9608 / 4285, 2615 5475 / 76
Fax : 2610 4121
E-mail : anasales@rediffmail.com / anatek@vsnl.com

वस्तुवस्तूत आहे. कधी ती सजीव असते तर कधी निर्जिवही असू शकते. झाडाझुडपांना तर माणसांच्या स्पर्शाची भाषा कळते. लाजाळूच्या झाडला स्पर्श करताच त्यांची पाने मिटू लागतात. उधळणारे घोडे त्याच्या मालकाच्याच स्पर्शाने शांत होतात. गजाननमहाराजांनी नाही का एका द्वाड घोड्याला शांत केले होते. गाई गुरे ठराविक माणसाच्या स्पर्शाने जास्त दूध देतात. डॉल्फिन माशांचे शो होतात ते फक्त स्पर्शाच्या शिकवणीतून. मांजरांचा लडिवाळ स्पर्शसुद्धा एकटेपणा दूर करतो.

आपल्याला भेट मिळालेले पहिले पेन आणि इतरही काही वस्तू कदाचित मौल्यवान नसतील पण त्यांच्या स्पर्शाने अनेक आठवणी जागवून जातात. आजीच्या उबदार गोधडीचा स्पर्श किती हवासा वाटतो. आजोबांची खुर्ची, घड्याळ यांना स्पर्श करताना आपले बालपणी झालेल्या कोडकौतुकाची आठवण करून देतात आणि त्या माणसांचे पुन: स्पर्श करून जातात. अगदी दगडालाही शिल्पकाराच्या स्पर्शाने देवपणही मिळते की. एखाद्या श्रीमंत बाईच्या हाताच्या स्पर्शाने कोमलता आणि श्रीमंती कळते. तशी कामवाल्या बाईच्या खरखरीत हाताच्या स्पर्शातून तिचे कष्ट झिरपत आहेत असे कळते.

अशा या स्पर्शाच्या अनुभवाच्या तेवढ्या थोड्याच अशा या अनेकरंगी छटा ! फक्त ते स्पर्श मनापर्यंत पोहचायला आपले मन तेवढे सजग हवे.

# अभिनंदन !

भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी ह्यानी राबवीलेल्या स्वच्छता अभियान उपक्रमामध्ये राष्ट्रीय स्तरावर कोकणातील सिंधुदूर्ग जिल्ह्याला प्रथम क्रमांक मिळाला. ह्या स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झालेल्या, ग्रामपंचायती मध्ये (१) माननीय सौ. साक्षी समीर ठाकूर (सरपंच-आचरा) २) मा.श्री. निलेश दत्तात्रय सामंत कुशेवाड (सरपंच ग्रामपंचायत परोळा) (३) मा. श्री.संतोष पाटील (पाडगांवकर) सरपंच आदुर्ले ग्रामपंचायत ह्या तीनही ज्ञाती बांधवांचे हार्दिक अभिनंदन !

स्थापना : १८९७

**गौड ब्राह्मण सभा**

गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

(नोंदणी क्र. ए ८३२ मुंबई)

***✻ संस्थेचे पदाधिकारी ✻***

(सन २०१५ - २०१६)

***अध्यक्ष***

डॉ. विलास रामकृष्ण देसाई

***उपाध्यक्ष***

श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर

श्री. प्रकाश गजानन पाटील

***विश्वस्त***

प्रा. जगदीश साबाजी वालावलकर

श्री. नरसिंह नारायण पंत वालावलकर

श्री. अच्युत वामन तेंडुलकर

***कार्याध्यक्ष***

श्री. जगजीवन श्रीकांत प्रभु

***कोषाध्यक्ष***

श्री. मनीष गुरुदास दाभोलकर

***चिटणीस***

श्री. सुभाष दत्तात्रय वाघ

श्री. सतीश गजानन सामंत

***कार्यकारी सभासद***

श्री. अरुण शंकर प्रभू, श्री. उमाकांत गणपत महाजन, श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक, श्री. दिनेश प्रभाकर परुळेकर, श्री. विजय श्रीपाद वालावलकर, श्री. प्रसाद जोगदेव बांबर्डेकर, श्री. आदित्य पंढरीनाथ सरनाईक, श्री. प्रदीप प्रभाकर देसाई.

***स्वीकृत सभासद***

श्री. मधुकर दयानंद सामंत

*With Best Compliments From*

# B. P. A / S. ABA WALAWALKAR & FAMILY

For Assistance in Planning, Securing and
Servicing your
Life Insurance & Tax Sheltered Savings
*Please Contact :*

## B. P. Walawalkar

Chairman's Club Member, L.I.C. of India
MDRT Member
Insurance & Investment Consultant

## M. B. Walawalkar

***Authorised Agents of***

- Life Insurance Corporation of India
- The Oriental Insurance Co. Ltd.
- Unit Trust of India
- Small Savings Postal Schemes :
  N.S.C. K.V.P., MIS, Recurring Deposit Scheme etc.,
- Public Provident Fund (PPF)
- 8% R.B.I. Relief Bonds
- Various Mutual Funds
- H.D.F.C. & Company Fixed Deposits
- New Issues - Primary Market

4/E, Madhav Nagar Co-op. Hsg. Society,
115-A, Bhawani Shankar Road, Dadar, Mumbai 400 028.
Tel.: 2422 9535, 2431 1811
Mobile : 9867293272 / 9820150341
E-mail : bpw@hathway.com

# माझे गाव माझे कोकण !

**- सौ. शुभदा अ. पाटकर,** MA.BEd.



सौ. शुभदा पाटकर

''टेढा है, पर मेरा है'' ही उक्ती कोणत्या वस्तूला लागू असणारी नव्हे तर कोकणी माणसाचे हे चपखल वर्णन आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, जांभा दगडाची खडकाळ जमीन, जमीन उत्पादकता कमी, मऊ-पाणी धरून ठेवणारी मातीच नाही म्हणून ती सुपीक असण्याचा प्रश्नच नाही. पावसाळ्यात पाऊस म्हणजे अतोनात पाऊस. पण त्यातला एक थेंब पाऊस जमिनीत झिरपत नाही. पण तरीही तिथे जशा नारळी, पोफळी, काजू, फणस चिवटपणे जगतात, बहरतात तसाच तिथला कोकणी माणूस.

कोकणात कोणा शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची पाळी येत नाही, कारण ऋण काढून सण साजरे करणे त्याला पसंत नाही. त्यामुळे कर्ज देणाऱ्या शासकीय योजनांना तिथे मान्यता नाही. कर्ज घेणाऱ्याला कोकणात मान नाही. गरिबी असून तिथे हुंडाबळी नाही. कोणाकडेच पैसा नाही. त्यामुळे हुंडा देणे आणि घेणे दोन्ही वर्ज्य. कोकणात आता आता भौतिक साधने जात आहेत, तरीही पूर्वीपासून तिथे शिक्षणाचा प्रसार बऱ्यापैकी आहे.

चाकरमानी म्हणजे मुंबईत राहणारे यांच्याकडून येणाऱ्या मनीऑर्डरवर अर्धे कोकण जगत असते. तेव्हा त्यावर सही करण्यापुरता का असे ना कोकणात साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. भैय्या लोक मुंबईत येतात म्हणून कोण वादळ उठते. पण स्वातंत्र्यपूर्व काळापासून अर्ध्याअधिक कोकणी तरुणांनी मुंबईत चार पैसे मिळावेत म्हणून स्थलांतर केले आहे. मुंबईतला चाकरमानी मुंबईत दोन खोल्यांच्या चाळीत राहील, पण गावी मात्र आई-वडिलांच्या मोठेपणासाठी घर बांधेल आणि त्यांचे स्वप्न पूर्ण करेल.

कोकणात राहाणाऱ्यांची घरं थोड्या उंचवट्यावर असतात आणि शेत व बागा सखल भागात, त्यामुळे घरापासून लांब असतात. जमिनीचे तुकडे-तुकडे असतात. त्याच्या मालकीसाठी लोक पिढ्यान् -पिढ्या कोर्टकचेऱ्या करतात. वकिलांसाठी हे एक चराऊ कुरण आहे. शेजारी-शेजारी जे कोर्ट-कचेऱ्या करणारे एकाच बसने शेजारी शेजारी बसून एकमेकांची तिकीट काढत तालुक्याला कोर्टात जातात. ते आणि त्यांचे वकील कोर्टात त्या जागेच्या छोट्या तुकड्यासाठी भांडतात. मग एकाच हॉटेलमध्ये बसून चहा-भजी खातात आणि एकाच बसने घरी येतात. परत कोर्टाची तारीख मिळेपर्यंत अडीअडचणीला ते मित्रच असतात. असे पिढ्यान्‌पिढ्या चालते.

गरिबी असूनही कोकणात भिकारी आढळणार नाही. कोकण्यांना मोठेपणा भारी. प्रत्यक्षात तो नसला तरी तोंडात चिक्कार आहे. भूतकाळात कोकणी रमतो आणि वर्तमानकाळ सुसह्य करतो, भविष्याची उंच स्वप्नं बघतो. कोकणी माणसाच्या तिरकस बोलण्याचा कोणी हात धरू शकणार नाही. तो जर सरळ बोलला तर तो रागवला आहे असे खुशाल समजावे. गुलब्या, पाटकरणी, बेबुटल्या (बेबी) अशी नावांची विचित्र तोडमोड करून ते जवळीक साधतात. वर्षातील पावसाळ्यापूर्वीचे दिवस व नंतरचे थोडे दिवस सोडले तर कोकणात रिकामटेकडे लोक चिक्कार. त्यामुळे खाटेवर पडल्यापडल्या एखाद्या म्हाताऱ्याला एक कप चहाच्या मोबदल्यात गावच्या, राज्याच्या, देशाच्या, जगाच्या बातम्या मिळत असतात. गावात असे फिरते मोबाईल चिक्कार असतात. ही माहिती व मनोरंजनाची साधने आहेत. जो स्वत: फाटकं आयुष्य जगतो तो अधिकारवाणीने दुसऱ्यांना कसं काही जमत नाही याच्या उठाठेवी करतो आणि वर सल्लेपण देतो.

कोकणात देवादिकांचं प्रस्थ जरा जास्त आहे. धार्मिक चाली रीती आहेत; पण ते कोणाचंही नुकसान न करणाऱ्या असल्यामुळे सर्वांना मान्य आहेत. नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीमुळे ही माणसे देवांचा आधार घेतात. घराघरात देवासाठी एक स्वतंत्र खोली असते. त्यात दुनियाभराचे सर्व देव सुखाने एकत्र नांदतात. त्यात पंचक्रोशीतले अनेक महाराजही असतात. घरात एखादा तरी कोणीतरी रिकामा असतो, तो या देवांची उस्तवार करतो. प्रत्येक अंगणात चाफा, जास्वंद, अनंत, आबोली यांची झाडे असतात त्याची तो इतकी सुंदर आरास रचतो की बास! देव्हाऱ्याला गज असलले दरवाजे असतात. म्हणजे देवांना तुरुंगात ठेवून आपण त्यांना बाहेरून बघायचे. देव घराच्या भिंतीवर त्या त्या गावच्या चित्रकलेच्या गुरुजींनी देवादिकांची चित्रे किंवा सिनसिनेरी काढलेली असते आणि खाली आपल्या नावाची

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

२८, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, जे. एस्. रोड, गिरगांव मुंबई ४०० ००४.

**स्थापना : १९२९ (नोंदणी क्र. ६५० ऑफ १९२९ दि. ३०-०७-१९२९)**

E-mail : kdgb.society@gmail.com

## सुलभ कर्ज योजना

**❖ तारणावरील कर्ज ❖**

मागणीच्या दिवशीच कर्ज वितरण
तारण वस्तू : सोने-दागिने,
संस्थेच्या मुदत ठेव पावत्या इ. वर (७५%)
पोस्टाची बचत पत्रे / किसान विकास
पत्रे यावर (९०%)

**❖ कर्ज व्याजाचा प्रचलित दर ❖**

जामीनकीवरील कर्ज दरसाल ११%
तारणावरील कर्ज दरसाल १०%

**❖ बचत ठेव योजना ❖**

**व्याजाचा दर :** द.सा.द.शे. ४%

**❖ कर्ज मर्यादा ❖**

तारणावरील कर्ज रु. ३.०० लाख, शिवाय
जामीनकीवरील कर्ज : उद्योजकांसाठी
रु. २.५० लाख,
इतर सभासदांसाठी रु. २.०० लाख

**❖ मुदत ठेव योजना ❖**

ठेव मुदत : ६ ते १२ महिने - ५.००%
१३ ते २४ महिने - ६.००%
२५ ते ३७ महिने - ७.००%

**● कार्यकारी मंडळ सन २०१५-२० ●**

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. रजनिकांत वासुदेव प्रभु** | अध्यक्ष | **श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक** | सदस्य |
| **श्री. प्रफुल्ल जयवंत खानोलकर** | चिटणीस | **श्री. शैलेश शशीकांत सामंत** | सदस्य |
| **श्री. सुरेंद्रनाथ बाळकृष्ण ठाकूर** | सदस्य | **श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर** | सदस्य |
| **सौ. अंजली अजित मातोंडकर** | सदस्या | **सौ. लता जयदीप सरनाईक** | सदस्या |
| **श्री. सतीश गजानन सामंत** | सहकार तज्ञ संचालक | **श्री. प्रभाकर बाळकृष्ण सामंत** | सहकार तज्ञ संचालक |

**साप्ताहिक सुट्टी : रविवार**
**शनिवार अर्धा दिवस संध्याकाळी ४ ते ७ कार्यालय चालु राहिल.**

दूरध्वनी क्रमांक - मुख्य कार्यालय : २३८६ ०२९०
गोरेगाव कक्ष : २९२७ ५७७४ डोंबिवली कक्ष : ०२५१ २४५३८७६

**(ठेवी व कर्जासाठीच्या नियमांत वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील)**

मोठी लफ्केदार सही सुद्धा. परत जेव्हा अनेक वर्षानंतर घराला रंग काढणार तेव्हा देवघर त्यावर्षीच्या गावच्या ड्रॉईंगमास्तरच्या चित्रकलेने रंगणार.

गावच्या तिठ्यावर म्हणजे जिथे तीन रस्ते एकत्र येतात तिथे एक तरी देऊळ असणार, तिथे कलाकुसर वगैरे नसते; पण भक्ताला आवश्यक असलेली शांतता आणि स्वच्छता मात्र असते. हे देव म्हणजे मूर्तीच असते असे नाही. ओबडधोबड पाषाण, वारूळं, झाड, काहीही चालतं, भक्ती महत्त्वाची. भक्त आणि देव यांच्यातलं कनेक्शन म्हणजे गुरव. तो इतक्या नाटकी पद्धतीने 'गाऱ्हाण' घालतो की त्या गाऱ्हाण्यात कळवळा, धमकी, प्रेम सगळे भाव एकवटलेले असतात. पण वातावरण निर्मिती अशी की विरलेला अर्धा पंचा नेसलेल्या गुरवाच्या बरगड्या मोजून घ्याव्यात. अशा फाटक्या गुरवाचे मागणे मान्य केल्याशिवाय देवाचा तरणोपाय नसतो. जो प्रथमच ऐकतो त्याच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहात नाही. कागदोपत्री जमीनदारी संपली असली तरी कोकणात पिढ्यान्-पिढ्या परंपरेने जमीनदारी जपली आहे. पण ती जाचक नाही. ते एक आई व मुलाचे नाते आहे. अजूनही जमीनदार कुळांची काळजी घेतो आणि मोठेपणा मिळवतो. उदा. कुळवाड्यांकडे मुंबईचे पाहुणे आले तर ते आपल्या परसातले दोन चार मुळे किंवा वाली देणार आणि जमीनदार त्यांना खोबऱ्याची काप बनवायला १०/१२ नारळ आणि आमरस बनवायला पेटीभर आंबे देणार.

कोकणातली घर उतरत्या छपरांची आणि ऐसपैस असतात. प्रत्येकासाठी बेडरूम, घरच्या म्हाताऱ्यांसाठी वेगळ्या खोल्या, देवासाठी स्वतंत्र खोली, बाहेरच्या पाहुण्यांसाठी पुढच्या बाजूला मोठ्ठी ओटी, त्याच्या पुढे खळं म्हणजे अंगण. मागच्या बाजूला एक ओटी, तिथे भाजी चिरणे, नारळ खवणणे, फणस सोलणे इत्यादी बायकांची कामं, मोठ्ठी स्वयंपाक घरं दोन, एक सोवळ्याचं आणि दुसरं माशाच्या जेवणासाठी, मध्ये ऐसपैस माजघर, त्याचा सर्वांनी एकत्र जेवणासाठी, पेजेसाठी, गप्पांसाठी उपयोग करायचा. दोन साठवणीच्या खोल्या, एक घरातले वाणसामान ठेवायला व एक लाकूडफाटा ठेवायला. शिवाय गोठा, मांगर असतात ते वेगळेच. पाळीव प्राण्यांचा मोठा ताफा. १०-१२ कुत्री घराबाहेर आणि १०-१२ मांजर घरात. पण गवताच्या कमतरतेमुळे गाई-गुराचं प्रमाण एकदम कमी म्हणून दूध-दुभतं नाही. मुख्य उत्पन्न नारळ, तांदूळ आणि मासे त्यामुळे मुख्य अन्नही तेच. पण एकही कोकणी स्थूल दिसणार नाही. अर्थात जे कोकणातच राहतात ते.

कोकणातले मोठे उत्सव तीन, गावची जत्रा, गणपती व होळी. स्थानिक देवांचा उत्सव म्हणजेच त्या गावची जत्रा. सर्व गावकरी यात उत्साहाने भाग घेणार. आकाश पाळणे, जादूचे प्रयोग, खाण्याचे स्टॉल, खेळणी आणि छोटी-मोठी वस्तूंची दुकानं, मुला-बायकांनी जत्रा फुलून जाते. रात्रीचं दशावतारी नाटक असत. मुंबईत दाखवलेलं 'वस्त्रहरण' हे दशावतारी नाटकाचं विडंबन आहे. ती एक अतिशयोक्ती आहे. म्हातारे, जाणते नट-तरूण नटांना भूमिका डायरेक्ट करतात. कथानक माहीत असते त्यामुळे संवाद प्रत्येक जण स्वत:चे स्वत:च बनवणार. वर्षानुवर्षे गावागावांत रिकाम्या वेळात नाटकाच्या तालमी चालतात. पण हे अस्सल मनोरंजन आता घराघरात केबल-टी.व्ही. पोहोचल्यामुळे मागे पडेल की काय अशी भीती वाटते.

आता गणपतीविषयी-इथे मुंबईत जेवढे मोठे सार्वजनिक गणपती असतात तेवढे मोठे गणपती प्रत्येकाच्या घरात असतात. देवघरातल्या देवांचं थोड्या दिवसांसाठी शिफ्टींग होतं. ते बाजूला सरकवून गणपतीसाठी जागा केली जाते. गावचं भजनी मंडळ एक दिवसतरी प्रत्येक घरात तास दीड तास भजन करणारच. ते भजन कोणासाठी असतं हा प्रश्नच आहे. कारण पाऊस पडत असतो आणि भजनीमंडळातले ५-२५ जण पायपेटी, तबला डग्गा, झांजा असा सरंजाम घेऊन येणार. मग त्यांच्या मनाजोगती बैठक व्यवस्था घरचा यजमान करणार. तोपर्यंत आलेल्यांना पहिला चहा. मग सूर लागेपर्यंत १/२ तास. एकदा सूर लागला की कोणतेही भजन असलं, तरी सर्वांची चाल एकच. प्रत्येक जण वाद्य वाजवणार नव्हे बडवणार. वाद्यांचा आवाज मोठा त्यापेक्षा गाणाऱ्यांचा आवाज मोठा. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विशेष प्रौढी की हे त्यांनी अनेक वर्षांच्या रियाजाने मिळवलं आहे. मग मध्यंतर चहा-खाणं, हात-पाय मोकळे करणं की परत घसा आणि वाद्य यांची जुळवाजुळव. गणपती बिचारा शांत समईच्या प्रकाशात चिडीचूप बसलेला असतो. या दुसऱ्या भजनी सत्रात पूर्वीसारख्या जोश ना घशात, झांजात, तबल्यात, पेटीत उरलेला असतो थोड्याच वेळात हा गदारोळ संपतो, शांत-शांत होतं. ओटीवर वाकड्या तिकड्या झालेल्या सतरंज्या, घरच्या अस्ताव्यस्त पडलेल्या झांजा, उलटी सुलटी पडलेली आरत्यांची पुस्तकं, आता काहीच शिल्लक नसलेलं पानाचं तबक, उष्ट्या चिकट

*With Best Compliments From*



**Founder - Late R. H. Samant**

# M/s. R. H. Samant & Sons Pvt. Ltd.

***Dealers of :***

*Industrial & Blasting Sand Glass & Foundry Grade*
*Silica Sand, Cement, Minerals, Construction Chemicals.*

**Authorised Distributors of :**

**M/s. AMBUJA CEMENT LTD.**
**M/s. KRISHNA CONCHEM PRODUCTS PVT. LTD.**

D/4, Brick Bunder, Hay Bunder Road, Mumbai - 400 033.
Tel.: 2372 3778 , 2371 5196 ● Fax : 91-022-2375 6334
E-mail : rhsamant@rediffmail.com

चहाच्या बश्या, आरतीच्या विझलेल्या वाती, घरच्या दमलेल्या बायका आणि कोणीतरी विसरून गेलेल्या चिखलाने भरलेल्या तुटक्या जाड वहाणा हे भजनाचे अवशेष दिसतात. घरच्या कोणीच भजन एन्जॉय केलेलं नसते. त्याचं सर्व लक्ष भजनीमंडळाच्या पाहुणचारात, एक मोठ्ठं कार्य पार पडतं हीच त्यांची दिवाळी. त्यामुळे गणपतीत आपल्या दिवाळीसारखा फराळ बनवतात आणि दिवाळीसारखेच उत्साही वातावरण असतं.

संपूर्ण गावची होळी एकत्र असते. इथल्यासारखी उत्तर प्रदेशी रंगपंचमी नसते. गावातल्या नवीन लग्न झालेल्या मुली. आपल्या नवऱ्यांना म्हणजे गावच्या जावयाला घेऊन येतात. पालखी नाचते हा एक जावयाला दाखवण्याचा कार्यक्रम असतो. गावची सर्वजण आळीपाळीने पालखी नाचवतात. पालखी नाचवायला मैदान मोकळं करून देतात. केवढी एनर्जी लागते, बापरे!

एखाद्या चांगल्या प्रसंगी कोणाच्या अंगात येतं. देवाचा संचार होतो. चकवा लागणं, कौल लावणं, नैवेद्य दाखवणं, नवस फेडणं, करणी करणं अशा चिक्कार अंधश्रद्धा आहेत. गरिबीमुळे हे होत असणार, कोकणी माणूस देवभोळा असला तरी बेरकी, मुत्सद्दी, हुशार, तिरकस व नको तितके स्पष्ट बोलणारा आहे. पण तरीही कष्टाचं आणि शिक्षणाचं महत्व ओळखणारा आहे. चटकन सुधारणा आत्मसात करणारा आहे. गावातले ४-५ जण सैन्यात नाहीतर पोलीस खात्यात असणारच असणार. एकदा कधीतरी पोलीस खात्यातले सर्व राणे-परब मोजले पाहिजेत. पण जस घाटावर सहकाराचं महत्त्व जाणून त्यांनी आपला विकास केला आहे तसं राजकीय नेतृत्व न मिळाल्यामुळे सहकाराचं बी कोकणात रूजलेलं नाही. एवढी मोठी किनारपट्टी असून कोकणाने व्यवसाय म्हणून मत्स्यव्यवसायाचा स्वीकार केलेला नाही.

पण आता कोकण रेल्वे सुरू झाल्यामुळे प्रवास सुकर झाला. त्याचा उपयोग नुसतं माणसं जाण्या येण्यासाठी न करता व्यापारासाठी केला पाहिजे. शेती, बागायती, शिक्षण, खनिजं, मासेमारी यातून आपला विकास साधला पाहिजे. तोंडात जरा गोडी आली पाहिजे. पूर्वजांचा मोठेपणा बाजूला ठेवला पाहिजे. आंबे, कोकम, कुळथाची पिठी, आंबेपोळी, कोकमसरबत, लोणची यांचे मोठे उद्योग व्यवसाय केले पाहिजेत. पण मग असं झालं तर कोकणीपणाच नाहिसा होईल.


उन्हाळ्यात सुटट्यांबरोबरच आंब्या-फणसांचा हंगाम सुरू होतो. तेव्हा मुंबईतले कोकणी गावी जाणारच. आता जागतिकीकरणामुळे सर्वच गोष्टी सर्वत्र मिळतात, पण तरीही मुंबईकर चहा-पावडर, म्हैसूरपाक किंवा मुंबईचा हलवा गावी नेणार आणि ''यंदा काय नाय, गेल्या वर्षी बरा होता'' असं म्हणणारा कोकणी त्यांचा भरपूर पाहुणचार करणार. रोजच रस घावणे, खापे घावणे, आंबोळ्या, खापरोळ्या, कायलोळया, शिरवाळ्या असं तांदूळ नारळाचं कॉम्बिनेशन, नाश्ता म्हणून प्रत्येकाला टोपभर भाताची पेज, बशीभर फणसाची नाहीतर, वालींची भाजी, तोंडाला खोबरं किंवा पानावर वाढलेलं घरच्या आंब्याचं ताजं लोणचं. मधे-मधे खायला आंबे, काजू, नारळाची कापं, शेंगदाण्याचे लाडू. खटखटे शेवेचे लाडू, शहाळ्याचं पाणी, परत जेवताना थोडा नाही ढिगाने भात (पहिला-मधला-शेवटचा) नारळाचा रस घातलेली माशाची आमटी, घरच्याच खोबऱ्याच्या तेलात तळलेले ताजे फडफडीत मासे आणि हवी तेवढी कोकमाची कढी. स्वर्गात या पेक्षा वेगळी काय पक्वान्नं असतील? मुंबईत वाटीच्या आणि चमच्याच्या मापाने जेवूनही अपचन होणारी माणस तिथे भरपूर चापतात.

''आमचं सगळं तिकडचेच खातात.'' असं म्हणणारी सून तिकडे गेल्यावर एकेकाला सरळ करणार असते. तशी ती यावेळेला निश्चयच करून आलेली असते. पण प्रत्यक्षात १०-१२ दिवसांत ट्रान्सफर सिन तयार होतो. निघताना जावा-जावा गळ्यात गळे घालून रडतात. परत भेटू न भेटू म्हणून भावा-भावांची मनं कातर होतात. ''आता आम्ही सुखाने मरणार'' म्हणणारे आजी-आजोबा परत परत थरथरल्या हातानी नातवंडांना जवळ घेत राहातात. अख्खा आवाठा बसस्टँडवर निरोप द्यायला येतो. बसचा ड्रायव्हर आणि कंडक्टर कोकणातलेच असतात. ते हे सगळं नाटक पार पडण्यासाठी पुरेसा वेळ देतात. गाडी सुटते. सूपं, रोवळ्या, केरसुण्या, आंबे, काजू, फणस, कोकम, खोबऱ्याची कापं, सूरई, तांदूळ, नारळ यांनी गाडी भरून जाते. शरीरं निघतात पण मनं कोकणात रेंगाळतात. एक एक लाल मातीचा रस्ता, वळण, नारळा-पोफळीच्या बागा मागे पडतात आणि मग डांबरी रस्ता सुरू होतो.

**- सौ. शुभदा अ. पाटकर**
डोंबिवली (पूर्व)
भ्रमणध्वनी: ९८७०६७०१५३

❑ ❑ ❑

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥



# दिगंबर शंकर पुजारी

३२, श्री दत्तगिरी सदन, नरसोबावाडी,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर - ४१६ १०४

स्मरणार्थ/वाढदिवसानिमित्त श्री चरणी महापूजा, अभिषेक, पचांमृतपूजा, ब्राह्मण भोजन इत्यादी सेवा आम्ही श्री. चरणी रूजू करतो.

**श्रींचा सर्वांना आशीर्वाद**

आपला,
**दिगंबर शंकर पुजारी**

**विनंती : आपल्याला उत्तम सेवा देण्यासाठी आपल्या आगमनापूर्वी**
कृपया फोन, पत्र अथवा ई-मेल द्वारे संपर्क साधावा.
फोन नं. (०२३२२) २७०००४, २७०२०१
e-mail: adpujari@yahoo.co.in

# माझी सासू.... बाय

सौ. संध्या माधव देसाई
गोवा- मो. ९९२१४६१७१८

र- रसाळ जिची वाणी आहे
ख- खडसावून कधी बोलणे नाही.
मा- माधुर्य जिच्या नावत आहे.
दे- देवी समान जिला मानावे
वी- वीरतेलाही लाजविणारी

सासू म्हणजे सासू म्हणजे सासू असते. कधी मंद दिव्याची वात तर कधी पेटलेली मशाल असते. ती जेव्हा घरात नसते तेव्हा मला जरासुद्धा करमत नाही. घरात कुणाची, कुठली वस्तू कुठे आहे? सारी नोंद तिच्या मेंदूत पक्की असते. आला गेला पै-पाहुणा सर्वांचेच ती मनापासून स्वागत करीत असते. प्रत्येकाची नवी ओळख तीच करून देते. नको तिथे नको तेवढ खरं बोलून वाईटपणा ती घेत असते. तिच्याच इशाऱ्यावर अवघे घर नाचत असते. तुमची काय माझी काय प्रत्येकाची सासू हेच म्हणत असते. खरे सांगतो मित्रांनो ''सासू म्हणजे कळलं तर सून असते नाहीतर मानगुटीवर बसलेले भूत असते''. प्रत्येकाला मोठेपणा सांगून मला मोठेपणा देत असते.''

वरवर राग आला तरी मनात तिच्या रातराणीसारखी दडलेली एक प्रीत असते. मी जेव्हा कविता रचते तेव्हा ती कविता जगत असते. कधी श्रावणसरी सारखी ती प्रसन्नपणे बरसत असते. तर कधी ग्रीष्मातल्या उन्हासारखी प्रसन्नपणे तळपत असते. तिचं बरसणं काय तिचं तळपण काय सर्वाच्या सुखासाठीच ती हे सारे करीत असते. घरातील प्रत्येक व्यक्ती मजेत आणि आनंदात जगत असते. कारण अवघ्या घरादारासाठी ती कणाकणाने झिजत असते. सासू म्हणजे सासू म्हणजे सासू असते कधी समईत तेवणारी मंद दिव्याची वात
तर कधी पेटलेली मशाल असते
म्हणून तर मी म्हणेन...
ती माझी सासू, मी तिची लेक :
माझी सासू आहे, लाखात एक !

हार्दिक शुभेच्छा !

**स्वर-योग**



विविध संकल्पनेवर आधारित मराठी/हिंदी गाण्याची मैफल
''मला भावलेले कलावंत'' एकपात्री कार्यक्रम
लग्न समारंभासाठी आणि
मंगल कार्यासाठी शहनाई जुगलबंदी



**प्रस्तुतकर्ता : निवेदक मुलाखातकार : प्रदीप देसाई**

***प्रदीप देसाई***

**टेली. : ०२२-२३८७ ३०६७, मो. : ९८६७०६५७३८**

१४, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

# गौड ब्राह्मण सभा, गिरगाव

३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४.

## संस्थेची ध्येये आणि विशेष उपक्रम

**शैक्षणिक पारितोषिक फंड** : आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तीनी संस्थेला दिलेल्या कायम निधी फंडाच्या व्याजातून विविध परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू विद्यार्थी-विद्यार्थिनींना पारितोषिके देऊन गौरविण्यात येते.

**वार्षिक स्नेह संमेलन / पारितोषिक वितरण सोहळा** : वार्षिक स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, क्रीडा इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या ज्ञातीतील कर्तबगार, निपुण अशा व्यक्तींचा सत्कार, सन्मान केला जातो.

**गौड ब्राह्मण त्रैमासिक प्रकाशन** : वर्षातून चार विशेषांक प्रसिद्ध करून संस्थेच्या सभासदांना विनामूल्य घरपोच पाठविले जातात.

**स्व. लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील - महिला विद्यार्थी विद्यावृद्धि कोष** : ज्ञातीतील गरजू गरीब मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जाते.

**रुग्णसेवा** : ज्ञातीतील गरीब रुग्ण व्यक्तींच्या उपचारासाठी व इतर समाजातील गरजू रुग्णांना विनामूल्य उपकरण वापरासाठी दिली जातात.

**स्व. एकनाथ केशव ठाकूर कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड** : ज्ञातीतील गरीब कर्करोग रुग्ण व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते.

**कन्यादान फंड** : ज्ञातीतील गरजू गरीब मुलींच्याविवाहासाठी आर्थिक मदत दिली जाते.

**वधू-वर पालक मेळावा** : ज्ञातीतील वधू-वरांसाठी 'वर-वधू मेळावा' आयोजित करून मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाते.

**सामुदायिक मौजीबंधन** : बटूंच्या पालकांकडून नाममात्र शुल्क आकारून मौजीबंधनाचा सोहळा आयोजित केला जातो.

**स्व. लक्ष्मण पाटील पाटकर स्मरणार्थ कु.दे.गौ.ब्रा.निराश्रित स्त्री/पुरुष साहाय्यकारी कोष** : ज्ञातीतील गरीब, निराधार व निराश्रित गरजू स्त्री/पुरुषांना आर्थिक मदत दिली जाते.

**स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर स्मरणार्थ कु.दे.गौ.ब्रा.विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धि कोष** : ज्ञातीतील गरीब, निराधार, निराश्रित गरजू विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता आर्थिक मदत दिली जाते.

**संपर्क :** श्री. देवदत्त खानोलकर (९८१९६६७४६३) श्री. डॉ. विलास देसाई (९८१९७१८१५०)
श्री. मनीष दाभोलकर (९८२१२५८०४७)

## संस्थेच्या वरील उद्दिष्टांना सढळ हस्ते आर्थिक मदत करा !

# ''आई माझा गुरु''

- सौ. पूजा पराग सामंत
औंध, पुणे.

**''आई माझा गुरु, आई माझा कल्पतरु**
**सौख्याचा सागरु, आई माझी''**



पूजा सामंत

आई या शब्दाचाच अर्थ मुळी आत्मा आणि ईश्वर. आत्मा आणि ईश्वर यांचा संगम म्हणजे आई. 'मातृ परमदैवतम' आई सारखे दुसरे दैवत नाही. अगदी पोटात असल्यापासून बाळाची काळजी घेणारी, त्याला संस्कारक्षम बनवणारी आई. इवल्याशा जीवाला आकार देऊन सुंदर मूर्ती घडवणारी तू. आमच्या शाळेत सर आम्हा विद्यार्थ्यांना नेहमी सांगायचे, तुमचे खरे गुरु म्हणजेच तुमचे आई-वडिल. पहिला मान त्यांचा, मग आमचा. म्हणूनच आज हा खास लेख माझ्या गुरुला म्हणजेच माझ्या आईला, स्नेहलता निवृत्ती ठाकूर (उत्तूर) हिला.

जीवन एक संघर्ष आहे. अशा या जीवनाच्या वाटेवर असंख्य खाचखळगे, काटेकुटे आहेत. पण ह्या अडथळ्यांची शर्यंत पार कशी करायची व मागे वळून न पाहता निर्धाराने पुढे कस जायचं व शर्यत कशी जिंकावी, याचं प्रत्येक क्षणी मार्गदर्शन करणारी तू. अंधार दूर सारून प्रकाशाचा मार्ग कसा शोधायचा हे तूच आम्हाला शिकवलस. स्वत: क्षीण होत गेलीस पण आम्हा मुलांना काही कमी पडू दिले नाहीस. तुझ्याही आयुष्यात अनेक वादळे आली, संकटे आली. एक क्षण तर असा आला की, सारं संपल असचं वाटल. पण नाही, तू खचली नाहीस. फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा मनाने खंबीर होऊन उभी राहिलीस. सुख दु:खाचे घाव कसे झेलावेत, दु:खाने खचून न जाता, नशिबापुढे माघार न घेता, नशीब कसे घडवावं हे शिकवलस. पण हे सर्व करत असतानाच भावनांच्या कुबड्या फेकून द्या हे सांगायलाही तू विसरली नाहीस.

आज मी जी काही आहे ती केवळ तुझ्याचमुळे. आई, तु कधी कधी कठोर वागलीस, त्या वेळी खरं तर फार राग यायचा. पण आई तुझ्या डोळ्यांतील रागाच्या पाठीमागे एक प्रेमाचा, वात्सल्याचा झरा आहे, जो सदैव आमच्यासाठीच वाहत आहे हे कळत होतं. तुझ रागावणं, तुझं ओरडणं यामागे सुद्धा मुलांबद्दल वाटणारी काळजीच होती. आम्ही पुन्हा पुन्हा त्या चुका करू नये, आपल्या मुलांकडे कोणी बोट दाखवू नये यासाठी तुझी चाललेली धडपड. कष्ट करून, घाम गाळून मिळवलेला एक रुपयासुद्धा अचानक मिळालेल्या धनापेक्षा मौल्यवान असतो याचा विचार करायला तूच शिकवलस. हार कशी स्वीकारावी, विजयाच्या आनंदाने कसं हुरळुन जाऊ नये हे तूच पटवलसं.

आज मी सुद्धा एक 'आई' आहे. तुझा आदर्श सतत माझ्या डोळ्यासमोर आहे. माझ्या सीयाला-मुलीला यशस्वी होण्यात, संस्कारक्षम घडविण्यात तुझ्या इतकचं यश देवाने मला पण द्यावे हिच देवाकडे प्रार्थना. पूर्वी गुरुदक्षिणा देण्याची प्रथा होती. पण आई, मी तुला काय देऊ? तूच आजपर्यंत नि: स्वार्थीपणाने सर्व देत राहिलीस. आई तुझा सहवास सतत हवहवासा वाटतो. सतत काहीतरी तुझ्याकडून नवीन-नवीन शिकावस वाटतं. आई तू दिलेली अनुभवांची, संस्कारांची शिदोरी मी हृदयाच्या कप्प्यात जपून ठेवलीय. माझ्यासाठी तो अक्षयी ठेवाच आहे.

म्हणूनच म्हणतात....

**''आई उन्हाची सावली। आई सुखाचा सागर॥**
**निळ्या आकाशाएवढा। तिचा मायेचा पदर॥**

आणि आई तुझ्याचसाठी मला भावलेली एक कविता...

''आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आईवरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्व मोठे
जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर....
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीरं
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुटी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातील छत्री
आई तू थंडीतली शाल
आता यावीत दु:खे खुशाल

*With Best Compliments From*

**Tel. : 022 4255 1414**
**Telefax : 2624 8589/65**

# MAHARASHTRA SOCIETIES WELFARE ASSOCIATION

(Regd. No. : Mumbai/1054/2002/GBBSD)

**-: H. O. :-**

A-2/302, Laram Centre, Opp. Railway Station,
Near Bus Depot, Andheri (W), Mumbai - 400 058

E-mail : mswa.hsg@gmail.com
Website : www.mswahousing.org
www.deemedconveyance.com

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी....''

किती सुंदर शब्दात आईचे वर्णन केलेले आहे.
आणि शेवटी हेच सांगावेसे वाटते.....

''माझ्या विषयी सांगताना
तुला विसरणे शक्य नाही
तुझ्या उल्लेखाशिवाय
माझी ओळख पूर्ण नाही.... आई.

**- सौ. पूजा पराग सामंत**
मोबाईल- ९८८१४६२१८२/९८५०८१९०५९.

# लपंडाव : ऊन पावसाचा !!!

ऊन-पावसाचा लपंडाव, हा आशा निराशांचा खेळ असतो
तो, आयुष्यात जिंकण्याबरोबर हरणं म्हणजे काय, ते खूप छान शिकवतो...
तीन वर्षे पावसाचा थेंब नाही, शेतकरी उदासीन आहे.
ओसाड-उजाड जमिनीकडे पाहून, तो हवालदिल आहे.
आणि अचानक पाऊस येताच, त्याच्या कलेवरात प्राण आला आहे
आशा पल्लवीत होऊन, तो सुखावला आहे, कलेवर उठून उभे आहे
परंतु पाऊस कोसळतो, कोसळत राहतो, शेतात पूर येतो, शेवटी शेतकरी आत्महत्या करतो
ऊन-पावसाचा लपंडाव, हा आशा-निराशांचा खेळ असतो...
सतरा वर्षांची स्मिता, निदान Blood cancer चे झाले, आणि सारे घर हलले
क्रिया-प्रतिक्रिया उपाय-उपचार-देवधर्म-दानधर्म, सर्व काही करून झाले सहा महिन्यात चित्र पालटले, उपाय लागू पडले, Reports छान आले
हुरूप वाढला, घर आनंदून गेले, पुन: नव्याने जगण्याचे बळ सर्वांना मिळाले.
परंतु दुर्दैव, गावाला नवस फेडण्याचे निमित्त, कार अपघात, सहा जणात स्मिताचा मृत्यू होतो
उन पावसाचा लपंडाव, हा आशा-निराशांचा खेळ असतो.

अनेक पालक आपल्या मुलांना पतंग उडवायला शिकवतात, काटाकुटीच्या तंत्रासहीत
कणी बांधण्यापासून ते उत्तम मांजा लावून, पंतगांच्या काटाकुटीत ढील देण्यासहीत
आतापर्यंत शर्यतीत खूप पतंग कापले, मग आनंदाचे इमले अगदी पार्टीसहीत पंतगांच्या लढाईत आपण कसे माहीर आहेत, यांचे स्तुतीपाठ, मागील रेकॉर्डसहीत
परंतु इथे हरणे ठाऊक नाही, म्हणून स्वत:चा पतंग काटला जातो, तेव्हा तो निराशतो
ऊन-पावसाचा लपंडाव हा आशा निराशांचा खेळ असतो...
(पतंग उडवणे सोडून देतो)
सांगायचा मुद्दा हा की....
जन्म-मृत्यूला शास्त्रीय आधार आहे, परंतु तो कदाचित अपघातानेही होऊ शकतो
नंतर, त्याचे विश्लेषण केल्यावर कळतं, जसा अति उकाड्यानंतर पावसाचा संभव असतो
हवेच्या दाबाप्रमाणे आशेला निराशेचा प्रतिरोध, हा तत्वज्ञानाचा विषय होऊ शकतो
परंतु, प्रत्यक्षात तो आशेला उभारी आणण्यासाठी उफाळतो व स्वत: मात्र exit होतो
दोन उणे एकत्र आल्यावर बेरजेने वा गुणाकाराने 'अधिकच' होतात, हा अनुभव महत्वाचा आहे
ऊन-पावसाचा लपंडाव हा 'आशा निराशांचा खेळ असतो, तो जिंकण्याबरोबर हरणं' ही शिकवतो.

**- मोहन सामंत**
मो. : ९७६९७७०२३६
अनंत संकल्प, ई/१०१,
आचोळे तलावासमोर,
नालासोपारा (पूर्व) ४०१२०९

*With Best Compliments From*


## SPOT HOUSING SOCIETY SOLUTION

**PLEASE CONTACT**

**Mr. Dhananjay Prabhudesai : 9011020161 / 9869627757 / 022-28882420**

**Email ID :** dhananjayprabhudesai1961@gmail.com

6, Ajit Park, Somwari Bazar, Malad (West), Mumbai - 400 064.

## MORE THAN TWO DECADES OF DEDICATED SERVICES TO CO-OPERATIVE HOUSING SOCIETIES

**WE HAVE A SOLUTION**

**We specialize in Co-op. Hsg. Society / Apartment / Tower Accounting and other relevant work such as**

## MAJOR SERVICES PROVIEDED BY US INCLUDE

1. Monthly / Quarterly Billing.
2. Trial Balance, Income & Expenditure Account and Balance Sheet. Getting it audited by statutory auditor at the year end.
3. Filing of TDS returns
4. Registration of societies.
5. Adoption of bye-laws.
6. Other legal opinions.

**Experience : Handling above 30 Societies in Western Suburbs for more than last 20 Years.**

# Success Stories

**मनीष दाभोलकर**
मो. ; ९८२१२५८०४७

गौड ब्राह्मण या आपल्या त्रैमासिकात Success Stories हे सदर लिहिताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर, तरुण, धंदा सुरू करणाऱ्या, अभ्यासात हुशार, कच्चे, नापास झालेले, अनेक समस्यांवर मात करून स्वकष्टावर उभे राहिलेले, ज्यांच्यामुळे आज अनेक संसार उभे राहिले असे उद्योजक, first entrepreneur, जीवनकला, कला-कौशल्य, विकास व खेळ यांच्या जोरावर समाजात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ज्ञातीबांधवांचा मागोवा घेऊन त्यांच्या कार्यबाहुल्याचा व कर्तुत्त्वाचा लेखा-जोखा आपणासमोर आम्ही मांडतो. आम्हाला समाजामधून यासाठी शुभेच्छा तर येत आहेतच. परंतु सर्व Success Stories फक्त आमच्या सभासदांपर्यंत त्रैमासिकद्वारे पोहोचतात. त्यामुळे सर्व सभासदांना विनंती आहे कि ज्ञातीमधील तरुणांना याचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा याकरिता आमच्याकडे email registration करावे. तसेच आपणास सदर अंक आवडल्यास त्याचा प्रचार व प्रसार करावा. जेणेकरून तरुण पिढी नेतृत्ववादी, प्रभावशाली, निर्णयसक्षम, जोखीम घेणारी, बऱ्या वाईट अनुभवातून स्वतःचा व्यवसाय सुरू करणारे असंख्य ज्ञातिबांधव तयार होतील. स्वतः सक्षम झाल्यावरच ते पुढे आपला समाज, देश उभारणीमध्ये सुद्धा सहभाग घेतील. अशा सर्व ज्ञातीबांधवांची माहिती आपण आम्हाला आमच्या ई-मेल वर पाठवावी ही विनंती आमचा ई-मेल manish_dab@hotmail.com व ugmahajan@rediffmail.com

आजवर आम्ही भारत देशातील, विविध क्षेत्रातील Success Stories चा आढावा घेतला. आज आम्ही तुम्हाला दिवाळीची खास भेट देत आहोत. भारताबाहेर थेट Canada लाच घेऊन जात आहोत. चला तर मग Canada ला... seat belt लावा.... आणि उडायला तयार व्हा. -संपादक



**दत्तात्रय मोहन देसाई**

क्षेत्रफळानुसार जगातील दुसरा मोठा विकसित देश म्हणून ओळखला जाणारा कॅनडा हा देश मानवी विकास या परिमाणावर जगात ९ क्रमांकावर आहे. खूप थंड वातावरण असलेल्या या देशाची अर्थव्यवस्था जगात ११ क्रमांकावर आहे. तिकडचे सर्वसाधारण तापमान १०.०°C ते २०.०°C असे असते. शांतताप्रिय अशी या देशाची आगळी ओळख. Vancouver हे शहर कॅनडा देशाचे तिसऱ्या क्रमांकाचे दाट लोकवस्ती असलेले महानगर म्हणून ओळखले जाते. जीवन गुणवत्ता (Quality of Life) आणि चांगले आरोग्य (Livability) या निकषांवर Vancouver हे शहर गेली ५ वर्षे सतत जगातल्या सर्वोत्तम ५ शहरात आपले स्थान राखून आहे.

देश विदेशात आपले ज्ञातिबांधव पसरलेले आहेत. तिथे ते कालांतराने प्रस्थापित झाले. आज आम्ही एका तरुण मुलाची म्हणजेच फक्त ३२ वर्षे असलेल्या **दत्तात्रय देसाई** यांची Success Story आपल्यासमोर मांडीत आहोत.

श्री. दत्तात्रय मोहन देसाई यांचा जन्म १६ फेब्रुवारी, १९८४ अंधेरी, मुंबई येथे झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यांचे बरेचसे बालपण हे एकत्र कुटुंब व त्यानंतर विभक्त कुटुंब पद्धतीत गेले. त्यांचे वडील श्री. मोहन विष्णू देसाई यांचा स्वतःचा छापखाना व्यवसाय होता आणि आई सौ. नीलिमा मोहन देसाई या गृहिणी आहेत. दत्तात्रय यांचा धाकटा भाऊ शाळेत खेळ, नाटक अशा क्षेत्रात सक्रीय सहभागी असायचा आणि त्यात त्याने अजूनपर्यंत बरीच बक्षिसे मिळवली आहेत.

दत्तात्रय देसाई यांचे शालेय शिक्षण श्री गोविंद बाल मंदिर विद्यालय, मोगरापाडा, अंधेरी (पू.), मुंबई येथे झाले.

॥ श्री तारादेवी प्रसन्न ॥ ॥ श्री भगवती प्रसन्न ॥

# श्री तारादेवी, भगवती, ब्राह्मण, घाडवास, महादेव (पंचायतन) केळुस सेवा समिती, मुंबई.

**द्वारा : श्रीकृष्ण द. प्रभु**

१-२-४, लोटस् सोसायटी, मरोळ-मरोशी रस्ता, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०५१

फोन : २९२५९५५५ / ९९६९००८३०२

भक्तजनहो/उपासकहो,

सविनय सादर प्रणाम वि.वि.

प्रतिवर्षाप्रमाणे **श्री. तारादेवी मातेचा वार्षिक जत्रोत्सव कार्तिक कृष्ण ४ (संकष्टी) गुरुवार, दि. १७-११-२०१६ रोजी संपन्न होणार आहे. तसेच श्री तारादेवी मातेचा मुर्ती पुर्नः प्रतिष्ठापना सुवर्ण महोत्सव** सांगता समारंभ व वर्धापनदिन आनंदोत्सव रविवार, दि. १९ फेब्रुवारी २०१७ ते गुरुवार २३ फेब्रुवारी २०१७ असा ५ दिवस साजरा होणार आहे. वर्धापनदिन समारंभ काळांत विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. आपण वर्धापनदिन कार्यक्रमाची यजमानपदे आरक्षित करून सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून श्री तारादेवी भगवती मातेच्या चरणी सेवा रुजू करावी व फलश्रुती मिळवावी. यजमानपदे स्वीकारणाऱ्या भक्तांची नावे मंदिरात नाम फलकावर लिहून ठेवण्यात येणार आहेत. शुभं भवतु।

**वर्धापनदिन कार्यक्रम यजमानपदे खालील प्रमाणे :-**

१) नवचंडी, लघुरुद्र, शतचंडी २) भजने ३) किर्तने ४) हरिपाठ ५) देवताभोजन (महानैवेद्य) ६) दैनंदिन महाप्रसाद ७) पालखी सोहळा ८) प्रवचने ९) वाजंत्री वादन १०) नाट्यप्रयोग ११) करमणूकीचे विविध कार्यक्रम १२) मुदपाकखाना मंडप १३) भोजन मंडप १४) विद्युत रोषणाई १५) आतषबाजी १६) उत्सव प्रसाद १७) ध्वनीक्षेपक (लाऊडस्पिकर) १८) ५ व्या दिवसाचा ''महाप्रसाद''.

सूचना : प्रतिवर्षाप्रमाणे छबिलदास हायस्कूल, दादर (प.), मुंबई येथे जानेवारी, २०१७ मध्ये स्नेहसंमेलन/कौतुक समारंभ/सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. आपल्या मुलांमध्ये अगर पाल्यांमध्ये सुमारे ७५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/विद्यार्थिनी असल्यास गुणपत्रक, फोटो व माहिती संस्थेच्या पत्यावर पाठविण्यात यावी. कौतुक समारंभाची निमंत्रणे पाठविण्यात येणार आहेत.

**आपले स्नेहांकित,**

**श्री. श्री. द. प्रभु** — अध्यक्ष

**श्री. सुरेश केशव बोवलेकर** — उपाध्यक्ष

**श्री. दिलीप मु. केळुसकर** — सरचिटणीस

**श्री. सुधाकर द. केळुसकर** — सरचिटणीस

**श्री. विनायक आ. तांडेल** — खजिनदार

**श्री. चंद्रकांत अनंत राऊळ** — स्थानिक सरचिटणीस (केळुस)

**श्री. दिपक स्वानंद प्रभु**

**टीप :** यजमानपदांच्या संदर्भात सविस्तर माहिती खालील दूरध्वनीवर उपलब्ध होईल.

**संपर्क :** दूरध्वनी क्र. ९९६९००८३०२/९८२०४१८४१२/९९६७०५९८८९/८२७५६७१५०९/८३७८९४६८८३

**दिपावली व नववर्ष सन २०१७ च्या**

**हार्दिक शुभेच्छा**

शाळेत असताना ते एवढे सर्वसाधारण विद्यार्थी होते कि आठवीत असताना एक वर्ष नापास सुद्धा झाले. दहावीत तर जेमतेम ४६% गुण मिळाले, इतके कमी गुण मिळाल्यामुळे मुंबईतील कुठल्याही चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळवणे कठीण झाले. दिशाहीन व हताश झालेले असताना त्यांचे शाळेतील जुने मित्र भेटले आणि मित्रांच्या मार्गदर्शनाने छबिलदास स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे प्रवेश घेतला... अंधेरी ते दादर या प्रवासादरम्यान सुद्धा त्यांना बरेच काही शिकायला मिळाले. ते बारावीत ६४% मिळवून नुसतेच उत्तीर्ण नाही झाले तर Accounts विषयामध्ये १०० पैकी ९३ गुण मिळवून दुसरे आले. घरची परिस्थिती माहित असल्यामुळे आणि त्यांना दत्तात्रय यांनी C.A. व्हावे असे वाटत असल्यामुळे शिक्षकांनी अगदी फी भरण्यापासून ते प्रवेश अर्ज भरण्यापर्यंत C.A. ची सगळी तयारी केली. फक्त अर्ज दाखल करायचा होता. पण दत्तात्रय यांना C.A. करायचे नव्हते. त्यांना महाविद्यालयीन ३ वर्षे पूर्ण करायची होती आणि त्यानंतर स्वतःचे भविष्य घडवायचे होते. इस्माईल युसुफ कॉलेज, जोगेश्वरी, मुंबई इथे पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला तेव्हा त्यांना जाणीव झाली कि ६४% सुद्धा पुरेसे नाहीत. दत्तात्रय सांगतात... मला माझे शिक्षण चांगल्या गुणांनी पूर्ण करायचे होते आणि सोबत नोकरी सुद्धा करायची होती. मला कळत होते कि शैक्षणिक क्षेत्रात माझी प्रगती होणे कठीण आहे. पण काही वेळा पर्याय नसतो आणि आपल्याला प्रवाहाबरोबर जावे लागते, मनात नसले तरीही. तसेच काहीसे झाले. बारावी निकालानंतर ते 'श्रीनगर फिल्म डिस्ट्रिब्युशन' या कंपनीत ऑफिस बॉय म्हणून काम करू लागले परंतु त्यामुळे त्यांचे प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील २ विषय पूर्ण झाले नाहीत. शिक्षण आणि नोकरी करताना त्यांना जाणवले कि ते दोन्ही एकत्र करू शकणार नाहीत त्यामुळे मग नोकरी सोडली.

पण संधी पाठ सोडत नव्हत्या. पुन्हा एकदा फॅक्स आणि प्रिंटींग करणाऱ्या कंपनी मध्ये विक्री आणि विपणन (Sales and Marketing) विभागात नोकरी मिळाली. या कामाचा चांगलाच अनुभव मिळाला तो असा कि मार्गस्थ एका व्यक्तीने दत्तात्रय यांना Standard Chartered बँक मध्ये नोकरी आहे असे सांगितले. चांगला पगार असल्यामुळे त्यांनी ती नोकरी स्वीकारली. Standard Chartered बँकेच्या क्रेडीट कार्ड विक्रीसाठी गेले असताना 'श्रीनगर फिल्मस' मधील एका ओळखीच्या विक्री व्यवस्थापकाला भेटायची संधी मिळाली आणि त्याने फेम ऍडलॅब्स मधील नोकरी विषयी सांगितले. म्हणून बँकेची नोकरी सोडून दत्तात्रय यांनी फेम ऍडलॅब्स ची नोकरी पकडली. पण हे सर्व करताना त्यांचे शिक्षण मात्र पूर्ण होऊ शकत नव्हते. प्रथम आणि दुसऱ्या वर्षी राहीलेले २ पेपर पूर्ण करणे आवश्यक होते कारण त्याशिवाय तृतीय वर्षात प्रवेश घेता आला नसता. एक पूर्ण वर्ष गमावले होते म्हणून शेवटी फेम ऍडलॅब्सची नोकरी सोडली आणि कसेबसे राहिलेले २ विषय पूर्ण केले असे दत्तात्रय सांगतात.

शेवटच्या वर्षात असताना त्यांच्या कॉलेज परिसरात फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूटचा स्टॉल लागला होता. दत्तात्रय पुढे सांगतात, मित्रासोबत त्या स्टॉलवर गेलो त्या कोर्सची फी रु. ७०,०००/- हे कळल्यावर धाबे दणाणले. तरीही आई - बाबांना विचारले पण त्यांच्याकडे एवढे पैसे नव्हते. मग मी माझ्या जवळच्या भाऊ बहिणीना विचारले त्यापैकी एका बहिणीने माझ्यासाठी कर्ज काढले. आता माझी जबाबदारी वाढली होती. मी ऑक्टोबर मध्ये माझे पदवी शिक्षण व डिप्लोमा दोन्ही पूर्ण केले. मला हॉटेल इंडस्ट्रीमध्ये काहीतरी करून दाखवायचे होते. आणि संधी चालून आली.... परीक्षा दिल्यानंतर निकाल लागेपर्यंत त्यांनी नोकरी करायची ठरवली आणि AFL Courier ग्राहक सेवा केंद्र मध्ये नोकरी मिळाली. ती करत असतानाच Renaissance Hotel मध्ये काम करायची संधी चालून आली. मुलाखतीकरिता गेले असताना तेथे पूर्वीचे काही त्यांचे मित्र बसले होते जे फारच चांगले इंग्रजी बोलायचे. पण दत्तात्रय मात्र खूप घाबरले होते. कारण त्यांचे इंग्रजी फारच कमजोर होते. पण देव जाणे हेच त्यांचे नशीब असेल की काय ते पहिल्या व दुसऱ्या मुलाखतीत पास झाले आणि त्यांना नोकरी मिळाली. त्यावेळी ते त्यांच्या काकीकडे पवई येथे राहत होते.त्यामुळे सगळेच कसे जमून आले होते. आर्थिक बाजू तितकीशी मजबूत होत नव्हती. दुसरे जोड काम करून पैसे जमा

करायचे याच विचारात ते काम पहात होते कारण पगार काही पुरेसा नव्हता.

तुम्ही अमेरिकेमध्ये Baltimore Marriott Inner Harbor जे ५३४ रूम्स चे हॉटेल आहे त्यामध्ये नोकरीत लागलात त्याचा थोडक्यात किस्सा सांगा असे विचारल्यावर दत्तात्रय म्हणाले.... सहा महिने Renaissance Hotel मध्ये काम केल्यावर त्याच हॉटेलच्या अमेरिकेमधील हॉटेलमध्ये J1 व्हिसावर नोकरी करायची संधी आली. इंग्रजी कच्चे असल्याने व्हिसाच्या मुलाखती मध्ये ते काय विचारतील वैगैरे विचाराने सुद्धा घाबरलो. नशिबानेच माझी Baltimore Marriott Inner Harbor या हॉटेल मध्ये फ्रंट डेस्क एजन्ट म्हणून निवड झाली. USA तिकीट आणि व्हिसा यासाठी आई वडिलांजवळ पुरेसे पैसे नव्हते पण आताही माझ्या मदतीला जवळचे भाऊ बहिण धावून आले आणि तिकीट व व्हिसाची व्यवस्था झाली.

अखेर मी माझ्या स्वप्नवत जगात होतो.... अमेरिकेत उतरल्यावर मी स्वतःलाच एक वचन दिले.. काहीही झाले तरी आता मागे वळून नाही पहायचे..... भारत देशाच्या बाहेर हा माझा पहिलाच प्रवास होता. आता यापुढे मराठी किवा हिंदी भाषेचे काहीच काम नाही. पूर्णपणे या लोकांची जीवनशैली व भाषा शिकायची, आत्मसात करायची हे पक्के केले. काही नवीन मित्र मिळाले तर बरेच मित्र Renaissance Hotel, मुंबई मधील होते. नवीन आव्हाने स्वीकारत, त्यातून नवीन अनुभव घेत पुढे पुढे जात होतो.... असे दत्तात्रय अभिमानाने सांगतात. USA मधील कंत्राट संपल्यावर त्यांनी UK साठी प्रयत्न केला पण अयशस्वी ठरले. त्यांच्या मित्राने Canada सुचविले आणि तेच खरे ठरले. पुढचा प्रवास सांगताना दत्तात्रय म्हणाले कि मला Vancouver शहरात नोकरी सोबतच शिकण्याची पण संधी मिळाली. मी Diploma in Hospitality Tourism Management हा कोर्स पूर्ण करत असतानाच The Buchan Hotel, Executive Hotel, Vintage Park, Century Plaza Hotel and Spa, Canada अशा मोठ्या व निरनिराळ्या हॉटेल मध्ये Front Desk Agent, Night Auditor म्हणून काम करीत अनुभव पण मिळवला. खरेतर Vancouver सारख्या अनोळखी शहरात स्वत:चे काम आणि स्वतःच्या मालकीची रहायची जागा या दोन्ही गोष्टी मिळवणे खूप कठीण होते. पण तुमचा मनाशी निर्धार पक्का असेल तर दिशा मिळत जाते आणि गोष्टी सोप्या होत जातात. एकाच ठिकाणी नोकरी न करता नवनवीन अनुभव घेत, परिस्थितीशी जुळवून घेत पुढे वाटचाल चालू होती. सगळ्यात मोठा प्रश्न होता तो जागेचा. मला स्वत:च्या हक्काची कायम स्वरूपी जागा घ्यायची होती. माझे वकील आणि Buchan हॉटेलचे व्यवस्थापक यांच्या सहकार्यामुळे अडीच वर्षे प्रयत्न केल्यानंतर सरतेशेवटी स्वतःचे घर मी घेतले. त्या दिवशीची माझी भावना शब्दातीत वर्णन करणे कठीण आहे. परक्या देशात जाऊन स्वत:चे घर घेणे म्हणजे तोपर्यंत घेतलेल्या सगळ्या मेहनतीचे आणि संघर्षाचे चीज होणे.

कॅफेटेरियासाठी जागा कशी मिळाली असे विचारल्यावर दत्तात्रय सांगतात..... ७ वर्षांच्या Vancouver शहरातील वास्तव्यात खूप चांगले मित्र मिळाले. ते माझ्या पाठीशी नेहमी उभे राहिले आणि अजूनही खंबीरपणे माझ्या सोबत उभे आहेत. माझा एक मित्र व त्याची पत्नी यांनी नवीन व्यवसाय सुरू केला आणि त्यासाठी एक छोटे कॅफेटेरिया (उपहारगृह) घेतले. त्या कॅफेटेरियाची दुसरी शाखा उघडण्याची संधी त्यांना मिळाली आणि त्यांनी ती शाखा मला दिली. ती संधी स्वीकारून, व्यवसाय कसा उभा करायचा, कसा बसवायचा या सगळ्याच गोष्टी शिकत, मित्राची मदत घेत मी संधीचे सोने करायचे ठरवले. मे, २०१६ साली मी हॉटेलची नोकरी सोडली आणि पूर्णपणे या व्यवसायात उतरलो. sandwiches, salads आणि तत्सम स्वरूपाचे पदार्थ आपले वेगळेपण जपत ग्राहकांना द्यायला मी सुरवात केली. आईला आणि काकूला जेवणात मदत केलेली असल्यामुळे थोडी फार माहिती होती पण मी काही व्यावसायिक शेफ नव्हतो. मात्र माझा मित्र पराग सामंत याच्या मदतीमुळे मी खूप नवीन गोष्ट शिकलो आणि अजूनही शिकतोय. माझे स्वप्न अजून पूर्ण झालेले नाहीये, पण मी प्रयत्न सोडणार नाही जोपर्यंत ते पूर्ण होत नाही.

आजच्या युवा पिढीला काय सांगाल असे विचारल्यावर

ते सांगतात ... परिस्थिती कितीही विपरीत असो, प्रयत्न व जिद्द सोडू नका. तुमचे सर्वोत्तम तुम्ही द्या आणि यश तुमचेच असेल. मन निर्मळ ठेवा, आनंदी राहा आणि तुमच्या सभोवतालच्या लोकांना आनंदी ठेवा. ज्यांना स्वतःचा नवीन व्यवसाय सुरू करायचा असेल त्यांनी व्यवस्थित नियोजन करावे, जे करायचे त्याबद्दलची पूर्ण माहिती मिळवावी आणि त्या क्षेत्रातल्या लोकांशी ओळख वाढवून त्यांच्या अनुभवाचा आपल्या कामासाठी उपयोग करून घ्यावा. मला सगळे माहित आहे या भ्रमात कधीही राहू नका. येणारा प्रत्येक नवीन दिवस नवीन आव्हाने घेऊन येतो त्यांना सामोरे जा... यश व अपयश हा त्या आव्हानाचा एक भाग आहे. नेहमी लक्षात ठेवा.... मी कोणापेक्षाही कमी नाही, मी करू शकतो आणि मी करणारच.

जो मुलगा ८ वीत नापास, १३ वीत नापास, १४ वीत दोन विषय राहिले, इंग्रजी विषयात कच्चा, इंग्रजी बोलताच न येणारा दत्तात्रय... आज आमच्याशी बोलताना आश्चर्यचकित करणाऱ्या इंग्रजी उच्चारामध्ये आत्मविश्वासाने अस्खलीत इंग्रजीत संभाषण करीत होता. स्व-कर्तुत्वावर सातासमुद्रापार स्वतःच्या मालकीचे घर विकत घेणे.... स्वतःचा व्यवसाय सुरू करणे... हे सर्व थक्क करणारे आहे. हल्ली मुले कमी मार्क्स मिळाले कि निराशेत बुडतात... त्यांचे पालक चिंतीत होतात, मुले आत्महत्या करतात. मला वाटते....दत्तात्रयची Success Story त्या सर्व मुले व पालकांसाठी एक प्रेरणादायी स्टोरी आहे.

दत्तात्रय यांना त्यांच्या फुड मॅनेजमेंट हॉटेल व्यवसायात भरपूर यश मिळो, त्यांचे स्वतःचे भविष्यात स्वतंत्र रेस्टॉरंट व 5 star हॉटेल सुरू होवो. आम्ही सर्व जरूर त्याला भेट देऊ. सर्व कुडाळदेशकराना चमचमीत, मसालेदार, माशांच्या जेवणाने तू नक्कीच स्वागत करशील..... अशा अपेक्षेसह गौड ब्राह्मण सभेतर्फे पुढील वाटचालीकरिता श्री. दत्तात्रय देसाई यांना शुभेच्छा !!

**मनीष दाभोलकर**
गोरेगाव
Email: manish_dab@hotmail.com

❑ ❑ ❑

# विनंती

कालच्या वीक-एन्ड ला तुम्हा दोघींचा फोन आला
'आई मदर्स डे चे तुला काय हवं?' प्रश्न विचारलात मला
'मायक्रोवेव्ह' चे डबे, सेंटची बाटली
की कॉर्निंगचा सेंट आणि नॉनस्टिकची भांडी
संभ्रमात पडले मी तुमचा प्रश्न ऐकून
त्याचवेळी तुमचं बालपण गेलं डोळ्यापुढे सरकून
सारं काही आठवताना माझ्या मनात आलं
तुम्ही लहान असताना तुम्हाला मी काय बरं दिलं?
इवल्या इवल्या माझ्या पिल्लांना दिली भरभरून माया
उन्हाची झळ लागू नये म्हणून पदराची केली छाया
तुमचं बोट धरून तुम्हाला शिकवलं चालायला
कधी घातले चार धपाटे तुम्हाला वळण लावायला
वादळवाऱ्यापासून जपण्यासाठी दिला प्रेमाचा निवारा
कठोर जगापासून वाचविण्यासाठी सदैव जागता पहारा
तुमच्यावर ठेवली करडी नजर बनून आभाळपक्षीण
तुमचं हितगुज ऐकण्यासाठी बनले तुमची मैत्रीण
आज तुम्ही मला विचारताय 'आई तुला काय हवं?'
खरंच देणार आहात का तुम्ही मला जे हवंय ते?
म्हटलं तर अगदी सोपं आहे, पण पैशानी नाही मिळणार ते
मला नकोत भेटवस्तू, नकोत उंची साड्या
या साऱ्यांनी भरलंय कपाट, बिनमोलाच्या गोष्टी साऱ्या
आज मला हवंय तुमच्यातलं आईपण
हळव्या झालेल्या मनाला हवंय दोन घडीचं माहेरपण
दिलेली गोष्ट परत मागू नये हे कळतंय माझंच मला
पण तुमच्या मायेची गरज आहे आज तुमच्या आईला
खळाळतं पाणी पुढेच वाहणार हे पटतंय गं मनाला
फक्त कधी मधी मागे वळून पाहा एवढीच विनंती तुम्हाला.!

**- मंगला खानोलकर**

# कल्पवृक्ष कन्येसाठी.....

प्रज्ञा सामंत

**कल्पवृक्ष कन्येसाठी लावुनिया बाबा गेला,**
**वैभवाने बहरून आला, याल का हो बघायला....**


श्री.निळकंठ सामंत

अनेक वेळा आर्ततेने माझ्या वडिलांना मी अंत:कारणातून साद घालत असते...

माझे वडील, निळकंठ बाळकृष्ण सामंत, ज्यांना आम्ही आबा म्हणायचो, त्यांनी कळत-नकळत आमच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण केली. तुम्ही म्हणाल त्यात काय? प्रत्येक बापाचं ते कर्तव्यच आहे. पण नाही. मी असे अनेक बाप पाहिले आहेत कि जे ह्या कर्तव्याला चुकतात किंवा त्यांची क्षमताच नसते. आबांनी आम्हाला नुसतं तत्वज्ञान सांगून नाही तर स्वत:च्या वर्तणुकीने आमच्या जीवनाचे धडे गिरवून घेतले.

अगदी लहान असतांना, शाळेत जातांना भोकाड पसरणारी मी, आबांच्या धीराच्या शब्दांना धरून शाळेत पाऊल टाकत असे. तिसरीत असतांना एकदा मी डायरी न्यायला विसरले ज्यात टीचरची सही आणायची होती. दुसऱ्या दिवशी टीचरला सांगायची हिम्मत होईना, म्हणून मीच तिची सही ठोकून दिली. झाले... घोर गुन्हा घडला होता. आमच्या जन्मदात्याला शाळेत पाचारण करण्यात आले. त्यांनी मला पहिला धडा दिला ''केलंस ना, मग कबुल कर. खरं बोलण्याने कधीच नुकसान होत नाही.'' तसेच झाले. खरं सांगून टाकल्यावर टीचरनी मला लगेच माफ करून टाकले. घरी आल्यावर मात्र आबा आईला म्हणाले ''आठव्या वर्षी हे उद्योग? तुझ्या लेकीचे काही खरे नाही.'' पण खरे बोलण्याची शपथ मी तेव्हा घेतली.

म्हणायला मी आबांची मुलगी होते, पण त्यांनी मला मुलाप्रमाणे वाढवले. लहानपणी मी सतत हाफ पॅण्ट आणि टी-शर्ट मध्ये वावरायचे. केस पण मुलासारखे कापलेले. माझ्या भावाला, प्रसादला आणि त्याच्या मित्रांना जिमखान्याला खेळायला नेतांना मी पण सोबत. प्रसाद आणि त्याच्या मित्रांना माझी ब्याद वाटायची, पण आमच्या बापापुढे बोलायची हिम्मत करणार कोण? लहानपणी मी सगळ्यांना सांगायचे ''तो प्रसाद आणि मी दादा''... लोक माझ्या वडीलाना सांगायचे ''तुमचा धाकटा मुलगा खूप द्वाड आहे'' आणि आबांची त्यांना समजावतांना पुरेवाट व्हायची. आजच्या काळात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जे मी काम करते, त्याची बीजं माझ्या वडीलांनी पेरली.


प्रज्ञा सामंत

नोकरी सोडून राजकारणात पडल्यावर उदर-निर्वाहासाठी त्यांनी एक काळी पिवळी टॅक्सी ठेवली. दिवसा ड्राईव्हर चालवायचा व रात्री आबा. भाडी उरकून १२च्या सुमारास आल्यावर एक विशिष्ट हॉर्न वाजवून आपण आल्याची सूचना द्यायचे. आम्ही उठून आईसक्रीम ची मागणी करायचो. अगदी दररोज. ते किती कमवत होते आणि किती खर्च करत होते माहित नाही. पण आमची कुठचीच मागणी त्यांनी कधी अपुरी ठेवली नाही. खाणे-पिणे अगदी दिलखुलास आणि एकटे-दुकटे नाही तर सगळ्या भाचे-पुतणे मंडळींना गोळा करून. आई खूप टेन्शन घ्यायची. उद्यासाठी पैसे आहेत ना? आबा म्हणायचे उद्या कोणी पाहिला आहे? आजचा दिवस माझा. वर्तमानात जगण्याची कलाही मला आबांनीच शिकवली.

एकदा एक भिकारीण आमच्या दारात आली. मी आबांकडे आशेने पाहिले. त्यांनी १० रुपये काढून माझ्या हातावर ठेवले. मी भिकारणीला पैसे देताना माझ्या डोळ्यात पाणी आले. डोळे पुसत येताना बघून आबांनी मला जवळ घेतले व म्हणाले ''तुझ्यामध्ये गरिबांसाठी कणव आहे, हे बघून मला खूप समाधान वाटले. तू जितके दुसऱ्याला देशील, देव तुला त्याच्या कितीतरी पटीने परत देईल'' ह्याची प्रचीती मला ह्याच जन्मी येत आहे. कुडाळदेशस्थ विद्यावृद्धी समाज आणि निराश्रित सहाय्यकारी फंड ह्या संस्थामधून समाजातील गरीब आणि गरजू लोकांसाठी काम करताना मनाला खूप समाधान लाभते.

अकरावीत असताना मी एका गुणाने इकॉनॉमिक्स विषयात नापास झाले. वडील राजकारणात असल्याने मी त्यांना प्रिन्सिपलवर दबाव टाकायला सांगितले. त्यांनी साफ नकार दिला. म्हणाले ''ह्या डिग्रीचे मला महत्व नाही. तू

जीवनाच्या विद्यापीठात पहिली आली पाहिजेस आणि तुझ्यात ती क्षमता आहे, हे मला माहित आहे''. माझा न्यूनगंड कुठच्या कुठे पळाला व पुढे मी इकॉनॉमिक्स मध्ये मेजर झाले. वयाच्या ४५व्या वर्षी मी पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे ठरवले व पॉलिटीकल सायन्स मध्ये मुंबई विद्यापीठात पहिली येऊन मुख्यमंत्र्यांनी माझ्या गळ्यात दोन गोल्ड मेडल घातलेली पहायला आबा हयात हवे होते. माणसाने जीवनभर शिकत राहावे ह्या त्यांच्या शिकवणीचा ध्यास घेऊन मी पुढे इतिहास ह्या विषयात एम. ए करून विद्यापीठात तिसरी आले. सार्वजनिक, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात प्रत्येक चांगल्या-वाईट प्रसंगातून/अनुभवातून मी सतत काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करत असते.

आबा आमदार असताना आमच्याकडे सतत लोकांचा राबता असायचा. एकदा पहाटे ४ वाजता एक कुटुंब येऊन थडकले. त्यांच्या रडा-रडीने आमची झोप उडाली. मुलीचा बाप सांगत होता ''साहेब माझी मुलगी पळून गेली.'' मला कळेना कि आता ह्याची मुलगी पळून गेली त्याला माझा बाप काय करणार होता? एकाची झोपडी जळाली होती. तिथेही मला हाच संभ्रम. कोणाला रिक्षाचे परमिट हवे होते तर कोणाला सरकारी नोकरी. मग आबांनी मला समजावून सांगितले, कि एक लोकनियुक्त प्रतिनिधी अशा लोकांना कशी मदत करू शकतो. २०१२ साली मुंबई महानगर पालिकेची निवडणूक लढवून मी सामाजिक जीवनात प्रवेश केला तेव्हा ह्या शिकवणीचा मला सर्वात जास्त फायदा झाला. त्या साली सरकारी यंत्रणा योग्यरित्या कामाला लावून माझ्या विभागातल्या ३००० लोकांना शिस्तबद्ध पद्धतीने आधार कार्ड मिळवून देण्यात मी यशस्वी झाले.

आमचे आबा जितके समजूतदार, तितकेच कडक. एकदा आम्ही त्यांच्या मतदारसंघात जायला निघालो. सोबत साधी जुनी गाडी होती. माझी बसल्यापासून कटकट सुरू झाली ''ती नवी का नाही घेतली?'' आबांनी समजावून सांगितले, पण माझी कटकट सुरूच.... अंधेरी महाकालीच्या एका सिग्नलवर आबांनी गाडी थांबवली व मला उतर म्हणून सांगितले. ठिकाण आले असे समजून मी उतरले. आबांनी दरवाजा बंद केला आणि गाडी घेऊन निघून गेले. मला क्षणार्धात लक्षात आले. एक तास मी सिग्नलवर सैरभैर उभी होते. एक तासाने आबा परत आले आणि मला गाडीत बसवले. म्हणाले ''बुडाखाली गाडी आहे हे नशीब समजा. बाकीचे चोचले स्वत: कमवायला लागल्यावर करा.'' १९९० मी जेव्हा पहिली विदेशी बनावटीची होंडा ॲकोर्ड घेतली तेव्हा माझे व्यावसायिक यश पहायला माझे आबा ह्या जगात नव्हते.


निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान त्यांच्याबरोबर मी जात असे. माझे वय १८-१९ होते असेल. मला त्यांनी सांगून ठेवले होते. झोपडपट्टीत जावे लागेल, नाल्यातून वाट काढावी लागेल, फुटक्या कपातून चहा प्यावा लागेल. कुरकुर केलीस तर याद राख. तिथे गेल्यावर ह्या सर्व दिव्यांतून मी गेले. म्हशींच्या गोठ्यातून, शेणातून वाट काढत गरिबांच्या घरी जेवण करून आभार मानणारे माझे आबा मी जवळून पाहिले. धीरूभाई अंबानीच्या मांडीला मांडी लावून बसणारे माझे आबा, पंचतारांकित हॉटेलात रूबाबात मला जेवू घालणारे आबा, एका झोपडीत बसून कार्यकर्त्याच्या घरी निस्संकोच जेवतांना बघून माझ्या मनाची जडण-घडणच बदलून गेली. ह्या घटनांवरून जीवनाचा समतोल कसा साधायचा हे मी शिकले. आज ना मला श्रीमंतीचा माज आहे ना गरिबीची लाज.

दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास, स्वत:साठी जगलास तर मेलास, हे शब्द सतत त्यांच्या तोंडी असायचे. टिळक, सावरकर, भगतसिंग ह्यांची भाषणे त्यांना तोंडपाठ असायची. इतिहास आम्ही असाच शिकलो. नाटक, सिनेमा, कविता ह्यांच्या आस्वाद घ्यायला हि त्यांनीच शिकवलं. लहानपणी एक कविता ते आम्हाला म्हणून दाखवायचे ''क्षणोक्षणी पडे, उठे परी बळे, उडे बापुडी, किती घळ घळा गळे, रूधिर कोमलांगातुनी'' एका पक्षिणी ला एक पारधी गोळी मारतो. ती पक्षीण आपल्या पिल्लांसाठी जखमी अवस्थेत पुन्हा घरट्यात येते अशी ती कविता आहे. कविता ऐकतांना आम्ही खूप रडायचो. कवितेचा शेवट असा होता.

''मातीत ते पसरले, अति रम्य पंख,
केले वरी उदर पांडुर निष्कलंक,
चंचू तशीच उघडी, पद लांबविले,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले''

२७ फेब्रुवारी १९८८ ला आबांचेही श्रम निमाले. हा कल्पवृक्ष लावून त्याला वाढवण्याचे काम आमच्यावर सोपावून आमचे वडील अनंतात विलीन झाले.

# श्री. न्यायमूर्ती एस. आर. तेंडोलकर (१८९९-१९५८)



श्री. न्यायमूर्ती एस. आर. तेंडोलकर यांचा जन्म २१ ऑक्टोबर १८९९ मधे झाला. त्यांनी क्वीन्स युनिव्हर्सिटी, बेलफास्ट येथून एल.एल.बी. ही पदवी घेतली व त्यांना इंग्लंडमधील ग्रेज ईन ह्या वकीलांच्या बारने त्यांना बोलावून घेतले. मुंबईस परतल्यानंतर त्यानी हायकोर्टामधे ओरीजीनल साईडला कामकाजास सुरूवात केली. सर जमशेदजी कांगा यांच्या चेंबरमध्ये त्यांचे प्रशिक्षण झाले. ते १९३८ ते १९४१ ह्या काळांत गव्हर्नमेंट लॉं कॉलेजमधे पार्ट टाईम प्राध्यापक होते. २ जुलै १९४६ ला त्यांची न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी लिहिलेली निकालपत्रे ही सुस्पष्टता, जाण आणि नेमकेपणा यांचा उत्कृष्ट संगम असे त्यांची कामावरची निष्ठा ही अतिशय उच्च कोटीची होती. त्यांची प्रकृति बरी नसतांनाही ते कोर्टात उपस्थित रहात असत. श्री. एच. एम. सीरवाई यांनी वकीलमंडळाच्या वतीने त्यांना विनंती केली होती की स्वत:ची प्रकृति पुन्हां पूर्ववत् करण्यासाठी त्यांनी तात्काळ रजेसाठी अर्ज करावा. सीरवाईना दिलेल्या उत्तरात न्यायमूर्ती तेंडोलकरनी म्हटलं होतं की ते रजेसाठी अर्ज करणार आहेत परंतु त्यांच्या हातात असलेला एक अपूर्ण दावा २० जानेवारी १९५८ पूर्वी पूर्ण करणे जरूरीचे आहे, त्यानंतरच ते रजा घेतील. सीरवाईनी त्याबद्दल म्हटले आहे.

''अन्नपाणी पोटात बिलकुल राहू शकत नाही अशा अवस्थेत न्यायमूर्ती तेंडोलकर कोर्टात उपस्थित राहिले व त्यांनी तो दावा निकाली काढला. कामावरची निष्ठा दाखवणाऱ्या या धैर्यशाली कृतीनंतर ते घरी गेले व त्यानंतरच रजेवर गेले व चिरविश्रांती घेतली.'' न्यायमूर्ती तेंडोलकर २७ मार्च १९८५ रोजी निवर्तले.

# नियतस्य तु संन्यासः कर्मणी नोपपयते । मोहातस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ।। (अ. १८, श्लोक ७)

- श्री. गो. ल. परूळेकर

**नियतस्य तु संन्यासः कर्मणी नोपपयते ।**
**मोहातस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ।।**
**(अ. १८, श्लोक ७)**

विहितकर्माचा त्याग करणे योग्य नाही. मोहाने केलेल्या त्याच्या त्यागास तामसत्याग असे म्हणतात.

श्री ज्ञानदेव सांगतात की, कर्माचा द्वेष करून कर्मे टाकून देऊ नयेत. तसे केले तर अंधारात आपल्याला काहीच दिसत नाही. म्हणून डोळ्यांत नखे खुपसून घेऊ नये. डोके दुखते म्हणून डोकेच तोडावे काय? रस्ता अवघड आहे म्हणून पायच तोडून टाकावेत काय? भुकेलेल्याला अन्न दिले तर ते लाथाडून द्यावे काय? या तीनही प्रश्नांचे उत्तर एकच आहे. ते म्हणजे विहित कर्मे कधीच टाकू नयेत. वास्तवीक पाहता आपल्या वाट्याला आलेले विहितकर्म टाकू नये. कर्म टाळण्याची मनोवृत्ती तशी वाईटच आहे.

श्री गुरुदेवांनी (श्री गुरुदेव रानडे) ''गुणविचार'' स्पष्ट करताना सलगपणाने तामस, राजस, सात्विक अशा त्याग विषयीचे विवेचन करण्यासाठी तीन श्लोकांचे उपयोजन केले आहे. गीतेत श्रीकृष्णानेच प्रथम तामस, नंतर राजस व त्या नंतर सात्विक त्यागाचे महत्व व स्वरूप विशद केले असल्याने इथेही त्याच क्रमाने श्लोक निश्चिती केली गेली आहे. कदाचित त्याग करताना तामस, राजस प्रवृती कडून सात्विक त्यागाकडे साधकाने वळावे, हे आग्रहाने बिंबविण्यासाठीच असा उलटा क्रम योजलेला असावा.

कर्म करताना वाट्याला आलेले विहित कर्म हे तर केले पाहिजेच. कर्मत्याग करणे सर्वस्वी चुकीचेच आहे.

खरे तर विहित कर्मे टाळणे ही सत्कर्मापासून पळून जाण्याचीच वाट आहे. परमार्थ्याच्या दृष्टीने पहावयाचे झाले तर आपापली जबाबदारी; प्रपंचातील असो की परमार्थ्यातील असो, ती आपण पार पाडलीच पाहिजे. इतकेच नव्हे तर परमार्थाचे कारण पुढे करून प्रापंचिक कर्माचा त्याग करणे हेही अयोग्यच आहे. प्रापंचिक कामाला पुढे करून परमार्थाकडे दुर्लक्ष करणे हे ही अयोग्यच आहे. म्हणूनच वाट्याला आलेली कर्मे केलीच पाहिजेत.

आचरणाचे बल हेच सर्वाधिक तारक आहे. मग ते विधायक भूमिकेतून आणि आत्महिताच्या दृष्टीने वाढवायला हवे. विहित कर्माचा त्याग करू नये. साधकाच्या परमार्थावरचा तो ठपका आहे.

**दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेश भया व्यजेत**
**सकृत्वा राजसं त्यागं नैव त्याग फलं लाभेत ।।**
(अ. १८ श्लोक ८)

कर्म दुःखरूप आहे म्हणून त्याचा क्लेश होईल म्हणून जो त्याग केला जातो, तो राजस त्याग होय. त्या राजस त्याग करणाऱ्यास त्यागाचे फळ मुळीच मिळत नाही हे लक्षांत ठेवावे.

श्री ज्ञानदेव सांगतात की, आपला धर्म काय आहे हे जाणून जो कर्म करतो, त्याला कर्म करताना थोडे कष्ट पडतात. पण कष्ट पडतात म्हणून कर्माचाच त्याग केला तर काय उपयोग? कर्माची बाजू प्रारंभी कष्टदायक असतेच. अगदी गाय सुद्धा खूप चांगली आहे, पण तिलाही मारकी शिंगे आहेतच, म्हणून काय गाय टाकायची? शेवंती सुवासिक आहे, पण तिलाही काटे आहेतच म्हणून काय शेवंतीचा त्याग करायचा? भोजन सुद्धा सुखावह आहे, पण त्यासाठी स्वयंपाक करण्याचे कष्ट पडतात म्हणून भोजनाचाच त्याग करायचा, असे कसे होईल? उगीच आपल्याला कष्ट होतात म्हणून कर्माचा त्याग करतो, तो राजस त्यागी होय. त्याला त्यागाचे फळ प्राप्त होतच नाही.

श्री गुरुदेवांनी (श्री गुरुदेव रानडे) ''गुणविचार'' स्पष्ट करण्यासाठी ''त्याग'' या उपशिर्षकाखाली वरील श्लोकाचे उपयोजन केले आहे.

सत्कर्मे वगळली, तर सर्वच कर्मे तशी दुःखरुपच वा क्लेशकारकच आहेत. म्हणून काय कर्माचा त्याग करायचा? नाहीच नाही. कर्मत्याग हा सर्वस्वी धिक्करार्हच आहे.

अगदी परमार्थाच्या दृष्टीने विचार करायचा झाला तरी, नामस्मरणाचे फळ म्हणजे ईश्वर दर्शन होय. पण ते घडण्यासाठी नेमाने, निश्चयाने, नामस्मरण तरी केले पाहिजे. नामसाधना तरी सहज सुलभ नव्हेच नव्हे.

नाम घ्यावे, मन एकाग्र व्हावे ही गोष्ट कष्टप्रद आहेच आहे. म्हणून काय नामस्मरणाचाच त्याग करायचा की काय? नव्हे! प्रपंच असो की परमार्थ असो दोन्हीकडे कर्मे करायची म्हणजे कष्ट आहेतच. प्रपंचात काय कमी कष्ट आहेत? पण म्हणून जर कोणी प्रपंचाचाच त्याग करू म्हणत असेल तर ती गोष्ट गैरच आहे. परमार्थही नामसाधना कष्टप्रदच आहे. पण दुःखकष्टाच्या भीतीने ती साधनाच नको म्हटली तर काय उपयोग? म्हणून राजस त्यागही गैरच आहे असे इथे प्रतिपादिले गेले आहे.

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेर्जुन।**
**संगत्यक्ता फलं चैवस त्याग: सात्विको मत:।।**

(अ. १८, श्लोक ९)

हे अर्जुना, कर्तव्य म्हणून जे नित्यक्रर्म आसक्ती आणि फलाकांक्षा सोडून केले जाते त्याला सात्विक त्याग असे म्हणतात.

श्री ज्ञानदेव सांगतात की, आपापल्या अधिकाराप्रमाणे आपल्या वाट्याला जे कर्म आले आहे तेच कर्तव्यकर्म होय, ते कधीच टाकू नये. उलट शास्त्राधार हाच जणू अलंकार आहे.असे मानून सात्विक कार्य करावे. ''मी हे कर्म करतो'' असा अहंकार मुळीच नसावा. कर्तेपणाचा अहंकार नसावा आणि कर्म फलाची लालसा ठेवू नये. विहित कर्मे करण्यास दु:ख मानू नये. राजस आणि तामस त्यागाकडे दुर्लक्ष करावे. सात्विक त्यागच महत्वपूर्ण मानावा. भक्तिमार्गी साधकाला तो फार उपकारक आहे.

श्री गुरुदेवांनी ''गुणविचार'' या विषयीचे स्पष्टीकरण करण्यासाठी सात्विक त्यागाचे स्वरूप सांगणारा श्लोक निवडला आहे. आपल्या वाट्याला जी कर्मे आली आहेत ती केलीच पाहिजेत. ती कर्मे करण्यात दु:ख मुळीच मानू नये. तसेच ''मी हे कर्म केले म्हणून मला अमूक एक गोष्ट प्राप्त व्हायला हवी'' अशी फळाची आशा-आकांक्षाही ठेवू नये. कर्म करणे एवढेच आपले काम आहे. असेच समजून असावे.

प्रपंचात आणि परमार्थात कर्तव्यकर्म करायचे आहेच आहे. प्रपंचात कर्तव्यकर्म करण्यातून मानसिक समाधान लाभते. परमार्थातही कोणते कर्तव्यकर्म करायचे आहे असे म्हणाल, तर नामसाधना हेच आपले कर्तव्यकर्म होय. नामस्मरण करताना ईश्वरदर्शन एवढीच एक परिणती उरते. तीच तर परमार्थाचे ध्येय म्हणूनच सांगितली गेली आहे.

साधकाचे कर्तव्यकर्म कोणते? आणि देवाचे कर्तव्यकर्म कोणते? याचा विचार श्रीगुरुदेवांनी ''नित्यनेमावली''च्या प्रस्तावनेतच सांगितला आहे. 'नाम घेतले असता देव सहजीच प्रगट होणार आहे आणि नाम घोकले असता देवाला भक्तास सोडून दूर जाता येणार नाही. असे त्यांनी प्रतिपादिले आहे. (१) नाम घेणे/स्मरण करणे हे साधकाचे कर्तव्य आहे. (२) दर्शन देणे हे देवाचे कर्तव्य आहे. साधकाने आपले कर्तव्यकर्म केलेच पाहिजे, हे विसरता कामा नये.

**श्री. गो. ल. परुळेकर**
B.A. LLB, ॲडव्होकेट
आजरा, ४१६५०५. मो. ९८९०१५४६८८

*With Best Compliments From*

# SHIVANSH HOLIDAYS

*We caters Visa/Air Reservations/Insurance/Bookings/ Tours Packages*
(TRAVEL ADVISOR OF YATRA.COM )


**Madhavi**
Proprietor
**CONTACT NO 9819740704**
EMAIL ID : shivanshholidays2016@gmail.com

# ''आत्महत्त्येकडे मानवजातीची वाटचाल''

**(भाग २ : क्रमशः)**

## १२ मे, २०१३ नंतरच्या अभूतपूर्व दुर्घटना

- महाजन सामंत



माधव महाजन सामंत

१०)२८ मे, २०१३- अमेरिकेतील 'ओक्लाहोमा' शहराला ताशी ३२० कि.मी. वेगाच्या टोर्नेडोने (नरसाळ्याच्या आकाराचे वादळ) उध्वस्त केले.

११)ऑगस्ट, २०१३- अमेरिकेत अतिवृष्टी, कोलोरॅडो नदीला महापूर आला. रस्ते, पूल, शहरे उध्वस्त.

१२) सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१३- ऑस्ट्रेलियामध्ये वणवे लागले. शेकडो चौ. कि.मी. क्षेत्रातील जंगल जळाले.

१३) ऑक्टोबर, २०१३- 'फिलिपाईन्स' देशाचा मोठा भाग उध्वस्त करणारे ताशी ३५० ते ४०० कि.मी. वेगाचे 'ह्यान' चक्रीवादळ.

१४) ऑक्टोबर, २०१३- मध्ये अमेरिकेत एका दिवसात ८२ टोर्नेडो.

१५) १७ नोव्हेंबर, २०१३- मध्यपूर्वेच्या वाळवंटात सौदी अरेबियाची राजधानी 'रियाध' मध्ये मोठा पाऊस.

१६) नोव्हेंबर, २०१३- जपान, चीनमध्ये विक्रमी बर्फवृष्टी

१७) डिसेंबर, २०१३- अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील 'कॅलिफॉर्निया' मध्ये सतत तिसऱ्या वर्षी अवर्षण व दुष्काळ.

१८) डिसेंबर, २०१३ व जानेवारी, २०१४- अमेरिकेतील मध्य-पूर्वेतील बर्फाचे वादळ, काही ठिकाणी तपमान उणे ६० सें. पर्यंत खाली घसरले.

१९) त्याचवेळी दक्षिण अमेरिका खंडात अर्जेंटिनामध्ये (सॅंटियागो डेल) तापमान + ५२° सें. झाले, हजारो पशू-पक्षी उष्माघाताने मेले.

२०) त्याचवेळी ऑस्ट्रोलियातील 'पिलबारा' व 'विन्टन' येथे तापमान + ५२° ते + ५५° सें. पर्यंत वाढले. हजारो पशू-पक्षी (कांगारू, पोपट, वाघळे इ.) व शेकडो माणसे उष्माघाताने मरण पावली.

२१) जानेवारी, २०१४- 'ऑस्ट्रेलियन ओपन' ह्या प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेतून अव्वल दर्जाच्या दहा टेनिसपटूंनी उष्णता सहन होत नसल्याने अंग काढून घेतले.

२२) फेब्रुवारी, २०१४- युरोप व रशियामध्ये मुसळधार पाऊस, थेम्ससह सर्व नद्यांना अभूतपूर्व महापूर.

२३) १४ मार्च, २०१४- दुबई व आसपासच्या देशांमध्ये गारा व मोठा पाऊस पडला.

२४) २० एप्रिल, २०१४- भारत, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि जगातील इतरही ठिकाणी पोळणारा उष्मा, उष्णतेच्या लाटा आणि त्यातच अधुनमधुन गारांचा मारा, मुसळधार पाऊस आणि महापूर.

२५) २० मे २०१४- युरोपातील 'डॅन्यूब' नदीला ऐतिहासिक प्रचंड महापूर. पूर्व युरोपातील सर्बिया, क्रोएशिया, बोस्निया इत्यादी देशांतील विस्तृत क्षेत्र बुडाले.

२६) १७ जून २०१४- अमेरिकेत एका दिवसात २४ टोर्नेडो. नेब्रास्का शहरात आलेल्या जुळ्या टोर्नेडो मुळे शहर उध्वस्त.

२७) २४ जून २०१४- 'बल्गेरिया' देशात ऐतिहासिक प्रचंड वृष्टी आणि महापूर.

२८) २१ जुलै २०१४- चीनमध्ये प्रचंड वादळ.

२९) सप्टेंबर, २०१४- मेघालय व ईशान्य भागात अतिवृष्टी, महापूर.

३०) १७ ऑक्टोबर, २०१४- नेपाळमध्ये हिमवादळ, ८ गिर्यारोहक-पर्यटक गाडले गेले.

३१) मुंबईमध्ये एप्रिल, मे, जून, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१४ या महिन्यांमध्ये विक्रमी तापमान नोंदले गेले. नोव्हेंबर, २०१४ मध्ये उन्हाळा

अनुभवास आला. दक्षिण गोलार्धावर सूर्य असल्याने अंटार्क्टिकामध्ये मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन झाले. याची दुसरी बाजू म्हणजे

३२) नोव्हेंबर, २०१४- अमेरिकेत सुमारे तीन आठवडे आधी अभूतपूर्व बर्फवृष्टी झाली. सर्व ५० राज्ये ६ ते १२ फूट बर्फाच्या आवरणाखाली काही दिवस गाडली गेली.

अशा अभूतपूर्व, विक्रमी पण विघातक स्वरूपाच्या दुर्घटना दर १० ते १५ दिवसांआड पृथ्वीवर घडत आहेत.

टीप: (अ) गौड बाह्मण, जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर १०१६ च्या अंकामधील पृष्ठ २५ वर भारतामधील दुर्घटना नमूद केल्या आहेत.

(ब) वरील १० ते ३२ क्रमांकामधील घटना जगभरातील आहेत.

(क) सूक्ष्म निरीक्षण केल्यास सर्व जगामधेच दुर्घटना घडत आहेत.

(ड) 'स्मरणशक्ती अल्पजीवी' या उक्तीप्रमाणे २०१४ ला स्वल्पविराम.

(इ) सूज्ञांना गेल्या दोन वर्षातील दुर्घटना नक्कीच आठवतील.

(फ) केदारनाथमध्ये किती माणसे मेली? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

विशेषत: (ग) मिरज लातूर रेल्वे जलवाहिनी वर ३ वर्षांच्या दुष्काळानंतर मराठवाडा भागामध्ये २०१६ वर्षामध्ये 'ओला दुष्काळ=? ह्या ताज्या घटना !

डॉ. जेम्स हॅनसेन (छोटासा परिचय)

''नासा'' (नॅशनल एअरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनीस्ट्रेशन) या संस्थेच्या 'गोडार्ड इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस स्टडीज' चे संचालक व प्रमुख शास्त्रज्ञ, पर्यावरण क्षेत्रामध्ये एक सर्वोच्च तज्ज्ञ आहेत. नोव्हेंबर, २००९ मध्ये, त्यांनी 'स्टॉर्म्से ऑफ माय ग्रँडचिल्ड्रन' हा ग्रंथ प्रकाशित केला. अमेरिकेच्या अनेक राष्ट्राध्यक्षांचे सल्लागार म्हणून काम केल्यानंतर, ''पृथ्वीवर घडत असलेल्या या धोकादायक पर्यावरणीय सत्याची माहिती गेल्या तीस वर्षात अमेरिकेचे सर्वोच्च सत्तास्थान असलेल्या 'व्हाईट हाऊस' कडून जनतेपर्यंत पोहचू दिली गेली नाही'' असे डॉ. हॅनसेन अत्यंत ठामपणे नमूद करतात. खुद्द डॉ. हॅनसेन यांच्या अहवालांमध्ये वारंवार बदल करण्यात आले. परिस्थिती आटोक्याबाहेर जात असल्याने संपूर्ण मानवजात व जीवजातींबबतचे आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी हा ग्रंथ लिहिला असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. ग्रंथाच्या मुखपृष्ठातच डॉ. हॅनसेन यांनी लिहिले ''वातावरणातील बदल हा महाविनाशकारी आहे. मानवजातीला वाचविवण्याची ही शेवटची संधी आहे.''

**ॲडव्होकेट गिरीश राऊत**

बालपणापासूनच निसर्गाकडे ओढ. गेली ३०/३५ वर्षे सतत पर्यावरणाविषयी अभ्यास. प्रचंड वाचन, चिंतन, निरीक्षण व सखोल अभ्यास. निश्‍चित निष्कर्षापर्यंत पोचल्यनंतर अत्यंत विनम्रपणे पण तितक्याच ठामपणे अनेक चळवळींना सुरूवात. 'भारतीय पर्यावरण चळवळ' ह्या संस्थेची स्थापना. १९९० सालात विमानतळाने मिठी नदी अडविल्याबद्दल गिरीशने पूराच्या धोक्याचा इशारा दिला होता. १९९१ सालामध्ये बैलबाजार, कुर्ला येथे पूर आला व दिलेला इशारा खरा ठरला. पुढील मोठा धोका ओळखून ९५ सालापासून, माहिम कॉजवेच्या पश्चिमेकडील सागरी पातमुखाच्या मिठी नदीस अडविणाऱ्या भिंती, भराव काढून टाकण्यासाठी आंदोलन केले. (त्याच्या विचारांनी प्रभावित होऊन, मी स्वत: १९९८ पासून गाडी वापरणे बंद केले.) १९९९ च्या ऑगस्ट पासून मिठी नदीला गाडणाऱ्या आणि माहीम खाडीमध्ये येणाऱ्या भरत्या अडविणाऱ्या भरावास सुरूवात झाली. कारण काय होते? तर महाविनाशकारी 'वांद्रे-वरळी सागरी पूल प्रकल्प'! त्याच्या विरोधामध्ये श्री. र.ग. कर्णिक, डॉ.य. दि. फडके, विंदा करंदीकर, तात्या सुळे, अहिल्याताई रांगणेकर, मृणालताई गोरे, शरयूताई ठाकूर, डॉ. रश्मी मयूर इत्यादी मान्यवरांचा आंदोलनामध्ये सहभाग मिळविला.

४० ते ५० बोटी १० ते १२ दिवस लावून मच्छीमारांच्या मदतीने 'हाराकिरी' पद्धतीने, पण शांततेने, सर्वांनी स्वत:चा जीवा धोक्यात घालून 'दगडांचा होणारा भराव' थांबविला जर 'सी डब्ल्यू. पी.आर.एस'च्या सल्ल्याप्रमाणे वांद्रे व

वरळी या भूशिरांमधील आणि प्रभादेवी, वरळी येथील माहीमचा उपसागर आणि अरबी समुद्राचा भाग बुजवला असता तर २६ जुलै रोजी मुंबईला जलसमाधी मिळाली असती. याचा अर्थ इतका सुस्पष्ट आहे की गिरीशमुळे मुंबईतील लाखो लोकांचे प्राण वाचले. (आपण सर्व गिरीशला धन्यवाद देऊया!)

टीप : (अ) ॲडव्होकेट गिरीश राऊत (गिरीश) हा माझा गेली ५५ वर्षांचा शेजारी व मित्र.

(ब) माझा धाकटा भाऊ (कै. शेखर रंगनाथ सामंत) याचा लहानपणीपासूनचा सवंगडी.

(क) मात्र, मला स्वत:ला, त्याच्या कार्याची अत्यंत जुजबी स्वरुपाची तोंडओळख साधारणपणे १९९५ पासून ! (माझे दुर्दैव !!)

(ड) त्यामुळेच कदाचित, पण देवगडचे देवमाणूस व आमदार कै. आप्पा गोगटे ह्याच्या आग्रही आदेशावरून (व गिरये येथील आंदोलनाचा अभ्यास करून) मुणगे येथे होऊ घातलेला सरकारचा ऊर्जाप्रकल्प मुणगे, ग्राम पंचायतीमधील माझ्या भाषणानंतर थांबविला गेला. माझे मुणगे वाचले. (देवी भगवतीचा आशीर्वाद!)

(इ) गेली ४/५ वर्षे माझ्याकडून गिरीशकडे पिच्छाच व आर्जवी आग्रह की ''आता मात्र आपल्याला न्यायालयाचे दार ठोठावले पाहिजे.''

(फ) शेवटी जानेवारी, २०१६ च्या माझ्या मुणग्याच्या जत्रेमध्ये भगवती देवीकडे मनापासून प्रार्थना केली. त्यानंतर २७ जानेवारी, २०१६ रोजी मुणगे, भगवती, हायस्कूल मध्ये सकाळी ९ ते १० व्याख्यान दिले.

व्याख्यानानंतर ''लेखक'' ॲड. गिरीश वि. राऊत लिखित ''विनाशाच्या उंबरठ्यावर'' ही पुस्तिका, थोड्या प्रती असल्यामुळे, मुणग्यातील प्रत्येक वाडीतील एक व काही मान्यवरांना दिली गेली. ''सूज्ञ व तज्ञ'' व्यक्तींनी ती पुस्तिका व डॉ. जेम्स हॅनसेन लिखित ''स्टॉर्म्स ऑफ माय ग्रँड चिल्ड्रन'' ह्या ग्रंथाचे जरूर वाचन करावे.

(ग) आश्चर्य म्हणजे, मुंबईला परत आल्यानंतर स्वत: गिरीशकडूनच मुंबई हायकोर्टामध्ये याचिका दाखल करण्याची मला विनंती व माझी ॲडव्होकेट गिरीश राऊतकडून गिरीशचा ॲडव्होकेट म्हणून नेमणूक. पहिला परिणाम म्हणजे २ मे, २०१६ पासून आयपीएल च्या क्रिकेट सामन्यांची महाराष्ट्रामधून हकालपट्टी! ही याचिका व इतर संबंधित पाणीटंचाई विषयीच्या एकत्रित याचिका पुण्यामधील मित्र व अर्थशास्त्रज्ञ (प्रा. देसरडा व इतर यांच्यातर्फे दाखल केल्या गेल्या होत्या. आता न्यायालयीन लढे सुरू झाले आहेतच पण ''सर्वांचेच'' सहकार्य अपेक्षित आहे.


**जीवन हवे की जीवनशैली ?**

तापमानवाढीवर प्रथम नियंत्रण ठेवण्यासाठी, त्यानंतर तापमान कमी करण्यासाठी म्हणजेच हवेतील कार्बनचे प्रमाण शिस्तबद्ध उपाययोजनांची अंमलबजावणी करून कमी कमी करत राहून ३५० पी.पी.एम्. पर्यंत आणण्यासाठी, असंख्य पर्याय आहेत. मात्र उपाय किंवा पर्यायी उपाय यांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या आधी, प्रत्येक माणसाने 'त्याला त्याचे जीवन हवे की त्याची स्वत:ची जीवनशैली' ह्या प्रश्नाचे ठाम उत्तर दिले पाहिजे. इथे अत्यंत नम्रपणे नमूद करावेसे वाटते की माझा स्वत:चा अनुभव क्लेशकारक आहे. गेल्या ३५ वर्षांमध्ये जेव्हा जेव्हा मला वेळ मिळाला तेव्हा मी मुंबईतील कित्येक मॅनेजमेंट कॉलेजीसमध्ये MBA च्या विद्यार्थ्यांना विविध विषयावर व्याख्याने दिली. गेली २० वर्षे तर अनेक कंपन्यांना व भारतीय सैन्याला मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच मौल्यवान सल्ले दिले. जेव्हा जेव्हा मी वरील प्रश्न विचारला तेव्हा ९० ते ९५% टक्के लोकांनी 'जीवनशैली' असे उत्तर दिले. 'मर्क' कंपनीच्या उच्च श्रेणीच्या मॅनेजर समुदायाला जेव्हा मी विचारले की 'भारतामधील श्रेष्ठ उद्योगपती कोण?' तेव्हा बहुतेकांनी 'धीरूभाई अंबानी' असे उत्तर दिले. जवळजवळ एक तासाच्या प्रदीर्घ चर्चा तसेच वादविवादानंतर मला माफक यश मिळाले व माझ्या उत्तराला म्हणजे 'भारतरत्न जे आर. डी. टाटा'ला मान्यता मिळाली. थोडक्यात 'जीवनशैली' वरच बहुतेकांची निवड व पकड आहे. पण त्यामुळे 'जीवन' धोक्यात येत आहे याची जाणीव तर सोडाच पण साधी कुणकुणही कोणाच्याही लक्षात येत नाही. ही एक अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे! माझे स्पष्ट उत्तर ''जीवन'' हेच आहे व म्हणून हा लेखांचा खटाटोप किंवा आटापिटा !!.

'आरक्षणाविषयी' सुप्रीम कोर्टाचा मंडल आयोगाचा निकाल लागण्याच्या आधीपासूनच कित्येक वर्षे व निकाल लागल्यानंतरही अगदी आजपर्यंत, आंदोलने अविरहतपणे चालू राहिलेली आहेत. मराठा आंदोलन किंवा धनगर आरक्षण इत्यादी ताजी उदाहरणे.


mahajansamant.blogspot.in ह्या माझ्या ब्लॉगवर मी, दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ पासून, पर्यावरण ह्या विषयावर लिहायला सुरुवात केलेली आहे. त्या ब्लॉगसचा व माझ्या लेखमालेचा विचार करून सूज्ञ व तज्ञ मंडळी, व्यापक विचार करू शकतील. एक कृती समिति नेमावी अशी माझा सूचना आहे. परंतु तपमानवाढीची गती लक्षात घेता, येत्या दोन वर्षांमध्येच कडक उपायांची गरज आहे. सोशल मीडिया व इतर प्रभावी माध्यमातून सर्वांनाच सामील करून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. इच्छुक स्वयंसेवकांनी व सर्व हितचिंतकांनी **संपर्क साधावा अशी मी नम्र विनंती करत आहे. (मो. ९८२१९५६९८९)**

### हार्दिक अभिनंदन !



नॅचरल हिस्ट्री म्युझीयम, लंडन आणि बिबिसी वाईल्ड लाइफ (BBC, Wildlife) आयोजित (शहरी वन्यजीवन) स्पर्धेत प्रसिद्ध छायाचित्रकार श्री. नयन खानोलकर, राहणार डोंबिवली यांनी या वर्षीचा प्रतिष्ठित 'वाईल्ड लाइफ फोटोग्राफर' हा पुरस्कार जिंकला. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई लाल आरे मिल्क कॉलोनी येथे छायचीत्रीत केलेल्या 'द ॲली कॅट' या फोटोसाठी हा पुरस्कार त्यांनामिळाला.

श्री. नयन खानोलकर यांनी पुढील वाटचाली बद्दल समस्त ज्ञातिबांधव, समाज व गौड ब्राह्मण सभा, गिरगाव तर्फे हार्दिक शुभेच्छा !



# भातुकली



**मंगला खानोलकर**

भातुकलीचा डाव मांडला
तन-मन दोन्ही त्यात गुंतले
संसाराच्या सारीपटावर
नित्य सुखाचे फासे पडले

तूच दिले हे जीवन मजला
लाडही माझे तूच पुरविले
गजानना तू, दाता असता
मला वाटते 'मी' हे केले

माझे माझे सदैव म्हणत
तू माझा हे मात्र विसरले
माये मागे धाव धावुनी
हाती नाही काही उरले

भातुकलीच्या खेळामधली
गंमत अवघी आता सरली
संध्याछाया भिववू लागता
तुझी आठवण मजला झाली

उशीर जाहला मान्य परी मज
'खऱ्या' घराची ओढ लागली
जन्म-मृत्यूचा चुकवुनी फेरा
दे ना जागा तुझ्याच जवळी
जन्म-मृत्यूचा चुकवुनी फेरा, दे ना जागा तुझ्या जवळी...!

❑❑❑

# कोट्यधीश करणारी बांबू शेती


दिगंबर पाटकर

कुडाळ देशकरांना व्यापार शिकवावा लागत नाही. कशात व्यापार आहे हे त्यांना बरोबर समजते. असंच एक नवीन अगदी नवीन क्षेत्र खुणावत आहे. त्याची ओळख करून देत आहे.

शेतीत चिखलाने अंग माखल्या खेरीज शेती होत नाही हे सत्य सर्वांना माहीत आहे. पण या बांबू शेतीत ते घडत नाही. हे म्हणत असता आपण पाहिलेली बांबूची बेटे आपल्या डोळ्या समोर आली असतील जी तोडून फुकट घेऊन जा म्हटले तरी कोणी हात लावत नाही. मग हा बांबू कसा आहे?

देशात बांबूच्या शेकडो जाती आहेत पैकी बीमा बाल्कोसा बांबू हा वेगळा आहे ज्याची शेती केल्यास एकरी प्रचंड उत्पन्न मिळेल.

* नेहमीच्या बांबूप्रमाणे याला काटे नाहीत. * नेहमीच्या बांबूप्रमाणे हा पोकळ नाही, भरीव येतो. अगदी ८० टक्के भरीव आहे. * नेहमीचा बांबू तोडण्यास १५ वर्ष लागतात हा तीन वर्षानंतर तोडायला येतो * या बांबूची रोपे प्रयोग शाळेत तयार होतात. त्यामुळे त्यांच्या डी.एन.ए. मध्ये त्या रोपांचे आयुष्य कळते. * एकरी ४० ते ५० टन दरवर्षी उत्पन्न मिळते. * ४ थे वर्षी पहिले कटिंग केल्यानंतर पुढील ५ वर्षे दरवर्षी ५/५ टनाने ॲव्हरेज उत्पन्न वाढत ८ वे वर्षी ७० टनावर स्थिर होऊन पुढची १०० वर्षे उत्पन्न मिळत रहाते.



**४ थे वर्षापासून ८ वे वर्ष पर्यन्तचे उत्पन्नाचे टेबल**

| वर्ष | एकरी उत्पादन टनात | अन्नदाता देणार असलेला दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| ४ थे वर्षी | ५० | ६०००/- | ३,००,०००/- |
| ५ वे वर्षी | ५५ | ६०००/- | ३,३०,०००/- |
| ६ वे वर्षी | ६० | ६०००/- | ३,६०,०००/- |
| ७ वे वर्षी | ६५ | ६०००/- | ४,९०,०००/- |
| ८ वे वर्षी | ७० | ६०००/- | ३,२०,०००/- |
| | | **एकूण** | **१८,००,०००/-** |

* ४ थे वर्षी पर्यन्त एकरी १.५० लाख खर्च असून ४ थे वर्षी पासून पुढे २५ ते ३० हजाराचा खताचा व पाण्याचा खर्च आहे.

कंपनीकडून शेती केल्यास ठिबक सिंचन सक्तीचे आहे. त्याला एकरी २० ते २५ हजार रुपये खर्च येतो.

तसेच आपल्या शेतीच्या संरक्षणासाठी माणूस नेमणे परवडत नाही यासाठी सोलर सिक्युरीटी कुंपणही आपल्याला राबवता येईल. ज्यामुळे डुक्कर, हत्ती, गवे यांचे पासून शेतीचे कायमचे संरक्षण होऊ शकते. सोलर कुंपण हा समक्ष चर्चेचा विषय आहे. पण सोलर कुंपणामुळे आपण घरात निर्धास्त झोपू शकतो.

* पाणी ऊसाच्या १/४ पुरते, * अन्नदातांकडे एकरी १.५० लाख रुपये भरून आपली शेती कंपनीस दत्तक दिल्यास कंपनी ४ थे वर्षी बांबूची तोड होईपर्यन्त त्या शेतीची देखभाल करेल. तसेच दहा वर्षपर्यन्त बांबू मार्केटिंग देखील करेल. पुढील मार्केटिंग हे सर्वस्वी आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. * या बांबू शेतीला जमीन कसलीही चालते. डोंगर उताराची/माळरान/अगर उत्तम बागायती देखील जमीन चालते.

या बांबूला जैवभार प्रचंड असल्याने दर आठवड्याला पडणारी पाने एका वाफ्यात गोळा करून त्यात गांडूळ सोडल्यास प्रत्येक वर्षी ५ टन जैनिक  खत मिळेल. ४ थ्या वर्षीपासून ते १० ते १२ टनावर जाईल. या जैविक खताचा भाव ५ ते १० हजार रु. टन आहे.

शेतीच्या कल्टीव्हेशनसाठी आपण एकरी १ लाख ३७ हजार रु. बँकचे कर्ज घेतल्यास त्याचे १४ टक्क्याने ३ वर्षांत जे व्याज होईल त्याचे कोष्टक पुढीलप्रमाणे-

| वर्ष | मुद्दल | व्याज | एकूण |
|---|---|---|---|
| पहिले वर्ष | रु. १,३७,०००/- | रु. १९,१८०/- | रु. १,५६,१८०/- |
| दुसरे वर्ष | रु. १,५६,१८०/- | रु. २१,८६५/- | रु. १,७८,०४५/- |
| तिसरे वर्ष | रु. १,७८,०४५/- | रु. २४,९२६/- | रु. २,०२,९७१/- |
| | | रु. २,०२,९७१/- | |

या नंतर पूर्ण तीन वर्षे झाले नंतर २,०२, ९७१/ इतकी रक्कम आपल्या ३ लाख उत्पन्नातून बँकेत वजा होऊन आपल्या बँक खात्यावर ९७,०२९/- रुपये फक्त शिल्लक पडतील. ५ वे वर्षी पासून फक्त खत व पाण्याचा खर्च होईल.

५ वर्षापूर्वी आय.टी.सी. या बलाढ्य सिगारेट उत्पादक कंपनीने मद्रास जवळ २००० एकरात हा बिमा बांबू लावून गेल्या वर्षी त्यावर आधारित उदबत्ती काडीचा कारखाना सुरू केला. तसेच नारायण मुर्तीच्या इन्फोसिस ने गेल्या वर्षी ५०० एकरात बंगलोरजवळ हा बांबू लावला. बलाढ्य कंपन्यांना व्यवसाय कशात आहे हे कुडाळ देशकरांप्रमाणेच कळते. कोकणात तर अनेक ज्ञाती बांधवांची शेकडो एकर शेती पडून आहे. दुर्लक्षित आहे. हा लेख वाचल्यानंतर आपणास जर बांबूची शेती करणेची इच्छा असल्यास समक्ष गारगोटीस येऊन भेटल्यास उत्तम.

या लेखाद्वारे माझ्या ज्ञातीबांधवांना दीपावलीच्या कोटी कोटी उड्डाणासाठी हार्दिक शुभेच्छा !!

**दिगंबर वसंतराव पाटकर**
मु. पो. गारगोटी, जि. कोल्हापूर.
मो. ९८८११७१८००

# कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज पारितोषिक वितरण समारंभ

दर वर्षी प्रमाणे, कुडाळदेशस्थ विद्यावृद्धी समाज ह्या संस्थेचा ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा, २०१६ ह्या वर्षीचा पारितोषिक वितरण व कौतुक सोहळा समारंभ दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजी, दादर येथील शारदाश्रम विद्यामंदिराच्या सभागृहात यशस्वी रित्या संपन्न झाला.

संस्थेचा हा ३४ वा कौतुक सोहळा होता. आपल्या समाजातील ज्येष्ठ समाजसेवक व पेशाने कॉस्ट अकौंटंट असलेले श्री. दत्तात्रय सखाराम आजगावकर, हे ह्या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. मंचावर संस्थेचे अध्यक्ष श्री. न. ना. पंतवालावलकर, कार्याध्यक्ष श्री. अजय पाटील व विशेष आमंत्रित, ज्येष्ठ ज्ञातिबांधव श्री. श्री. बा. पाटील हजर होते. समारंभाला ज्ञातीतील विविध संस्थांचे पदाधिकारी व ज्ञाती-बांधव उपस्थित होते. त्यात गौड ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई, उपाध्यक्ष देवदत्त खानोलकर, गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे संपादक श्री. उमाकांत महाजन, गौड ब्राह्मण क्रेडिट सोसायटीचे श्री. सतीश सामंत, मालवणचे श्री. बाळासाहेब पंतवालावलकर इत्यादी मंडळी हजर होती.

वेळेचं काटेकोर पालन करत ठीक ४.३० वाजता कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रमुख पाहुणे श्री.आजगांवकर ह्यांच्या शुभ-हस्ते सरस्वती वंदना आणि दीप-प्रज्वलन झाले. सर्व मान्यवर मंचावर स्थानापन्न झाल्यावर, संस्थेचे चिटणीस श्री. किरण सामंत ह्यांनी उपस्थित ज्ञाती-बांधवांचे स्वागत केले आणि संस्थेच्या आतापर्यंतच्या कार्याची, प्रगतीची आणि पुढील वाटचालीची माहिती दिली. आपल्या प्रास्ताविकात श्री. किरण सामंत ह्यांनी संस्था हि १२५ वर्षाकडे म्हणजेच शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाकडे दमदार वाटचाल करीत असल्याचे सूचित केले.

त्यानंतर संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या श्रीमती प्रज्ञा सामंत, ह्यांनी प्रमुख पाहुणे श्री. दत्तात्रय आजगांवकर ह्यांच्या व्यावसायिक आणि सामाजिक कार्याचा आढावा घेत, त्यांची सभागृहाला ओळख करून दिली. श्री.आजगावकर ह्यांच्या विद्यार्थी दशेपासून ते विविध मान्यवर कंपन्यात नोकरी आणि मग स्वतंत्र व्यवसाय असा आजगांवकर ह्यांचा व्यावसायिक प्रवास उदघृत केला. तसेच श्री. आजगावकर ह्यांनी आपल्या विविध ज्ञाती संथांचे पदाधिकारी बनून, आपल्या ज्ञाती समाजाचे काम कसे अविरत चालू ठेवले ह्याची त्यांनी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री. पंतवालावलकर ह्यांनी पुष्प-गुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांना सन्मानित केले.

श्रीमती प्रज्ञा सामंत ह्यांनी मग मंचावर उपस्थित विशेष आमंत्रित श्री. श्री. बा. पाटील, ह्यांची सभागृहाला ओळख करून दिली. वयाच्या ९४ व्या वर्षीही तरुणांना लाजवेल अशा उत्साहात श्री. पाटील समारंभाला उपस्थित राहिले. कस्टम्स विभागात काम करताना, दोन वेळा राष्ट्रपती पुरस्काराचे मानकरी ठरलेले श्री. पाटील ह्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या ज्ञाती संस्थांमध्ये सक्रिय काम केले. वयाच्या उत्तराधार्त आपल्या ज्ञातिसंस्थांना भरघोस देणग्या देऊन हा सामाजिक वसा चालू राहावा हि त्यांची प्रमाणिक इच्छा प्रकट होत होती. प्रमुख पाहुणे श्री.आजगांवकर ह्यांनी विशेष आमंत्रित श्री. श्री. बा. पाटील ह्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला.




श्रीमती प्रज्ञा सामंत प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देताना, बसलेले डावीकडून चेअरमन डॉ. अजय पाटील, प्रमुख पाहुणे श्री. द.स. आजगांवकर, श्री. श्री. बा. पाटील व संस्थेचे अध्यक्ष श्री. न.ना. पंतवालावलकर

प्रमुख पाहुणे श्री. दत्तात्रय आजगांवकर ह्यांनी मुलांना संबोधित करतांना, आपले सार्वजनिक जीवनातले अनुभव सांगितले. मुलांना वाचनाची गोडी लागावी ह्यासाठी पालकांनी मुलांना साधे आणि सोपे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे व ज्ञानार्जनाचे महत्व जाणून घेण्याचे आवाहन केले. जीवनात निखळ आनंद मिळवणे किती सोपे असते ह्याची काही उदाहरणे देत, त्यांनी मुलांना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आनंद घेत, प्रवास करावा असा संदेश दिला.

श्री. श्री. बा. पाटील ह्यांनी स्वत:च्या उपस्थितीने पारितोषिक विजेत्या मुला/मुलींना प्रोस्साहित केले व त्यांना शुभाशीर्वाद दिले. उद्याच्या भावी पिढीला त्यांनी मार्गदर्शन केले आणि समाजाशी आपली नाळ जोडून ठेवण्याचे आवाहन केले.

पारितोषिक वितरण समारंभाला सुरूवात करण्यापूर्वी, चिटणीस श्री. किरण सामंत ह्यांनी पारितोषिकांचे निकष, वितरणाचे स्वरूप, अनुपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांची पारितोषिक वितरण व्यवस्था इत्यादी गोष्टींची माहिती दिली. त्यानंतर चिटणीस श्री. किरण सामंत, श्री. प्रबोध सामंत आणि श्री. दीपक सामंत ह्यांनी पारितोषिक विजेत्या मुलांची नावे घेत, त्यांची माहिती, मिळालेले गुण इत्यादी माहिती दिली व तस-तशी पारितोषिके वितरित केली गेली.

ह्यावर्षीची लक्ष्यवेधी बाब म्हणजे पारितोषिक विजेत्या मुलांचे फोटो, त्यांची कौटुंबिक माहिती आणि त्यांचे गुण हि सर्व माहिती आधीच संकलित करून ती ऑडिओ-व्हिजुअल सिस्टम द्वारे मंचाच्या बाजूला लावलेल्या मोठ्या स्क्रीनवर दाखवली गेली. प्रत्येक विद्यार्थी/विद्यार्थिनी पारितोषिक घ्यायला मंचावर आला/आली कि त्याची/तिची माहिती हि मोठ्या स्क्रीनवर दाखवली जात होती. हि पद्धत संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदा वापरली गेली, ती पण १००% यशस्व झाली आणि त्याचे पूर्ण श्रेय कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. संजय सामंत ह्यांनी घेतलेल्या परिश्रमांना जाते.

संस्था २०१८-१९ हे वर्ष शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करणार आहे. त्यासाठी संस्थेने ५ कोटी रुपयांचा फंड गोळा करण्याचा संकल्प सोडला आहे, जेणेकरून अनेक होतकरू मुलांना पैशाअभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागणार नाही. जगभर २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर हा आठवडा ''दान- उत्सव'' म्हणून साजरा केला जातो आणि संस्थेचा कार्यक्रम हा २ ऑक्टोबरलाच दरवर्षी असतो. ह्या सर्व गोष्टींचा सुरेख मिलाप करत श्रीमती प्रज्ञा सामंत यांनी ज्ञाती बांधवांना दानाचे महत्व समजून सांगितले. ज्ञाती-बांधवांच्या दानशूर वृत्तीला आव्हान करीत संस्थेने सोडलेला हा संकल्प पुरा करण्यासाठी मदतीचा हात मागितला. आपल्यापासूनच सुरूवात करत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या काही पदाधिकाऱ्यांनी स्वता:तर्फे यथा-शक्ती दानाचे लखोटे व्यासपीठावर अध्यक्षांना सुपूर्द केले. सणवार, वाढ-दिवस, लग्न समारंभ किंवा पूर्वजांच्या आठवणीप्रित्यर्थ ज्ञाती-बांधवांनी आपल्या पेक्षा कमी नशीबवान आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करावी असे प्रज्ञा सामंत ह्यांनी आवाहन केले.

संस्थेचे चिटणीस श्री. प्रबोध सामंत ह्यांनी ''जॉय ऑफ गिविंग'' ह्या संकल्पनेद्वारे विद्यार्थ्यांना सढळ हस्ते आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमांनंतर संस्थेचे आवाहन आणि देणगी च्या फॉर्मचे वितरण करण्यात आले.

सरतेशेवटी श्री. सुधाकर पाटकर ह्यांनी आभार प्रदर्शन केले आणि सर्वांना अल्पोपहार वितरित करून समारंभाची सांगता झाली.




श्री.श्री.बा. पाटील ह्यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करताना द.श. आजगांवकर व न.ना. पंतवालावलकर.

**ह्याच कार्यक्रमात गौड ब्राह्मण सभा, गिरगाव ह्या संस्थे तर्फे माध्यमिक व उच्च माध्यमिक गुणवंत विद्यार्थ्यांना ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी दिलेल्या देणगीतून पारितोषीके देण्यात आली.**

**१० वी. S.S.C.**

१) कु. दिपाली गजानन प्रभू. (तेर्से-बाबंर्डे)
मराठी विषयात प्रथम क्रमांक, गुण ९६ कै.विनायक लक्ष्मण देसाई पारितोषिक, कै. मिलिंद वामन सामंत पारितोषिक.

२) कु. मंदार आनंद प्रभू (कुडाळ)
संस्कृत विषयात प्रथम क्रमांक
कै. द्रौपदी विनायक देसाई पारितोषिक.

३) कु. मनुजा उमेश सामंत (गोरेगांव)
गोरेगांव विभागातून सर्वप्रथम कै. आत्माराम रामचंद्र देसाई पारितोषिक १० वीत मुंबई विभागातून प्रथम क्रमांक (विभागून)
कै. अवंतिका भास्कर खानोलकर पारितोषिक

४) कु. भाग्यश्री श्रीकृष्ण प्रभू (कणकवली)
गणित विषयात सर्वप्रथम
कै. सुशिलाबाई शंकर प्रभू केळुसकर पारितोषिक
कै. पीतांबर दिगंब देसाई पारितोषिक
कै. भिकाजी शांताराम आजगांवकर पारितोषिक
सिंधुदुर्ग जिल्हातून गणित विषयात प्रथम.
कै. गुलाब रजनीनाथ देसाई पारितोषिक
सिंधुदुर्ग जिल्हयातून सर्वप्रथम
कै. श्रीमती पार्वतीबाई शंकर देसाई पारितोषिक

५) कु. आदित्य संजय आजगांवकर
मुंबई विभागातून प्रथम क्रमांक
कै. अवंतिका भास्कर खानोलकर पारितोषिक

**१२ वी. H.S.C.**

१) कु. अजिता रामचंद्र नायक
१२वीत सर्वप्रथम
कै. प्रा. विष्णु अनंत देसाई पारितोषिक
भौतिकशास्त्र विषयात प्रथम
रसायनशास्त्र विषयात प्रथम
जीवशास्त्र विषयात प्रथम
कै. राजाराम रघुनाथ सामंत (विलेपार्ले) पारितोषिक

२) कु. विनिता विजय वालावलकर (कुडाळ)
सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सर्वप्रथम ८६.९२%
कै. पार्वतीबाई शंकर देसाई पारितोषिक
कै. आत्माराम सावळाराम खानोलकर पारितोषिक

३) कु. मृण्ययी विक्रांत मुणगेकर १०० गुण
गणित विषयात प्रथम
कै. राजाराम रघुनाथ सामंत पारितोषिक.

४) कु. मनाली दत्तात्रय नाईक ९६.३०%
ठाणे जिल्ह्यातून वसई विभागातून प्रथम
कै. गजानन गोविंद गवाणकर पारितोषिक

## टोपीवाला व्याख्यानमालेचे आयोजन (२०१७-४४ वे वर्ष)

या संस्थेचे माननीय अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर (अध्यक्ष, सारस्वत बँक) तसेच उपाध्यक्ष मा. श्री.सुरेंद्र बागलकर (नगरसेवक, मुंबई महानगरपालिका) ह्यांच्या मार्गदर्शनाखाली स्व.रा.ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले ह्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ यंदाही बुधवार दि. २५ जानेवारी २०१७ ते रविवार दि. २९ जानेवारी २०१७ या कालावधीत कुडाळदेशकर ब्राह्मण निवास (गिरगाव) च्या पटागंणात टोपीवाला व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर व्याख्यानमालेच्या आयोजनाविषयी ज्ञातीबांधवांना काही सूचना करायच्या असतील, तसेच व्याख्यानमालेच्या आयोजनासाठी ज्ञातीतील दानशुरांना देणग्या द्यायच्या असतील त्यांनी श्री.सतीश ग. सामंत (दूरध्वनी क्र. : २३८९४७५७
भ्रमणध्वनी क्र. : ९८६९२६४७५७) यांच्यांशी संपर्क साधावा ही विनंती.

# एकनाथ ठाकूर स्मृती - व्याख्यानमाला




एकनाथ ठाकूर स्मृती व्याख्यानमालेचा शुभारंभ नुकताच दि. ६ ऑक्टोबर २०१६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, शिवाजी पार्क, दादर येथे झाला. सदर व्याख्यानमालेत शुभारंभाचे पुष्प राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघसंचालक श्री. मोहनजी भागवत यांच्या ''पंडित दीनदयाल उपाध्याय व त्यांनी दाखवलेल्या भारत देशाचे ५० वर्षांचे व्हीजन डॉक्युमेंट'' या व्याख्यानाने झाली. सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व ते आपल्या भाषणात म्हणाले की ठाकूर साहेबांची इच्छा होती की बँकेने व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत व्याख्यानमाला सुरु करून समाजप्रबोधन करावे व त्यात सरसंघचालक श्री.मोहनजी भागवत यांना प्रथम व्याख्यानासाठी बोलवावे. परंतु हे त्यांचे स्वप्न पूर्ण होताना ते आज आपल्यात नाहीत. आजपर्यंत बँकेने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन कामे केली...'सारस्वत बँक भवन'चे नामकरण 'एकनाथ ठाकूर भवन' असे केले व दुसरे त्यांच्या नावानेच व्याख्यानमाला सुरू केली ज्यात दरवर्षी वेगवेगळ्या विषयावर तज्ज्ञ व्याख्याते मार्गदर्शन करतील. पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी अतिशय लाघवी व अलंकारिक भाषेत ठाकूर सरांमधील अर्थशास्त्रज्ञ व माणुसकी जपणारे भावनात्मक व्यक्तिमत्व अशा आठवणींना उजाळा दिला. बँकेचे संचालक श्री. किशोर रांगणेकर यांच्या आभार प्रदर्शनाने व्याख्यानमालेची सांगता झाली.

**मनीष दाभोलकर**
manish_dab@hotmail.com
९८२१२५८०४७

With Best Compliments From

Shrikant S. Joshi
Jitendra N. Joshi

# Ramchandra Keshav & Co.

**GOLD, SILVER, DIAMOND AND PEARL JEWELLERY**

**TIME : 10.30 A.M. To 8.00 P.M.**
**Friday Closed**

53, Mohan Bldg., 162, J.S.S. Road, Girgaum, Mumbai 400 004.
Tel.: 2388 7874 / 2388 2060

# श्रीमठ संस्थान दाभोली ''घटना दुरूस्ती समिती'' अहवाल

श्रीमठ संस्थान दाभोली हे गेली २५० वर्षांहून अधिक काळ कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाजासाठी एक मार्गदर्शक, धार्मिक, सांस्कृतिक तसेच वेद विद्यांचे जतन करून परंपरा चालवणारे हक्काचे स्थान आहे. श्री शंकराचार्य यांच्या प्रेरणेने हिंदू धर्म व वेदाभ्यास या मौलिक ठेव्याचा लाभ येणाऱ्या पिढ्यांना मिळत राहावा या हेतूने श्रीमठ संस्थान दाभोलीची स्थापना श्रीमत् पूर्णानंद स्वामी यांनी केली. ज्याचे ऋण समस्त कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाज कधीही विसरू शकत नाही.



घटना दुरूस्थी अहवाल सुपूर्त करताना

श्रीमठ संस्थान दाभोलीच्या दि. २७/०४/२०१६ रोजी झालेल्या महासभेमध्ये ठरलेल्या ठरावानुसार घटना व नियमावली संदिग्ध असल्याने व घटनेतील तरतुदीनुसार उपनियम तयार नसल्याने तातडीने तशाप्रकारचा घटना बदल मसुदा व मठाच्या इतर सर्वांगीण विकासाबद्दल शिफारशी व सूचना तयार करून घ्याव्यात व याकरिता आपल्याच ज्ञातीतल्या जाणकार बांधवांची समिती नेमावी अशा प्रकारचा ठराव महासभेत ठरला.

त्यालाच अनुसरून दि. २२/०५/२०१६ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या मासिक सभेत श्रीमठ संस्थान दाभोलीशी बांधिलकी योगदान तसेच विविध क्षेत्रात तज्ज्ञ असलेल्या ११ जणांची समिती श्रीमठ संस्थान दाभोली विश्वस्त मंडळ यांनी गठीत केली. या घटना दुरुस्ती समितीने सर्व बारीक गोष्टींचा अभ्यास करून, आवश्यक त्या दुरुस्ती सुचवून, उपनियम व नियमावली शिफारशी तयार करून संपूर्ण अहवाल दि. ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत श्रीमठ संस्थान दाभोली, विश्वस्त मंडळाच्या सुपूर्त करावा असे ठरले.

त्याप्रमाणे खालील विविध क्षेत्रातील अनुभवी, ज्ञातीतील तज्ज्ञ अशा ११ जणांची निवड केली त्यांची नावे खालीलप्रमाणे:

१. श्री. मनीष दाभोलकर, अध्यक्ष - गोरेगाव, मुंबई
२. श्री. राजेश सामंत-कार्यवाह-कुडाळ
३. श्री. न.ना. पंतवालावलकर-सदस्य - डोंबिवली
४. श्री. वि.तू. प्रभू-सदस्य-गोवा
५. ॲड. सुर्यकांत प्रभूखानोलकर - सदस्य-वेंगुर्ले
६.श्री. विनायक खानोलकर - सदस्य-पुणे
७.ॲड. नारायण देसाई - सदस्य-कणकवली
८.डॉ. अशोक प्रभू - सदस्य- दादर, मुंबई
९.डॉ. माधव प्रभू - सदस्य-बेळगांव
१०.श्री. महेश ठाकूर-सदस्य-उडुपी, कर्नाटक
११. श्री. आदिनाथ पाटकर-सदस्य-पनवेल

वरील ११ जणांबरोबरच विश्वस्त मंडळाचे इतर सदस्य, श्री. सदाशिव महादेव बागलकर व श्री गुरुनाथ सदाशिव बागलकर तसेच संस्थानातील व ज्ञातीतील इतर मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक यांच्या मदत व सहकार्यामुळे हा घटना दुरुस्ती अहवाल दिलेल्या वेळेच्या आधीच पूर्ण करून दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी सुपूर्त करणे समितीला शक्य झाले.

अनेकांच्या भेटीगाठी घेऊन ज्ञातीतील इतर मठ व त्यांची सद्यस्थिती तसेच श्रीमठ संस्थान दाभोलीच्या सद्यपरिस्थिती मध्ये चालणारे व्यवस्थापन, कार्यपद्धती, भविष्यातील योजना, चालू उपक्रम, आर्थिक सक्षमता यांचा मागोवा घेऊन पुढील येणाऱ्या काळात मठाची वाटचाल कशाप्रकारची असावी याचा अभ्यासपूर्ण कार्य अहवाल, घटनादुरुस्ती, उपनियम याच बरोबर श्री मठाचा सर्वांगीण विकास, नावलौकिक समाजात आणखीन वाढावा, आर्थिक स्थिती मजबूत व्हावी व पुढील ५० वर्षांची मठाची वाटचाल कशाप्रकारची असावी यांचा एक प्रयत्न सुद्धा घटना दुरुस्ती समितीने केलेला आहे.

संपूर्ण घटनेतील संभाव्य बदल, शिफारशी व सूचना संस्थानाच्या महामंडळाच्या येणाऱ्या महासभेने मंजूर केल्यानंतरच लागू होतील. जास्तीत जास्त आजीव सभासद ज्ञातीबांधवानी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये चर्चेत सहभागी होऊन, नियमानुसार कार्यवाही करून त्यांची अंमलबजावणी करेल... अशा अपेक्षेसह सदर अहवाल घटना दुरुस्ती समितीचे अध्यक्ष श्री. मनीष दाभोलकर यांनी श्रीमठ संस्थानाचे कार्यवाह श्री. दिपक नाईक यांच्याकडे सुपूर्त केला.

श्रीमठ संस्थान दाभोली विश्वस्त मंडळ व घटना दुरुस्ती समिती सदस्य यांचे अभिनंदन आणि आभार!!!!

**संपादकीय मंडळ**

सस्नेह निमंत्रण

# गौड ब्राह्मण सभा, गिरगाव, मुंबई
# संस्थेचे ''वार्षिक स्नेहसंमेलन व वधू-वर मेळावा''

दरवर्षी प्रमाणे यंदाचे वार्षिक स्नेहसंमेलन रविवार दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी शारदाश्रम विद्यामंदिर, दादर येथे संध्याकाळी ४.०० ते ७.०० या वेळेत करण्याचे आयोजिले आहे. कार्यक्रमाचे समारंभध्यक्ष मा. श्री. रघुवीर दाभोलकर, Phd तसेच प्रमुख पाहुणे श्री. रणजीत देसाई, हे असणार आहेत, सदर कार्यक्रामात समाजातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचे मानांकित पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे. तसेच तरुण ज्ञातीबांधव श्री. योगेश रामदास, बेळगांव यांचा नाट्यसंगीत कार्यक्रम होईल. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कु. अधुरा प्रभू करतील. समस्त ज्ञातीबांधवांनी उपस्थित राहून आनंदोत्सवात सहभागी व्हावे.
**विशेष नोंद :** वधु-वर मेळावा स. ९.०० ते १.०० या वेळेत शारदाश्रम विद्यामंदिर येथेच पार पडेल.

# कुडाळदेशकर प्रीमियर लीग (KPL) -२०१७
## ✻ क्रीडा महोत्सव ✻
## Come One..... Come All

गेल्या वर्षी प्रमाणे यंदाचा क्रीडा महोत्सव दि. १४ व १५ जानेवारी, २०१७ रोजी करण्याचे आयोजिले आहे. क्रिडा मोहोत्सव २०१७ सर्वत्र दुर देशभर व्हावा असे मत सभेचे आहे. त्यासाठी आपल्या ज्ञाती संस्थाना आयोजनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन कण्यात आले आहे. त्यात दि. १४ जानेवारी, २०१७ रोजी विविध खेळांच्या स्पर्धा, तसेच ताज्या घडामोडीवर तरुण-तरुणींचे विचार, चर्चासत्र, थेट प्रश्न अशा प्रकारच्या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच १५ जानेवारी, २०१७ रोजी, क्रिकेटचे सामने होणार आहेत. सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी लवकरात लवकर आपली नावे संस्थेकडे द्यावीत.

**गौड ब्राह्मण सभा, गिरगाव**

**संपर्क :** १) डॉ. विलास देसाई - ९८१९७१८१५० २) श्री. मनीष दाभोलकर - ९८२१२५८०४७
३) श्री. सुभाष वाघ- ९८२०७५२४७९ ४) श्री. जगदीवन प्रभू- (०२२-२५६३८५३२)

## -: आवाहन :-

गौडब्राह्मण समाज, गोरेगांव तर्फे रविवार दि. १८ डिसेंबर रोजी केशव गोरे स्मारक, गोरेगाव (पश्चिम येथे) स्नेहसंमेलन आयोजित करण्याचा मानस असुन त्यामध्ये आपल्या समाजातील अबालवृद्धांनी आपल्या अंगभूत कलागुणांचे सादरीकरण करावे विशेषत: विद्यार्थी आणि तरुण वर्गाने हिरहिरीने भाग घेऊन संमेलन यशस्वी करावे.

ज्या ज्ञातिबांधवांना स्वत: किंवा पाल्याला कार्यक्रम सादर करावयाचा असेल तर त्याची रूपरेशा दि. १/१२/२०१६ पर्यंत कार्यवाहकडे पाठवावी. म्हणजे त्याची छाननी करून अंतिम यादिप्रमाणे संबधित इच्छूकांना कळविण्यात येईल. या वर्षी चा विषय आहे. **''प्रेम-प्रेमाच्या विवीध छटा''**

या प्रसंगी प्रसिद्ध होणाऱ्या 'कुडाळदेशकर वार्षिक अंका मध्ये वरील विषयावर माहितीपर लेख, व ..... साहीत्य कविता पाठवाव्यात. चांगले साहत्यि अंकामध्ये समाविष्ट केले जाईल.

या निमित्ताने दि. ११/१२/२०१६ रोजी गायन, चित्रकला, पाककला, वेशभूषा, रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या आहेत.
कृपया खाली दिलेल्या भ्रमणध्वनीशी संपर्क साधून आपली नावे नोंदवावित. ही विनंती.
कळावे.

**गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव.**

| कार्यवाह | खजीनदार | विश्वस्त |
|---|---|---|
| संजय सामंत | सौ. सुषमा सामंत | (सौ. वंदना दाभोलकर) |
| ९३२२२५०३१५ | ९९३०६००३२८ | ९८७०१५०५२४ |

# हार्दिक अभिनंदन !!!

**संपादकीय मंडळ**



गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव चे नवनीर्वाचीत अध्यक्ष श्री. मनीष दाभोलकर यांचे स्वागत करता श्री. व्ही. जी. सामंत.

गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव संस्थेची नुकतीच सन - २०१६ ते २०१९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडणूक झाली. यामध्ये यंदा प्रथमच तरुण, धाडसी, जनप्रिय मुत्सद्दी, धोरणात्मक निर्णयावर ठाम, सामाजिक कार्यकर्ते अशी छबी असलेले श्री. मनीष गुरुदास दाभोलकर यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

तत्कालीन अध्यक्ष मा.श्री. व्हि. जी. सामंत म्हणाले कि, ‘‘आपण सर्वांनीच तरुण पिढीला तसेच त्यांच्या विचारांना पाठिंबा दर्शविण्यासाठी त्यांच्यावर विश्वास व जबाबदारी टाकणे गरजेचे आहे, ते आपले कर्तव्यच आहे. खुर्ची मिळाली कि सहसा कोणीच सोडत नाही. परंतु हे सामाजिक कार्य आहे. त्यात तरुणांची उपस्थिती, समाजसेवा व सामाजिक बांधिलकी यांच्याबद्दलची अनास्था हि अनाकलनीय आहे. श्री. मनीष दाभोलकर यांनी नेहमीच नवनवीन कल्पना व विचारांना प्राधान्य दिले व तरुण पिढीची मोठगाठ बांधली आहे’’ असे गौरवोद्गार त्यांनी निरोपपर भाषणात काढले.

पुढे ते असे म्हणाले कि..... ‘‘सामाजिक कार्यकर्ते कितीही मोठे, निस्वार्थी वृत्तीने व आपुलकीने काम करीत असले तरी त्यांना वयोमर्यादेमुळे काम करण्यात अडचणी येतात. आधुनिक विचार, सामाजिक व भौगोलिक घडणारे बदल याचा समतोल साधताना प्रश्न निर्माण होतात. अर्थात हे सार्वत्रिक सत्य नाही. काही आपल्यातले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वयाच्या ऐंशीव्या वर्षी ही अतिशय चांगले काम करीत आहेत. ७५ वर्ष उलटल्यावर देखील काहीजण आपल्या समाजामध्ये १०-१२ तास कामे करताना दिसतात. तरुणांना लाजवेल असे त्यांचे काम व अनुभव आहेत. हे जरी खरे असले तरी जोपर्यंत ज्येष्ठ खुर्च्या उबवण्याचे सोडत नाहीत. तोपर्यंत पुढच्या पिढीला काम करता येणार नाही. एकीकडे आपला देश तरुणांचा देश असे म्हणायचे आणि दुसरीकडे तरुणांना संधीच मिळू द्यायची नाही. तरुणांना आकर्षित करून त्यांना अधिकार व जबाबदाऱ्या देऊन ज्ञाती संस्थांच्या मुख्य प्रवाहात घेतले पाहिजे. अशी तरुणांची पिढी तयार करणे हि आपली सामाजिक जबाबदारी सुद्धा आहे. पदच्च्युत झाल्यानंतर देखील मी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून गौड ब्राह्मण समाज, गोरेगांवचे काम करणारच आहे’’. श्री. व्हि. जी. सामंत यांच्या या निर्णयाने समस्त ज्ञाती संस्थांना व ज्ञातीला एक नवीन दिशादर्शकाचे महत्वाचे प्रेरणादायी कार्य केले आहे. श्री. व्हि. जी. सामंत यांना चार राष्ट्रपती पदकांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. ॲनिमेशन क्षेत्रात ते जगविख्यात आहेत.

गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव याची स्थापना १९८४ साली झाली. ज्ञातीतील कार्यकर्त्यांनी घरोघरी फिरून वर्गणी गोळा करून, पदरचे पैसे घालून संस्थेचे हक्काचे स्वमालकीचे कार्यालय उभे केले हे विशेष ! गेल्या ३२ वर्षांत संस्थेने वधू-वर मेळावे, शिष्यवृत्ती योजना, विविध शैक्षणिक पारितोषिके, वैद्यकीय उपचार निधी, मौजीबंधन, कन्यादान फंड, कुडाळदेशकर मुखपत्र, वाचनालय, वैद्यकीय उपकरणे इत्यादी गरीब व गरजवंतांना उपलब्ध करून दिली व या सर्वांचा लाभ ते घेत आहेत. समाजाला एकत्र करण्यासाठी व विचाराची आदान-प्रदान करण्यासाठी मोठ-मोठी संमेलने आतापर्यंत झाली ज्यात स्व. नर्मदाबाई देसाई टोपीवाले, डॉ. जगदीश सामंत, स्व. बाळ सामंत, स्व. एकनाथ ठाकूर, श्री. शशी प्रभू, स्व. रघुवीर सामंत, स्व. मंगेश पाडगावकर, श्री. सुधाकर प्रभू, डॉ. मीना प्रभू, श्रीमती निर्मला सामंत, श्री. देवदत्त दाभोलकर, प्रा. जगदीश वालावलकर इत्यादी अनेक मान्यवरांनी संमेलनाध्यक्ष पद भूषवून ज्ञातीला मार्गदर्शन व प्रबोधन केलेले आहे.

मा. श्री. मनीष दाभोलकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व भावी वाटचाली करिता शुभेच्छा !

**संपादकीय मंडळ**

## अमरनाथ तेंडूलकर यांना स्वर्गीय श्रीधर भिडे स्मृति उतुंग सेवानैपुण्य पुरस्काराने सन्मानीत.

**मुकुद सराफ**



**स्वर्गीय श्रीधर भिडे स्मृति उतुंग सेवानैपुण्य पुरस्कार स्विकारताना श्री. अमरनाथ तेंडूलकर व समारंभाध्यक्ष पंडीत प्रभाकर कारेकर.**

पार्ल्याबद्दल पार्लेभूषण, पद्मभूषण आणि महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु.ल. देशपांडे एकदा म्हणाले होते पार्ल्याची जमीन इतकी सुपीक आहे की इथे जे पेराल ते उगवते.

पुणे जर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असेल तर विलेपार्ले हे मुंबईचे सांस्कृतिक केंद्र आहे. साहजिकच सांस्कृतिक व सांगितिक संस्था पार्ल्यात अक्षरश: उदंड आहेत. पण गेली २२ वर्षे या तीनही कार्यांचा त्रिवेणी संगम असलेली पार्ल्यातील एकमेव आद्वितीय अशी संस्था म्हणजे ''उत्तुंग पारिवार ट्रस्ट'' नावाप्रमाणे तिचे कार्य उत्तुंग आहे. उत्तुंगच्या स्थापनेपासूनच्या दोन दशकाहून अधिक काळाच्या प्रवासात १५०१ कलावंतानी सादर केलेले वैविध्य व वैशिष्ट्यपूर्ण असे २५० हून अधिक कार्यक्रम पार्लेकर रसिकाना विनामुल्य दिले आहेत. यांच संस्थेने महाराष्ट्रातील १५० हून अधिक मान्यवरांचे सत्कारही केले आहेत. या मान्यवरांच्या मांदीयाळीत विद्यावाचस्फती श्री.शंकरराव अभ्यकर, कुष्टरोग निर्मूलनाला वाहन घेतलेले डॉ. जगदीश सामंत, नटश्री रामदास कामत अशी आहेत.

ह्यावर्षिचा स्वर्गीय श्रीधर भिडे स्मृति उत्तुंग सेवानैपुण्य पुरस्कार श्री. अमरनाथ तेंडुलकर याना समारंभाध्यक्ष ज्येष्ठ गायक पंडीत प्रभाकर कारेकर ह्यांच्या हस्ते देण्यात आला. ही आमच्या समाजाला स्वाभिमानाची गोष्ठ आहे. सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत, नाट्य संगीत व कलावंत सौ. वेदश्री ओक आपल्या. सुरवातीच्या भाषणांत म्हणाल्या मनमिळाऊ स्वभावाने बरोबर काम करणाऱ्याना आपलेसे करत दुसऱ्याचे दु:ख ते आपले दु:ख आणि विशेषत: गोरगरिबासाठी श्री. अमरनाथ तेडुंलकर यांनी गेली कित्येक वर्षे काम केले आहे. व गेली एक तप उत्तुंगच्या कार्यकारी मंडळात काम करीत आहेत.

श्री. अमरनाथ तेंडुलकर यांच्या ''उत्तुंग मधील सत्कार समारंभाचे सुत्र संचालन व निवेदन श्री. माधवराव खाडिलकर यांनी आपल्या नेहमीच्याच बहारदार व नम्रविनोदी शैलीत केले सदर प्रंसगी श्री. तेंडुलकरांच्या आयुष्यातील काही महत्वाच्या घटना व घडामोडींची Video Tape दाखविण्यात आली. त्यावरून त्यानी आपले क्रिकेट व. संगीताचे वेड वयाच्या बाराव्या वर्षापासून जोपासल्याचे लक्षात आले. त्यांनी वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी वसई तालुका क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व केले. ते हिन्दु जिमखाना, राजस्थान गौड सारस्वत ह्या क्लबमधुन तसेंच स्टेट बँक ऑफ इंडिया संघाकडून १५वर्षे खेळत राहीले, तसेच स्टेट बँकेच्या संघातून खेळताना अजित वाडेकर हनुमन्तसिंग, बाळू गुप्ते, विजय मांजरेकर, माधव आपटे, सुनील गावास्कर, एकनाथ सोलकर, दिलीप सरदेसाई, उमेश कुलकर्णी, अशा अनेक कसोटी वीराशी जवळचा संबंध आला व खेळण्याचे भाग्य व आनंद त्यांना लाभला.

स्टेट बँकेच्या पेडर रोड, शाखेत अधिकारी म्हणून काम करीत असताना स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, अशा भोसले, हृदयनाथ मंगेस्कर ह्यांच्याची बँकेच्या कामानिमित्त ओळख होण्याचा योग, जुळुन आला. एवढेच नव्हे तर क्रिकेटमधील विक्रमादित्य संचीन तेंडुलकर व संस्कृतचे पंडीत गाडगीळ ह्या भारत रत्नाची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली. तसेच त्यांच्या कामाची सचोटी पाहुन मा. श्रीमती आशा भोसले यांनी

अमरनाथ तेंडूलकर यांची त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर आपले स्वीय सहाय्यक म्हणून नेमणूक केली. हे पद त्यानी ४ वर्षे सांभाळले.

सत्कार प्रसंगी माधवराव खाडीलकर यानी आई-वडिलांच्या संस्कारामुळे घडत गेलेले अमरनाथ तेंडुलकर १२ वर्षापूर्वी उत्तुंगच्या परिवारात आले यांचा आम्हाला आनंद वाटतो तर समाज सेवक डॉ. जगदीश सामंत यानी अपल्या छोट्याशा भाषणांत मी गेली ५० वर्षे अमरनाथ तेंडुलकर यांना ओळखत असुन साध्या स्वभावाच्या या व्यक्तीमत्वांत धनापेक्षाही मनाची श्रीमंती व गरीबांसाठी मदत करण्याची तीव्र इच्छा मला गेले कित्येक वर्षे त्यांच्यात दिसून आली. लोकनायक जयप्रकाश नारायण कुष्टरोग ट्रस्टच्या कार्यात त्यांचा खुप मोठा वाटा आहे. आणि तो मी कधीच विसरणार नाही. अमरनाथ यांचे आणखीन एक स्वभाववैशिष्टय म्हणजे आपल्या स्वत:च्या ओळखीचा फायदा त्यानी इतरांसाठी केला. मग ती बँकेतील नोकरी, प्रमोशन व बदली असो. किंवा समोरच्या व्यक्तीची संस्थेची गरज असो ही त्यांची निस्वार्थी 'सेवा आहे.

सारस्वत बँकेचे तरुण व तडफदार अध्यक्ष श्री. गौतम ठाकुर आपल्या भाषणांत म्हणाले की सारस्वत बँकेचे संस्थापक आमचे पिताश्री एकनाथ ठाकुर व अमरनाथ तेंडुलकर ह्यांच्या १९६६ पासूनचा प्रदीर्घ सहवास असला तरी माझा व तेंडुलकर काकांचा संबंध मात्र अलीकडे १०-१२ वर्षापूर्वी आला. N.S.B. Projeet ची पार्ल्यातील माझी पहिली इमारत मी बांधत असताना पहिला फ्लॅट अमरनाथ काकांनी बुक करून माझ्यावर जो विश्वास द्वाखविला त्यांचे मोल फ्लॅटच्या सध्याच्या किमंतीच्या कितीतरी पटीने मोठे आहेच. पण त्याहीपेक्षा त्यांचे मला लाभलेले प्रोत्साहन व आशीर्वाद पृथ्वी मोलाचे आहेत.

अमरनाथ तेंडुलकर नावाच्या सेवाव्रती व्यक्तीमत्वाचा अमृतमोत्सवानिमित्त व त्याना मिळालेल्या स्व. श्रीधर भिडे स्मृति उत्तुंग सेवानैपुण्य पुरस्कार निमित्त जिवेत शरद: शतम, नंदेत शरद: शतम्, मौदेत शरद: शतम अशा त्यांच्या मित्रपरिवाराकडून शुभेच्छा!

❑❑❑

## सौ. निलम नितिन आजगांवकर यांना ''गुरू द्रोणाचार्य'' पुरस्काराने सन्मानीत.

माझे दिवंगत वडील कैलासवासी चंद्रकांत रामचंद्र आजगावकर व कै. अंजली चंद्रकांत आजगांवकर चेंबूर यांची सून सौ. निलम नितिन आजगावकर हिला सन २०१६ या वर्षाचा 'गुरु द्रोणाचार्य' पुरस्काराने आदर्श शिक्षक म्हणून सन्मानीत करण्यात आले.

सदर पुरस्कार शैक्षणिक व सामाजिक कार्यात नैपुण्य प्राप्त केल्यामुळे मा. खासदार श्री. किरीट सोमैय्या यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराच्या रुपाने शिक्षकांना मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या वतीने प्रमाणपत्र व शाल, श्रीफल देऊन गौरविण्यात येते. असा बहुमोल पुरस्कार माझी पत्नी सौ. निलम नितिन आजगावकर हिला प्रदान कण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात व समाजोन्नतीसाठी अमूल्य योगदना दिल्याबद्दल मा. मंत्री श्री. प्रकाश जावडेकर मानव संसाधन विकास, भारत सरकार यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम शिक्षक दिनांच्या निमित्ताने मुंबईत संपन्न झाला.



**पुरस्कार स्विकारताना सौ. निलम आजगावकर**

# हार्दिक अभिनंदन !

**स**न २०१६ सालामध्ये पार पडलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा एस्.एस्.सी. (S.S.C.), उच्च माध्यमिक एच्.एस्.सी (H.S.C.) परीक्षेत तसेच अन्य शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या ज्ञातीतील खालील विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश संपादन केले आहे. 'गौड ब्राह्मण सभे' तर्फे या सर्वांचे हार्दिक अभिनंदन ! विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या गुणांची टक्केवारी खालीलप्रमाणे :

**कुमारी साक्षी कमलाकर देसाई (कोल्हापूर)**



कुमारी साक्षी कमलाकर देसाई हिने शालांत परीक्षेत ९६.०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिचा संस्कृत व सोशल सायन्स विषयात केंद्रात प्रथम क्रमांक आला असून ती शालेय जीवनात एन.सी.सी. व वकृत्व स्पर्धेत सहभागी झाली होती. तिने पुढील शिक्षणासाठी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर येथे प्रवेश घेतला असून तिचे वडील श्री. कमलाकर रवींद्र देसाई हे भारती विद्यापीठ कोल्हापूर येथे अभियांत्रिकी विभागात प्राध्यापक असून तिची आई सौ. शुभांगी कमलाकर देसाई ह्या माध्यमिक शिशिका आहेत.

**कुमार मैत्रेय महेश ठाकूर (डोंबीवली)**




कुमार मैत्रेय महेश ठाकूर याने शालांत परीक्षेत ९५.५० टक्के गुण मिळवत स्पृहणीय यश संपादन केले असून त्याला माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्याही मिळाल्या आहेत. त्याने पुढील अभ्यासक्रमासाठी बन्सल ॲकडमी, कोटा, राजस्थान येथे प्रवेश घेतला आहे.

**कुमार मयुर अमृत सामंत (कुडाळ)**


कुमार मयुर अमृत सामंत याने शालांत परीक्षेत ९३.४० टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून, तो इयत्ता ४ थी व ७ वी च्या शिष्यवृत्ती धारक आहे. त्याला मॅकेनिकल इंजिनीयर व्हायचे असून त्याने पुढील शिक्षणासाठी तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेतला असून त्याचे वडील श्री. अमृत हरिश्चंद्र सामंत हे विजयदुर्ग एस.टी. आगारात सहाय्यक वाहतूक निरीक्षक असून त्याची आई सौ. अमिता अमृत सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार आदि हर्षद प्रभू (डोंबिवली)**



कुमार आदि हर्षद प्रभू याने शालांत परीक्षेत ९३.१७ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. हर्षद गोपाळ प्रभू हे बांधकाम व्यवसायिक असून त्याची आई सौ.माधवी हर्षद प्रभू ह्या शिक्षिका आहेत.

**कुमार अर्थव हेमंत सातोस्कर (चिपळूण)**



कुमार अर्थव हेमंत सातोस्कर याने शालांत परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. हेमंत माधवराव सातोस्कर हे विमा सर्व्हेयर असून आई सौ. अनिता हेमंत सातोस्कर ह्या बँक ऑफ इंडिया चिपळूण शाखेत व्यवस्थापक आहेत.

**कुमारी सोनाली अजित वालावलकर (कणकवली)**



कुमारी सोनाली अजित वालावलकर हिने शालांत परीक्षेत ९१.२० टक्के गुणासह उज्वल यश संपादन केले असून तिला सामान्य ज्ञान स्पर्धा-२०१३ मध्ये सुवर्ण पदक मिळाले असून तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील अजित भास्कर वालावलकर हे शेतकरी असून आई सौ श्रुतिकीर्ती अजित वालावलकर ह्या गृहिणी आहेत.



**कुमारी श्रिया दत्तप्रसाद पाटकर (भांडूप)**

कुमारी श्रिया दत्तप्रसाद पाटकर हिने शालांत परीक्षेत ९१.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला

आहे. तिचे वडील श्री. दत्तप्रसाद श्रीरंग पाटकर हे रूबी कोच कंपनी मध्ये व्यवस्थापक असून आई सौ. मृणाल दत्तप्रसाद पाटकर ह्या इंडियन नेव्हीमध्ये नोकरी करीत आहे.

**कुमार ओंकार विजय सामंत (बिबवणे-कुडाळ)**

कुमार ओंकार विजय सामंत याने शालांत परीक्षेत ९०.४० टक्के



गुणासह उज्वल यश संपादन केले असून त्याला चित्रकला, रांगोळी व वकृत्व स्पर्धेतही बक्षीसे मिळाली आहेत. त्याने पुढील शिक्षणासाठी तंत्र निकेतन मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. विजय रमाकांत सामंत हे किरकोळ व्यापारी असून आई सौ. मिलन विजय सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी स्नेहा सचिन प्रभु (विक्रोळी)**

कुमारी स्नेह सचिन प्रभु हिने शालांत परीक्षेत, ८९.४० टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. तिने वुशु स्टेट लेवल कॉम्पिटीशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असून अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाची ४ थी परीक्षा प्रथम क्रमांकात उत्तीर्ण केली असून तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. सचिन दत्तात्रय प्रभु हे मुकुंद आयर्न ॲन्ड स्टील कंपनीत नोकरी करीत असून आई सौ.सोनाली सचिन प्रभु ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी त्रिक्षा मनोज नाईक (वांद्रे)**



कुमारी त्रिक्षा मनोज नाईक हिने शालांत परीक्षेत ८८.२० टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून ती कराटे ह्या खेळाची ब्लॅक बेल्ट आहे. तिने पुढील शिक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक इंजिनीयरींग मध्ये प्रवेश घेतला आहे.

**कुमारी श्रुती गुरूनाथ सामंत (वराड)**



कुमारी श्रुती गुरुनाथ सामंत ही शालांत परिक्षेत ८८ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली असून तिने शिष्यवृत्ती परीक्षा, एन.टी.एस. एन.एम.एस., बी.डी.एस. परीक्षेत ही यश संपादन केले असून योगा स्पर्धा व बुद्धीबळ स्पर्धेत तालुका स्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेत ही बक्षीसे मिळवली आहेत. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. गुरूनाथ विश्वंभर सामंत हे शेतकरी असून आई सौ.संपदा गुरूनाथ सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार कौशल चंद्रशेखर गव्हाणकर (जोगेश्वरी)**

कुमार कौशल चंद्रशेखर गव्हाणकर यास शालांत परीक्षेत ८७.८० टक्के गुण मिळाले असून त्याला होमी भाभा परीक्षेत सुवर्ण पदक मिळाले होते तसेच तो इयत्ता ४थी व ७ वी च्या शिष्यवृत्तीधारक असून त्याने पुढील अभ्यासक्रमासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. चंद्रशेखर गव्हाणकर हे नोकरी करीत असून त्याची आई सौ. शुभांगी चंद्रशेखर गव्हाणकर ह्या शिक्षिका आहेत.

**कुमारी गायत्री गणेश बावकर (कणकवली)**

कुमारी गायत्री गणेश बावकर हिने शालांत परीक्षेत ८७.६० टक्के



गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून तिला सामान्य न्यान परीक्षेत सुवर्णपदक मिळाले होते. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला असून तिचे वडील श्री. गणेश दत्तात्रय बावकर हे शेतकरी असून आई सौ. गीता गणेश बावकर ह्या गृहिणी आहेत.

◆◆◆◆◆

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( १२वी H.S.C.)


**कुमारी सुस्मीता प्रमोद गोसावी (अर्नाळा)**



कुमारी सुस्मीता प्रमोद गोसावी हीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत ८६ टक्के गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन केले असून ती इयत्ता ७ वी ची शिष्यवृत्ती धारक असून तिला शालांत परीक्षेत ९३ टक्के गुण मिळाले होते तिने पुढील शिक्षणासाठी मनीपाल विद्यापीठात संगणक विभागासाठी प्रवेश घेतला असून तिचे वडील श्री. प्रमोद महादेव गोसावी हे आय.डी.बी.आय. बँकेत असून तिची आई सौ. निता प्रमोद गोसावी ह्या गृहिणी आहेत.


## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( १२वी H.S.C.)

### कुमारी अजिता रामचंद्र नायक (चेंबूर)



कुमारी अजिता रामचंद्र नायक हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ९४.६२ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ती महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती इयत्ता ७ वी मध्ये मुंबई मधून प्रथम आली असून तिला प्रज्ञा शोध परीक्षेत रौप्यपदक ही मिळाले होते. तिने इयत्ता ८वी व १०वी मध्ये नॅशनल टॅलेंट सर्च परीक्षा पहिल्या क्रमांकात उत्तीर्ण केली होती. तिने पुढील शिक्षणासाठी वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. रामचंद्र जगन्नाथ नायक हे केमिकल कंपनीत काम करीत असून तिची आई सौ. सुलेखा रामचंद्र नायक ह्या गृहिणी आहेत.

### कुमार श्रीधर उमेश पाटील (मुलुंड)




कुमार श्रीधर उमेश पाटील याने उच्च माध्यमीक परीक्षा वाणिज्य शाखेत ९३.५४ टक्के गुणासह उज्वल यश संपादन केले असून त्याने महाविद्यालयातून धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण व रौप्य पदक मिळविले असून बुद्धीबळ स्पर्धेत मुंबई जिल्ह्यातून पहिला आला असून त्याची राज्य पातळीवर स्पर्धक म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याला भविष्यात चार्टर्ड अकौंटंट व्हायचे असून त्याने त्यासाठी पोद्दार महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. उमेश पंढरीनाथ पाटील हे बृहन्मुंबई महानगरपालिकेत उपअधीक्षक असून त्याची आई सौ.उर्मिला उमेश पाटील ह्या देना बँकेत नोकरी करतात.

### कुमारी अदिती अभय पाटकर (भांडूप)



कुमारी अदिती अभय पाटकर हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८७.८५ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून तिने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष बी. कॉम मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. अभय ह. पाटकर हे मुंबई बंदर विश्वस्त मध्ये गोदाम अधिक्षक आहेत व आई सौ. अर्चना अभय पाटकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी नेत्रा लक्ष्मीकांत प्रभू (डोंबिवली)



कुमारी नेत्रा लक्ष्मीकांत प्रभू हिने बारावी विज्ञान शाखेत ८७.३८ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून तिला इयत्ता ४ ती व ७ वी ची शिष्यवृत्ती ही मिळाली आहे. ती शालांत परीक्षेत मुंबई विभागात ३री आली असून तिला उच्च शिक्षणसाठी राज्य शासनाकडून शिष्यवृत्ती ही मिळली असून तिने अखिल भारतीय पातळीवरील जिम्नॅस्टीक स्पर्धेत सुवर्णपदक ही मिळविले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी बी.एस्.सी. करण्याचे ठरवीले असून तिचे वडील श्री.लक्ष्मीकांत भोळे प्रभु ह्यांचे औषधाचे दुकान असून तिची आई सौ. शाल्मली लक्ष्मीकांत प्रभु ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी तन्वी सदाशिव देसाई (बोरीवली)



कुमारी तन्वी सदाशिव देसाई हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा विज्ञान शाखेत ८६.९२ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. तिचे वडील श्री.सदाशिव कमलाकर देसाई हे टाटा कन्सलटन्सी मध्ये सिनियर कन्सल्टंट आहेत. तिची आई सौ.पद्मजा सदाशिव देसाई ह्या चार्टर्ड अकौंटंट आहेत.


### कुमारी शर्ली शैलेश सामंत (गोरेगाव)

कुमारी शर्ली शैलेश सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र



परीक्षा वाणिज्य शाखेत ८५.५४ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून तिचे वडील श्री. शैलेश सामंत हे सारस्वत बँकेत असून आई सौ.स्मिता शैलेश सामंत ह्या सहकारी बँकेत ऑफीसर आहेत.

### कुमार ओंकार अमित परूळेकर (घाटकोपर)



कुमार ओंकार अमित परूळेकर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणापत्र परीक्षेत ८४.४६ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला असून त्याने पुढील शिक्षणासाठी बी.एस्.सी. मायक्रो बॉयोलाजीची निवड केली असून त्याचे वडील श्री. अमित नितीन परूळेकर ह्यांचा खाजगी व्यवसाय असून त्याची आई सौ.अनघा अमित परूळेकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार तेजस सदाशिव देसाई (बोरीवली)**



कुमार तेजस सदाशिव देसाई ह्याने १२वी विज्ञान शाखेत ८३.८५ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादनत केले असून त्याचे वडील श्री. सदाशिव कमलाकर देसाई हे टाटा कन्सलटन्सी मध्ये सिनियर कन्सल्टंट असून आई सौ. पद्मजा सदाशिव देसाई ह्या चार्टर्ड अकौंटंट आहेत.

**कुमारी पूनम सदाशिव प्रभू (तेर्सेबांबर्डे)**


कुमारी पूनम सदाशिव प्रभू हिने १२वी वाणिज्य शाखेत ८३.३२ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले असून तिने पुढील शिक्षणासाठी, संत राऊळ महाराज महाविद्यालय वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला असून तिची आई श्रीमती सविता सदाशिव प्रभु ह्या शेती करतात.

**कुमारी पूजा राजेंद्र देसाई (डोंबिवली)**




कुमारी पूजा राजेंद्र देसाई हिस १२ वी वाणिज्य शाखेत ८२.६६ टक्के गुण मिळाले असून तिने पुढील शिक्षणात बी.कॉम करायचे ठरविले आहे. तिचे वडील श्री.राजेंद्र हरिश्चंद्र देसाई हे नोकरी करीत असून आई सौ. मेघना राजेंद्र देसाई ह्या गृहिणी आहेत.

**कुमार ऋग्वेद महेश परूळेकर (डोंबिवली)**




कुमार ऋग्वेद महेश परुळेकर यास १२वी विज्ञान शाखेत ८२ टक्के गुण मिळाले असून त्याला इयत्ता ४थी व ७ वीची शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याला नॅशनल टॅलेंट सर्च परीक्षेत विशेष प्राविण्य मिळाले. असून तो महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत जिल्ह्यात ५ वा आला होता त्याला शालांत परीक्षेतही ९७ टक्के गुण मिळाले होते. त्याने पुढील शिक्षणासाठी रिझवी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मध्ये प्रवेश घेतला असून त्याचे वडील श्री. महेश सुधाकर परुळेकर व आई सौ. मेघा महेश परूळेकर ह्यांची स्वत:ची पॅथोलॉजी लॅब आहे.

**कुमार अथर्व मेघश्याम सामंत (डोंबिवली)**



कुमार अथर्व मेघश्याम सामंत यास १२वी वाणिज्य शाखेत ८०.६२ टक्के गुण मिळाले असून त्याला महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्याही मिळाल्या होत्या. त्याने पुढील शिक्षणासाठी बॅचलर ऑफ अकौट ॲन्ड फायनान्स (B.A.F.) ह्या उदिमामध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. मेघश्याम रामचंद्र सामंत हे लघु उद्योजक असून आई सौ. मृणाल मेघश्याम सामत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार अक्षय रघुनाथ पाटील (जोगेश्वरी)**



कुमार अक्षय रघुनाथ पाटील ह्यास १२वी विज्ञान शाखेत ८०.३० टक्के गुण मिळाले असून त्याला इयत्ता ४थी व ७ वीच्या शिष्यवृत्त्या मिळाल्या होत्या. त्याला होमी भाभा परीक्षेत रौप्य पदक मिळाले अूसन त्याने गणित संबोध व गणित प्राविण्य परीक्षेत यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी इलेक्ट्रॉनीक इंजिनीयरींग मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. रघुनाथ सहदेव पाटील हे कॅनरा बँकेत व्यवस्थापक असून त्याची आई सौ. स्मिता रघुनाथ पाटील ह्या इंडियन बँकेत कार्यरत आहेत.

**कुमारी प्रतिक्षा अरविंद सामंत (कुंभवडे)**

कुमारी प्रतिक्षा अरविंद सामंत, हीस १२वी वाणिज्य शाखेत ७७.५४ टक्के गुण मिळाले असून तिने पुढील शिक्षणासाठी बी.कॉम साठी प्रवेश घेतला असून तिचे वडील श्री. अरविंद यशवंत सामंत हे शेतकरी असून आई सौ. आशालता अरविंद सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी प्राजक्ता राजाराम गवाणकर (कुडाळ)**



कुमारी प्राजक्ता राजाराम गवाणकर हिस १२वी विज्ञान शाखेत ७७.०८ टक्के गुण मिळाले असून तिला सुगम संगीत गायन स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळाले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष सिव्हील इंजिनियरींग मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. राजाराम पांडूरंग गव्हाणकर ह्यांचे संगीत क्लास असून तिची आई सौ. राणी राजाराम गवाणकर ह्या सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेत ज्युनीयर ऑफीसर आहेत.




**कुमारी पुजा सदाशिव वालावलकर (पिंगुळी)**

कुमारी पूजा सदाशिव वालावलकर हिस १२वी विज्ञान शाखेत ७६.३१ टक्के गुण मिळाले असून तिने संस्कृत गीता-माता परिक्षा एलिमेंटरी आणि इंटरमिजीएट ह्या चित्रकलेच्या परीक्षा व गंधर्व महाविद्यालयाची शास्त्रीय संगीत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी बॅचलर ऑफ फार्मसी मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. सदाशिव गोरखी वालावलकर व आई सौ. सुप्रिया सदाशिव वालावलकर ह्यांचे औषधाचे दुकान

## अन्य परीक्षा

**कुमार सुबोध गोविंद देसाई (बोरीवली)**




कुमार सुबोध गोविंद देसाई याने बी.ई. इलेक्ट्रॉनिक अॅन्ड टेलीकम्युनिकेशन परीक्षेत ९.८ पॉईंटस (९१ टक्के) गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले असून तो कॅपजेमीनी, पुणे येथे सेवेत रूजू झाला आहे. त्याची आई श्रीमती अमिता गोविंद देसाई ह्या एम.टी. एन. एल. मध्ये नोकरी करीत आहे.

**कुमारी रुपाली संजय केळूसकर (विरार)**



कुमारी रुपाली संजय केळूसकर हीने संगणक शास्त्रामध्ये ८१ टक्के गुण घेऊन बॅचलर ऑफ इंजिनीयरींग उत्तीर्ण झाली असून तिला कोडींग परीक्षेत प्राविण्य व निबंध स्पर्धेतही बक्षीसे मिळाली आहेत. तिला पुढे एम. ई. करायच असून तिचे वडील संजय प्रभाकर केळूसकर हे टी. आय.एफ.आर मध्ये पर्चेस अधिकारी असून आई सौ. मनाली संजय केळूसकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार अमोघ जयवंत परूळेकर (डोंबिवली)**



कुमार अमोघ जयवंत परूळेकर ह्याने एम.बी.ए. (मास्टर्स इन बीझनेस अॅडमिनिस्ट्रेशन) ही परीक्षा ६६ टक्के गुणासह उत्तीर्ण झाला असून तो गोगटे इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ह्या कॉलेजमधून प्रथम आला आहे. त्याची गोगटे कॉलेज मधून औद्योगिक भेटीसाठी हॉगकाँग आणि शांघाय ह्या दौऱ्यासाठी नियुक्ती झाली आहे. त्याचे वडील श्री. जयवंत परूळेकर हे आय.आय.टी., पवई मधून बी. टेक झाले आहेत व त्याची आई सौ. प्रभा परूळेकर ह्या सेवानिवृत्त बँक ऑफिसर आहेत.

**कुमारी प्रणिता संजय देसाई (डोंबिवली)**



कुमारी प्रणीता संजय देसाई हि जमनालाल बजाज इन्स्टीट्यूट मधून एम.बी.ए. ही परीक्षा ७३ टक्के गुणाने उतीर्ण झाली आहे. तिला शालेय जीवनात इयत्ता ७ वी ची शिष्यवृत्ती, एम.टी.एस्. शिष्यवृत्ती व इंटरमीजीएट ड्रॉईंग शिष्यवृत्ती मिळाली आहे. तिचे वडील श्री. संजय दिगंबर देसाई हे उद्योगपती असून आई सौ.आशा संजय देसाई ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी चैताली भालचंद्र प्रभूखानोलकर (सावंतवाडी)**


कुमारी चैताली भालचंद्र प्रभूखानोलकर ही मुंबई विद्यापीठाची LL.B. परीक्षा उत्तीर्ण झाली असून तिला निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला असून Moof -Court स्पर्धेत तृतीय क्रमांक आला आहे. तिचे वडील श्री. भालचंद्र कृष्णाजी प्रभुखानोलकर हे अद्विता कॉम्प्युटर्स मध्ये हिशेब तपासणीस असून आई सौ. अद्विता भालचंद्र प्रभूखानोलकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार राहुल राजाराम गवाणकर (कुडाळ)**



कुमार राहुल राजाराम गवाणकर ह्याने भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी येथून बी. ए. एम. एस ही परीक्षा ६८ टक्के गुणासह उत्तीर्ण केली असून त्याने महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याला महाविद्यालयातून सलग दोन वर्षे आदर्श विद्यार्थी पुरस्कार मिळाला असून त्याची बॅडमिनटन खेळात विद्यापीठ स्तरावर निवड झाली आहे. सध्या त्यांची भाईसाहेब महाविद्यालयात इंटरन्सशिप चालू असून त्याचे वडील श्री. राजाराम पांडुरंग गवाणकर हे संगीत क्लास चालवतात तर त्याची आई सौ. राणी राजाराम गवाणकर ह्या सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कनिष्ठ अधिकारी आहेत.

**कु. अपूर्वा गुरूनाथ खानोलकर**



सौ. वर्षा आणि श्री. गरुनाथ खानोलकर ह्यांची कन्या कुमारी अपूर्वा खानोलकर हिने अमेरिकेतील नामांकित (Yale) वॅले विद्यापीठांतून मास्टर इन आर्किटेक्चर ही डिग्री पहिल्या क्रमांकात मिळवीली असून तिने पूर्ण ॲकॅडमीक वर्षात प्रथम क्रमांक कधी सोडला नाही. तिच्या ह्या उल्लेखनीय यशामुळे तिला मानाची अशी हाऊसहोल्डर शिष्यवृत्तीही मिळाली आहे. अपूर्वाच्या ह्या उल्लेखनीय यशा बद्दल सवत्र तिचे कौतुक होत आहे.

# ⁕ शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त ज्ञातिबांधवांना आवाहन ⁕

कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण ज्ञातीतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या व शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याच्या उदात्त हेतूने, ज्ञातीतील काही व्यक्तींनी एकत्र येऊन डिसेंबर १८९४ मध्ये कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज या संस्थेची स्थापना केली. ज्ञातीबांधवांच्या सहकार्याने ह्या संस्थेचे कार्य वृद्धिंगत होत गेले आणि आता २०१९ मध्ये संस्थेला १२५ वर्षे होत आहेत. संस्थेच्या वाटचालीतील ह्या महत्त्वाच्या टप्प्यावर, आजवरच्या कार्याचा आढावा घेणे, संस्थेच्या कार्यात बहुमोल साहाय्य केलेल्या ज्ञाती बंधू भगिनींप्रती कृतज्ञता व आदरभाव व्यक्त करणे, नव्या उमेदीने भविष्यकाळातील वाटचाल करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाची आखणी करणे अशी बहुविध उद्दिष्टे समोर ठेवून **दि. १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ हे वर्ष ''शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष''** म्हणून साजरे करण्याचे संस्थेने ठरविले आहे.

## ⁕ आजवरचे कार्य ⁕

सध्या संस्थेकडे शिष्यवृत्त्यांसाठी व पारितोषिकांसाठी रुपये **२८३ लाख ''कायम निधी'' आणि रुपये १९ लाख ''कार्यालय व सभागृह निधी''** म्हणून उपलब्ध आहे. कायम निधीच्या व्याजातून गरजू व होतकरू ज्ञाती विद्यार्थ्यांना प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण, तसेच अभियांत्रिकी व वैद्यकीय व्यवसाय शिक्षण आणि काही प्रमाणात परदेशी उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्त्या दिल्या जातात. सन २०१५-१६ साली **३८९ विद्यार्थ्यांना रु. १७.७२ लाख** च्या शिष्यवृत्त्या मंजूर करण्यात आल्या.

ह्या खेरीज इयत्ता १० वी व १२ वी मध्ये तसेच पदवी परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पारितोषिके देऊन समारंभपूर्वक कौतुक केले जाते. आपल्या समाजाच्या सध्याच्या शिक्षणा विषयक गरजा लक्षात घेता, अद्याप बरेच काही करणे आवश्यक आहे ह्याची संस्थेस जाणीव आहे आणि त्या दिशेने संस्था प्रयत्नशिल आहे.

## ⁕ आगामी वाटचाल ⁕

**१. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्यांच्या रकमेत भरीव वाढ करणे.**
**२. विशेष अर्थसाहाय्य शिष्यवृत्ती योजनेची व्याप्ती वाढविणे.**
**३. परदेशी शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणे.**
**४. पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याची मदत विद्यार्थ्यांना देणे.**
**५. व्यवसायभिमुख शिक्षणासाठी मार्गदर्शन करणे व आर्थिक मदत देणे.**

**ह्या उद्दिष्ट पूर्तीसाठी संस्थेच्या कायमनिधीत किमान रु.५ कोटीची भर पडणे आवश्यक असून शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत** हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे योजीले आहे. त्यापैकी आतापर्यंत सुमारे ४९ लाखांच्या देणग्या मिळाल्या आहेत. आपणा सर्वांच्या सक्रिय सहकार्याने हे उद्धिष्ट साध्य होऊ शकेल असा आम्हांला विश्वास आहे.

**आपल्याला खालील प्रमाणे सहकार्य करता येईल.**

१) संस्थेच्या कायम निधीसाठी भरघोस देणगी देणे.
२) नातेवाईक व मित्रमंडळी ह्यांना विनंती करून संस्थेला देणग्या मिळवून देणे.
३) आपण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्यास शिष्यवृत्तीची परतफेड करावी व इतरांस तसे करण्यास उद्युक्त करावे.
४) ज्या ज्ञातीबांधवांची मुले-मुली परदेशी सुस्थापित (well settled) आहेत त्या ज्ञातीबांधवांनी आपल्या मुला-मुलींना विद्यावृद्धि समाजाचे कार्य समजावून देऊन ज्ञातीसंस्थेसाठी त्यांच्याकडून देणग्या मिळवून द्याव्यात.
५) स्मरणिकेसाठी जाहिराती मिळवून देणे.

निधी संकलनाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने **संस्थेस किमान रु. ५०,०००/- देणगी नवीन १००० आश्रयदाते**

**सभासद** नोंदविणे आवश्यक आहे. अर्थात यथाशक्ती दिल्या जाणाऱ्या लहान मोठ्या देणग्यांची तेवढ्याच प्रेमाने स्वीकार करण्यात येईल. समस्त कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण ज्ञातीबांधवांना गौरवास्पद असे हे विद्यावृद्धि समाजाचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष, आपण सर्व मिळून आनंदाने भव्य प्रमाणात साजरे करूया.

आपण सर्व गरजू व होतकरू ज्ञाती विद्यार्थ्यांना सढळ हस्ते मदत कराल असा विश्वास आहे.

आपले नम्र,
संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि व्यवस्थापक मंडळ

देणगीचा चेक ''कु. दे. गौ. ब्रा. विद्यावृद्धि समाज'' या नावाने काढावा.
Cheque to be drawn favouring "K.D.G.B. Vidhyavriddhi Samaj"

आपण आपली देणगी संस्थेच्या पुढील खात्यात जमा करू शकता.

| बँकेचे नाव | शाखा | खाते क्र. | आय.एफ.एस.सी. |
|---|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | गिरगाव | 30369726019 | SBIN 0000374 |
| बँक ऑफ महाराष्ट्र | गिरगाव | 20053769021 | MAHB0000006 |

देणगी पाठविल्यानंतर कृपया ई-मेल ने कळवावे हि विनंती.

❑❑❑

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

हार्दिक शुभेच्छा !

व्ही. डी. प्रभुकेलूसकर

सदस्य अभिकर्ताओंके लिये अध्यक्ष क्लब
कोड नं. : १०८९१८

V. D. Prabhukeluskar
Member of the Chairman's Club for Agents
Code No. 108918

LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

**Off.:** Br. 891, Swapna Siddhi, Akurli Road, Near Railway Station, Kandivali (East), Mumbai-400 101. Tel. : 28870023

**निवास :** भवानी नगर, प्लॉट नं.१, बिल्डींग नं.२, ब्लॉक नं. ४, लोटस को-हौ. सो., मरोळ, मुंबई ४०० ०५९. टेली : २९२५ ९५५५ मो. : ९८६९०३०९६५

स्थापना : १८९४ दूरध्वनी : २३८२ १६७५

# कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज

संस्था नोंदणी अधिनियम १९६० आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोदवलेली विश्वस्त संस्था (नोंदणी क्र. ए. १२४९ (मुंबई))

३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगांव, मुंबई ४०० ००४.

E-mail : kdgb.viddthavidi@gmail.com Website : www.kdgb-vidhayavriddhisamaj.com

माननीय अध्यक्ष, दिनांक : __________

कुडाळदेशस्थ गौडबाह्मण विद्यावृद्धि समाज, मुंबई

गिरगांव, मुंबई - ४०० ००४. ह्यांस,

महोदय,

**१) मी आपल्या संस्थेस देणगी म्हणून** रु. __________ (अक्षरी रु. __________ __________) रोख / धनादेशाद्वारे पाठवित आहे त्याचा कृपया स्विकार व्हावा. देणगीविषयी तपशील पुढे/सोबतच्या पत्रात दिला आहे.

| | |
|---|---|
| समाज कायम फंडासाठी | रु. |
| स्वतंत्र कायम शिष्यवृत्ती फंडासाठी | रु. |
| स्वतंत्र कायम पारितोषिक फंडासाठी | रु. |
| शतकोत्तर रौप्य महोत्सवी शिष्यवृत्ती फंडासाठी | रु. |
| | रु. |
| | एकूण रु. __________ |

**२) देणगीदार व्यक्तीची माहिती :**

पूर्ण नांव : __________ जन्म दिनांक : __________

वडिलांचे पूर्ण नाव : __________

पतीचे पूर्ण नाव : __________

मुळ गाव : __________ गोत्र : __________

रहाण्याचा पत्ता :

पिन कोड ☐☐☐☐☐☐

भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्र.: __________ E-mail : __________

मी कुडाळदेशकर गौडब्राह्मण ज्ञातीचा / ची असून आपल्या संस्थेची घटना व नियम मला मान्य आहेत.

मला आपल्या संस्थेचे सभासद करून घ्यावे ही विनंती.

मी आपल्या/संस्थेचा /ची सभासद आहे.

देणगीदार (सही)

**(कार्यालयीन वापराकरिता)**

| | |
|---|---|
| पावती क्र. | व्यवस्थापक मंडळाच्या दि. च्या सभेत नोंद घेतली. |
| दिनांक | चिटणीस (सही) __________ |
| | कार्याध्यक्ष (सही) __________ |

योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करावी. __________

## श्रद्धांजली

गौड ब्राह्मण ज्ञातीतील खालील महनीय व्यक्तींचे दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल गौड ब्राह्मण सभेला अतीव दु:ख होत आहे. गौड ब्राह्मण सभा त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच प्रार्थना!

# कर्मयोगी डॉ. सुशीला सामंत



डॉ. सुशीला लक्ष्मण सामंत यांचे दिनांक २२ मे २०१६ रोजी मडगांव, गोवा येथे अकस्मात दुख:द निधन झाले. डॉ.सुशीला या मुळच्या कोल्हापूर मधील आजऱ्याच्या. कोंकणातून घाट चढून देशावर येणाऱ्या वाटसरुंचा पहिला पाडा पडत असे तो आजरा ह्यागावी. म्हणूनच कुडाळ प्रांतातून स्थलांतर केलेल्या कुडाळ देशकरांची बऱ्यापैकी वस्ती ह्या गावात होती. पण गावाचे एकूण वातावरण होते अती सनातनी. बहुजन समाजाच्या बहुतेक मुलीची लग्ने चौथी ते सातवीच्या वर्गात असताना होत. ब्राह्मणांच्या मुलींची प्रगती तत्कालीन मॅट्रीक पर्यंत होत असे. हाताच्या बोटांवर मोजता येण्या इतके मुलगे महाविद्यालयात पोहोचत. त्यातला एखादा बी.ए. किंवा बी.कॉम ची पदवी प्राप्त करण्यात यशस्वी होई. तत्कालीन आजरा महालाच्या ८६ गावांमध्ये एकही पदवीधर डॉक्टर नव्हता. अशा काळात जन्मलेलेल्या एका मुलीने मुंबईच्या ग्रँट मेडीकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळवून एम.बी.बी. एस. ची पदवी प्राप्त केली. त्या मुलीचे नाव होते डॉक्टर सुशिला आप्पासाहेब परुळकेर. आजरा महालातूनच नव्हे तर कुडाळदेशकर ब्राह्मण समाजातील एम. बी.बी. एसची पदवी प्राप्त करणारी ती पहिलीच मुलगी होती. इ.स. १९५९ च्या त्या काळात आजऱ्याहून मुंबईचा प्रवासच मुळी अती खडतर होता. आजरा ते कोल्हापूर, कोल्हापूर ते मिरज हा एस. टीचा नंतर मिरज ते पुणे आणि नंतर पुणे ते मुंबई हा रेल्वेचा, असे टप्पे पार करावे लागत. एकूण पाच वर्षे वर्षातून किमान दोन वेळ सुशिलाने तो प्रवास धीराने आणि चिकाटीने केला आणि १९६४ साली एम.बी.बी. एस. ची पदवी प्राप्त केली, एवढेच नव्हे तर पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता मिळवली. पण पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेणे मात्र तिला शक्य झाले नाही. सुशिला माझी बहीण. वयातील अंतर ११ वर्षांचे. वडील पेन्शनर. दरमहा मिळणारा पेन्शन आणि वडीलोपार्जीत जमिनीतून मिळणारा वार्षिक खंड ह्या मिळकतीतून त्यांनी सुशिलाच्या एम.बी.बी.एस. पर्यंतच्या शिक्षणाचा खर्च केला. कुळकायद्याच्या अंमलामुळे रोडावरत चाललेल्या शेतीच्याउत्पन्नातून त्याना आपल्या पुढील शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण जाणार आहे हे समजून घेऊन सुशिलाने पदव्युत्तर शिक्षणाचा विचार सोडून दिला. सन १९६५ च्या मे महिन्यात डॉक्टर सुशिला आप्पासाहेब परुळेकर, डॉक्टर (सौ.) सुशिला लक्ष्मीकांत सामंत होऊन गोव्याचे पुणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मडगावात आली. गोव्यातही त्या काळी महिला डॉक्टरांची संख्या तशी कमी होतीच, त्यातही एम.बी.बी.एस. झालेल्या हिंदू महिला डॉक्टरांची संख्या नगण्य होती. त्यामुळे जेव्हा गोवा शासनाने कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम राबवायला घेतला तेव्हा डॉक्टर सुशिला सामंतना अगत्याने बोलवून घेऊन त्यांच्याकडे मडगाव येथील कुटुंब कल्याण केंद्राचा कारभार सोपविण्यात आला. पुढील दहा वर्षे त्यांनी ती जबाबदारी अतिशय समर्थपणे व निष्ठेने सांभाळली. त्या नंतर काही काळ राज्य शासनाची वैद्यकीय अधिकारी म्हणून कर्तव्य बजावून सेवानिवृत्ती घेतली. त्यांनी स्वत:ला समाजकार्याला वाहून घेतले. अनेक सामाजिक आणि शैक्षणीक उपक्रमांना भरघोस मदत दिली. स्वत:ची जवळ जवळ ३० लाख रुपयांची बचत त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक संस्थाना देणग्या देण्यासाठी खर्च केली. हे सर्व करत असताना त्यांनी आपली व्यावसायीक निष्ठा अबाधित राखली. त्यांच्यावरील श्रद्धेमुळे, आजी, मुलगी आणि नात अशा तीन पिढ्या विश्वासाने त्यांच्याकडे वैद्यकीय सल्ला घेण्यासाठी येत. त्यांनी ही कोणाला निराश केले नाही. समाजातील सर्व स्थरातील महिलांना त्यांनी जवळ-जवळ मोफत वैद्यकीय सल्ला दिला. त्यांचे हे कार्य त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत चालू होते. २२ मे २०१६ ह्या दिवशी त्यांचे अकस्मात निधन झाले. डॉक्टरच्या निधनाची बातमी ऐकून रडणाऱ्या पेशंट महिलांची झालेली गर्दी हीच त्यांच्या कार्याची प्रचिती होती.

मुंबईतील आपल्या कुडाळदेशकर ज्ञातीसंस्था बद्दलही त्यांना आपुलकी होती. कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंडाच्या शतकमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने संस्थेने हाती घेतलेल्या कायम फंड गोळा करण्याच्या योजनेत त्यांचा सहभाग होता. सन २०११ सालात कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समजाने कुडाळ येथे आयोजित केलेल्या संस्थेच्या पारितोषिक वितरण व कौतुक सोहळ्याला त्यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून मुलांना मार्गदर्शन केले होते.

## कै. जगन्नाथ भगवंत महाजन



श्री. जगन्नाथ भगवंत महाजन ह्यांचे दि. १७ ऑक्टोबर २०१६ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. कै. जगन्नाथ भगवंत महाजन यांचा जन्म देवगड तालुक्यातील मुणगे ह्या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण तेथेच झाले. त्यानी आपल्या चरितार्थासाठी ते मुंबईत आले तेथे त्यांनी उच्च शिक्षण घेवून मुंबई महापालिकेत ते नोकरीस लागले व आपल्या कुशाग्र बुद्धीने व अथक प्रयत्नाने ते मुंबई महानगर पालिकेच्या जनसंपर्क अधिकारी (P.R.O) ह्या पदापर्यंत पोहचले. कै. ज. भ. महाजन ह्यांचे आपल्या ज्ञातीवर व ज्ञातील संस्थावर भरपूर प्रेम होते. त्यानी आपल्या ज्ञातीच्या गौड ब्राह्मण सभा, विद्यावृद्धी समाज व निराश्रीत सहाय्यकरी फंड या तीनही संस्थांवर ते कार्यरत होते तर गौड ब्राह्मण सभा, गिरगाव तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या ''गौड ब्राह्मण'' ह्या त्रैमासिकाचे ते संपादक ही होते.

दि. २७ डिसेंबर २०१४ रोजी पार पडलेल्या ''गौड ब्राह्मण' ह्या त्रैमासिकाच्या अमृत महोत्सवा प्रीत्यर्थ त्यांचा सत्कार व सन्मानीत करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास ते, त्याची तब्बेत साथ देत नसतानांही अर्वाजून उपस्थित होते. तसेच त्यांना आपले धार्मिक क्षेत्र श्रीमठ संस्थान, दाभोली ह्या संस्थे विषयी विशेष आदर व आपुलकी होती. कोकणात आपल्या गावी गेल्यावर अगत्याने दाभोली मठास भेट देत असत व स्वामींचा आशीर्वाद घेत असत.


कै. जगनाथ भगवंत महाजन ह्यांच्या पश्चात तीन मुलगे आहेत त्याची तीनही मुले उच्च विद्याविभूषीत असून ती लंडन व अमेरीका शहरात मोठ्या हुद्यावर कार्यरत आहेत. ह्या सर्वांचे श्रेय ते आपल्या स्वर्गवासी धर्मपत्नीस देतात.

## कै. सुरेश धोंडों वालावलकर



अर्नाळा येथे वास्तव्यास असलेले श्री. सुरेश धोंडों वालावलकर यांचे शुक्रवार दि. ४-११-२०१६ रोजी रात्रौ १२.५० वाजता त्यांच्या राहत्या घरी वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. ते मुंबई येथील PWD खात्यातून २००२ साली सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, मुलगी, जावई आणि नातू असा परिवार आहे.

## कै. तुकाराम दत्ताराम ठाकूर



आजरा, जिल्हा कोल्हापूर येथील माजी सैनिक मेजर श्री.तुकाराम दत्तात्रय ठाकूर यांचे दिनांक १६ सप्टेंबर २०१६ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी दु:खद निधन झाले. मेजर ठाकूर या नावाने ते कोल्हापूर जिल्ह्यात परिचित होते. त्यांनी माजी सैनिकांसाठी सुरू केलेल्या पतसंस्थेची आजही यशस्वीरीत्या वाटचाल चालू आहे. कै. तुकाराम दत्तात्रय ठाकूर यांचा स्वभाव प्रेमळ व मनमिळावू होता. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकार्यासाठी घालविले. कै.तुकाराम ठाकूर यांच्या पश्चात त्यांची पत्नी दोन मलगे व एक मुलगी असून हे तीनही डॉक्टर आहेत. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. नित्यानंद ठाकूर हे पुण्यातील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ असून त्यांनी ८०० ग्रॅम वजन असलेल्या अर्भकावर यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. त्यांचा दुसरा मुलगा डॉ. श्रद्यानंद यांचा आजरा येथे दवाखाना असून त्यांच्या कन्येचा गोरेगाव येथे दवाखाना आहे. अशा रीतीने तीनही मुले डॉक्टर असून ते गोर गरिबांची सेवा करीत आहे. ह्या सर्वांचे श्रेय ते आपल्या आई-वडीलांना देतात.

## कै. रामचंद्र (उर्फ-कुंजा) घन:शाम देसाई सोनावडेकर



कै. रामचंद्र (उर्फ-कुंजा) घन:शाम देसाई सोनावडेकर ह्यांनी १९२५ - २०१६ ह्या कालावधीत अनेक विविध क्षेत्रांत महनीय कार्य करून देशाच्या सर्वांगीण विकासात आपल्या परीने मोठा वाटा उचेलला. कै. रामचंद्र उर्फ कुंजा घन:शाम देसाई सोनवडेकर यांचे ता. २८.१०.२०१६ रोजी आकस्मिक निधन झाले.

त्यानी साहित्य, संशोधन, पत्रकारिता, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कार्य केले. त्यांना समाज सेवेची तळमळ होती त्यामागे असलेली त्यांची निष्ठा म्हणजे तरुण पिढी समोर एक ज्वलंत प्रेरणा होती.

त्यांच्या मागे त्यांची सुविद्य पत्नी, मुलगा डॉ. राजेंद्र व मुलगी संपदा आणि नातवंडे असा परिवार आहे.

# कै. श्री. गो. म. दाभोलकर उर्फ गोविंदराव



संस्थेचे सल्लागार केळुसभुषण, शिक्षणमहर्षी या वेगवेगळ्या पदव्यांनी आमचे गोविंदराव विभुषीत झाले होते. केळुस गांवात दाभोलकर हे नांव उच्चारले गेले की शिक्षण क्षेत्र हे डोळ्यासमोर येत आणि त्या ज्ञानदेवतेची शारदामातेची विनम्रपणे सेवा करणारे दाभोलकर घराण्याचे प्रतीक म्हणून कै.गो.म. दाभोलकर यांचा महाराष्ट्रभर बोलबाला होता. हिंदीराष्ट्र सभा, पुणे या केंद्र सरकारच्या संस्थेमध्ये जे ९ मान्यवर राष्ट्रीय किर्तीचे म्हणून गणले गेले, मान्यता पावले त्यामध्ये आमचे कै. गोविंदराव अग्रस्थानी होते. जन्मगांवाबद्दल अतिप्रेम न चुकतां दरवर्षी २ ते ३ वेळा गांवी जाणे. गावातील पंचक्रोशीतील आणि तालुक्यातील परिचित असलेल्या सर्व मंडळींची आपुलकीने भेट घेणे. शक्य असेल त्याप्रमाणे मदत करणे. ज्ञानार्जन तर अष्टोप्रहर चालु ठेवणे. पुणे (धनकवडी) ते संपूर्ण महाराष्ट्र पुन्हा पुणे असा सतत प्रवास दगदग, हे सर्व असून सुद्धा चेहरा सतत प्रसन्न आणि आनंदी. बऱ्याच तरुणांना योगक्षेम दिला. दातृत्व ते सुद्धा निरपेक्ष सत्पात्री, नांवाच्या उल्लेखाची आवश्यकताच नाही. सर्व बाजूंनी अजातशत्रु व्यक्तिमत्व.

केळुस गांवात माध्यमिक शिक्षणाची, सुरुवात सन १९६७ साली केळुस तेडोंली मुणगी, आंदुर्ले, कालवी, पंचक्रोशी या संस्थेच्या माध्यमाने केली. यामध्ये कै. गोविंदरावांचे मोठे योगदान होते. कै. गोविंदरावांचा जन्म ५ ऑक्टोबर १९३८ साली झाला. तत्कालीन परिस्थितीवर मात करून केळुस/वेंगुर्ला/मुंबई असा शैक्षणिक प्रवास. मुंबईतील बालमोहन विद्यामंदिरामध्ये शिक्षकापासून मुख्याध्यापकापर्यंत पदोन्नती घेत मुख्याध्यापक हे पद कसे असावे? याचा राज्यामध्ये आदर्श घालून दिला. त्यांच्या शैक्षणिक योगदानाची राष्ट्रीय पातळीवर ही राष्ट्रभाषा कार्याची नोंद घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना आदर्श शिक्षकांचा 'राज्य पुरस्कार' प्रदान केला. संस्थेचे ते सुरूवातीपासून सल्लागार राहिले. दुसऱ्यांच्या कार्याचे सतत कौतुक करणे, प्रोत्साहन देणे या दुर्मिळ गुणामुळे कै. गोविंदराव प्रत्येकाच्या हृदयात विराजमान झाले होते. एकत्र कुटुंब चालकत्व त्यांचेकडे होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेची गतीने वाटचाल झाली आणि ती पुढे राहील. गेल्यावर्षी २०१५ साली कलशारोहण समारोह १० फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी रोजी केळुसमध्ये संपन्न झाला. त्या समारोहाला स्वारी सर्व कुटुंबियांसमवेत उपस्थित होती. केळुस गावात नमस्कार करणेकरीता जी दुर्मिळ व्यक्तिमत्वे आहेत त्यामध्ये कै. गोविंदरावांचा प्रथम क्रमांक होता. अशा या प्रेमळ हौशी, आनंदी, कुटुंबवत्सल बाबांची प्रकृती गणपती विसर्जनानंतर अचानक बिघडली. स्वारी केळुसहून सरळ पुण्याला येऊन सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. १० ते १२ दिवस प्रकृतीत सतत चढउतार होत होते. शेवटपर्यंत मी बरा होऊन घरी येणार ही मनिषा होती. परंतु परमेश्वराच्या मनात काही वेगळेच होते. रविवार दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी कै. गो. म. दाभोलकर सर्वांचे लाडके, आमचेही लाडके बंधुराज आम्हाला पोरके करून अनंतात पुढील प्रवासास निघून गेले. सतत कार्यरत रहा, हाच संदेश मानून कै. गोविंदराव म. दाभोलकर (शिक्षणमहर्षी व संस्थेच्या सल्लागारांना) संस्थेची विनम्र आदरांजली.

❑❑❑

## वधूंची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९९२०७११९४१ ठाणे | चैताली विवेक आंबेसकर | १/१२/८७ ५'१" | B.Sc. IT MCA SAP Certified | वत्स रवळनाथ | मीन रेवती | Accenture विक्रोळी ४०,००० | ५'१" पेक्षा जास्त, शिक्षण वधू एवढे अथवा जास्त, अनुरुप. |
| २ | ९८७०७४४३२२१ ऐरोली नवी मुंबई. | श्रद्धा प्रकाश परूळेकर | २२/१०/८८ ५'१" | B.Sc. IT MCA SAP Certified | वत्स रवळनाथ | मीन रेवती | Accenture विक्रोळी ४०,००० | ५'१" पेक्षा जास्त, शिक्षण वधू एवढे अथवा जास्त, अनुरुप. |
| ३ | ७५८८५८६५२४ कळवा. | समिधा अजित पाटील | १२/१/८९ ५'२" | B.E. Computer. | सांख्यान | कुंभ पूर्वा भाद्रपदा | KPIT Navi Mumbai ८.७० वार्षिक | २/४ अंतर B.E ५'७"च्या वर |
| ४ | ९९२०५२०३८८ कुर्ला (प) | अपूर्वा अनिल नाईक | ८/१०/८९ ५'१" | M.Sc. Status, Germain (3 Yer Diploma | वत्स | कुंभ पूर्वा भाद्रपदा | Swiss International Co. 65,000/- | ३/४ अंतर, पोस्ट ग्रॅज्युएट ५'६" पर्यंत. |
| ५ | ९८२०५०५१३३ बोरीवली | प्रज्ञा लक्ष्मण सामंत | १०/१०/९० ५'३" | M.B.B.S. | धनंजय आदि नारायण | मिथुन आद्रा | एम.एस./ एम.डी. प्रवेशासाठी परीक्षा देत आहे. | २५/३० Post Graduate in any discipline ५'५"च्या वर |
| ६ | ९४२१००५८९२ पनवेल | भक्ती चारूहास पाटील पाटकर | २६/१०/९० ५'७" | B.M.S./ M.B.A. | सांख्यान चांमुडेश्वरी | मकर उत्तराषाढा | रिलायन्स कम्युनिकेशन ६-१० लाख वार्षिक | २ ते ५ अंतर, उच्चशिक्षीत ५'८"च्या वर |
| ७ | ९८३३५४१०८२ विलेपार्ले | अपूर्वा व्यंकटेश परूळेकर | ४/९/९१ ५'२" १/२ | B.Com., M.Com. | भारद्वाज पुरुषोत्तम | मिथुन आद्रा/३ | Company Secretary (C.S.) Final Exam, दिली आहे. Internship सुरू आहे. | निर्व्यसनी, उच्चशिक्षीत अनुरूप |
| ८ | ९७६९४६५७५५ गोरेगांव | सुप्रिया सुनिल प्रभू | २३/९/९१ ५'२" | BMS MBA (Finance) | धनंजय | मीन पू. भा./४ | HDFC Ltd. ६५,०००/- | वय-२८, Post Graduate, M.B.A. C.A. MS. |
| ९ | ९४२१२३६०७२ मुणगे | समिता राजेंद्र महाजन | २८/१०/९३ ५'३" | १२वी नर्सिंग | सांख्यायन | मीन रेवती | स्टाफ नर्स, लिलावती हॉस्पीटल वांद्रे २५,०००/- | उच्चशिक्षीत, मुंबई स्थित मेडिकल व्यवसायाशी संबंधीत चालेल. |

## वधूंची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ९८२१५६१२२७ अंधेरी | अनुजा दिपक सामंत | २६/२/९१ ५'४'' | M.Sc. (Bio) | वत्स | कर्क पूष्य/२ | Copper. Com. Hiranandani Powai. 35,000/- | २६/२९ पर्यंत Master/Engg. उच्चशिक्षीत. ५'६'' च्या वर |
| **वरांची यादी** | | | | | | | | |
| १ | ९८६७५३१०८५ ठाणे | अक्षय अनुप वालावलकर | ४/१/८५ ५'५'' | BMS. PGDM in HR | जामदग्नी लक्ष्मी-नारायण | वृषभ रोहिणी/२ | SR. HR. Consultant Talentahead ३२,०००/- | उच्चशिक्षीत ४'१०''-५'३'' नोकरी हवी. |
| २ | ९९६९४९०६७६ मालाड | अमित आनंद ठाकूर | १४/७/८६ ५'४'' | B.Com., G.P. C.A. JAIIB. | वत्स सिद्धेश्वर | कन्या हस्त/२ | सारस्वत बँक Deputy Manager. ४५,०००/- | २५ ते ३०, ५''च्या पुढे नोकरी असली तरी चालेल. |
| ३ | ९७६९६४९१५६ मुलुंड | सुभाष शिवराम गवाणकर मुलगा र्निव्यसनी आहे. | ३/१०/८६ ५'४.॥'' | B. Sc. | भारद्वाज | कन्या हस्त/२ | कोटक महिंद्र बँक ३५,०००/- | कायम स्वरूपी नोकरी, अनुरूप. |
| ४ | ९२२१३१७६८६ पनवेल | सागर चंद्रकांत सरनाईक | ७/९/८७ ५'६'' | १२ वी + ३ सिव्हिल ड्राफ्टमन कोर्स | काश्यप | कुंभ शततारका | साकार ऑर्किटेक गणे २५,०००/- | २०/२४ १२ वी |
| ५ | ९९७५६७०४४९ वसई | मोहनीश चंद्रशेखर प्रभू | २२/१२/८६ ५'५'' | १२ वी पास DMLT. | भारद्वाज | सिंह पूर्वा | अपेक्स किडनीकेअर हॉस्पिटल (मालाड) २०,०००/- | १२ वी पर्यंत. ५'४'' नोकरी असलीतरी चालेल. |

## दु:खद निधन



लेफ्टनंर कर्नल (रिटार्यड) इंडियन आर्मी श्री. जगदीश पुरुषोत्तम गाळवणकर ह्यांचे दिनांक १८ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी फ्लोरीडा अमेरीका येथे निधन झाले.

श्री. जगदीश पुरूषोत्तम गाळवणकर यांचा जन्म १९३२ साली वसई तालुक्यातील अर्नाळा ह्या गावी झाला. बॅचलर ऑफ आर्टस ही पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी इंडीयन आर्मी मध्ये प्रवेश मिळवीण्यासाठी केंद्र शासनाची परीक्षा देऊन त्यात ते यशस्वी झाले व त्यांची सेकन्ड लेफ्टनंट म्हणून देशाच्या सैन्य दलामध्ये नेमणूक झाली. त्यांनी आपल्या कर्तबागारीने प्रशंसनीय कामगीरी केली. त्यामुळे त्यांना अनेक शौर्य पुरस्कार मिळाले असून सन १९७१ च्या भारत पाक युद्धात त्यांच्या अतुलनीय शौर्याबद्धल त्यांना विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते. ते १९८० साली इंडीयन आर्मीमधून लेफ्टनंट कर्नल ह्या पदावरून निवृत्त झाले. सेवा निवृत्ती नंतर ही त्यांची केंद्र शासनाच्या विवीध विभागात विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

कै. जगदिश गाळवणकर ह्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. कै. जगदिश गाळवणकर ह्यांच्या निधनाने देश एका लढवैय्या सैनिकास मुकला आहे. त्यांच्या दु:खद. निधनामुळे गौड ब्राह्मण सभेला अतीव दु:ख होत आहे. गौड ब्राह्मण सभा व सर्व ज्ञाती बांधव त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच प्रार्थना !

# दीपावली...

## वैभव प्रकाशाचं, समृध्दीच्या तेजाचं...



एनकेजीएसबी बँक परिवारा तर्फे

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**NKGSB Bank**

**NKGSB Co-op. Bank Ltd.**

SINCE 1917

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.

100 YEARS of Banking Excellence 1917-2017

**REGD. OFFICE :** Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai- 400 004

**CUSTOMER CARE NO :** 022-2860 2000 **E-MAIL :** customercare@nkgsb-bank.com | **www.nkgsb-bank.com**

**PERIODICAL PRINTED MATTER**

**"GAUD BRAHMIN"**
30, Kudaldeshkar Brahman Nivas
147 B, J. S. S. Road, Girgoan, Mumbai-4.

Registered with the Registrar of
Newspaper for India Under No. 37555/61




गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट-१८०-सी, गायवाडी, गिरगांव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकर शेठ मार्ग, मुंबई - ४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.